सत्यमेव जयते

# महाराष्ट्र विधानपरिषद सदस्यांचा संक्षिप्त जीवन परिचय
# २०२२



महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय
विधानभवन, मुंबई

महाराष्ट्र विधानपरिषद सदस्यांचा संक्षिप्त जीवन परिचय २०२२

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र विधानपरिषद सदस्यांचा संक्षिप्त जीवन परिचय

# २०२२



## महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,
## विधान भवन, मुंबई

एचबी २४१०—१

**प्रकाशक :**
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
जून २०२२

**मुद्रक :**
व्यवस्थापक,
शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय,
मुंबई.

## प्रस्तावना

**"महाराष्ट्र विधानपरिषद सदस्यांचा संक्षिप्त जीवन परिचय"** हे विधानपरिषद सदस्यांची वैयक्तिक माहिती समाविष्ट असणारे स्वतंत्र स्वरूपाचे सातवे प्रकाशन आहे. ह्या उपक्रमांतर्गत अगदी सुरुवातीची चार प्रकाशने (१९६७-७२, १९७२-७८, १९७८-८० व १९८०-८५) प्रसिद्ध झाली. त्यात महाराष्ट्र विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांतील सदस्यांचा परिचय एकत्रितपणे प्रकाशित करण्यात आला होता. परंतु १९८५ पासून मात्र विधानपरिषद व विधानसभा सदस्यांच्या संक्षिप्त जीवन परिचयाच्या पुस्तिका स्वतंत्ररित्या प्रसिद्ध करण्यात येत आहेत.

या प्रकाशनात दिलेली माहिती सदस्यांनी स्वतः भरून दिलेल्या माहितीवर आधारलेली आहे. ज्या सदस्यांची नवीन माहिती मिळालेली नाही त्यांची आधीच्या प्रकाशनामध्ये उपलब्ध असलेली माहिती समाविष्ट करण्यात आली आहे.

महाराष्ट्र विधानपरिषदेच्या सदस्यांसंबंधी माहिती देणारे हे प्रकाशन केवळ विधीमंडळ सदस्यांनाच नव्हे तर पत्रकार, संशोधक, विशेष अभ्यासक व संसदीय लोकशाही कार्यपध्दतीमध्ये रस असणाऱ्या प्रत्येकाला उपयुक्त ठरेल असा मला विश्वास आहे.

या पुस्तिकेचे संकलन, संपादन व रचना अथकपणे परिश्रमपूर्वक तयार करण्यासाठी श्री. निलेश ब. वडनेरकर, ग्रंथपाल, माहिती व संशोधन अधिकारी, श्री. शत्रुघ्न प. मुळे, उप ग्रंथपाल (ग्रंथालय व माहिती), श्री. त्रिभूवनदास बा. पाटील, उप ग्रंथपाल (संदर्भ व संशोधन), तसेच, श्रीमती आरती ना. बिडये, सहायक कक्ष अधिकारी व कु. एकता अ. शेंद्रे, लिपिक-टंकलेखक यांचे अनमोल सहकार्य लाभले. त्याबाबत ते प्रशंसेस पात्र असून त्याबद्दल त्यांचा या ठिकाणी आवर्जून उल्लेख करणे आवश्यक वाटते. या प्रकाशनाच्या सुबक व नेटक्या छपाईबाबतीत व्यवस्थापक व त्यांचे सहकारी, शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई यांनी केलेल्या सहकार्याबद्दल मी त्यांचा आभारी आहे.

या प्रकाशनाची उपयुक्तता वाढविण्याच्या दृष्टीने या संदर्भात सन्माननीय सदस्यांच्या काही विधायक सूचना असल्यास त्यांचे देखील स्वागतच केले जाईल आणि त्यांची निश्चितच यथायोग्य दखल घेतली जाईल.

**विधान भवन,**
मुंबई ४०० ०३२.
दिनांक : जून २०२२.

**राजेन्द्र भागवत,**
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानमंडळ.

# अनुक्रमणिका


| | | | |
|---|---|---|---|
| प्रस्तावना | | .. | |
| महाराष्ट्र विधानपरिषद पदाधिकारी | | .. | एक |
| महाराष्ट्र राज्य मंत्रिमंडळ | | .. | सात |
| महाराष्ट्र विधानपरिषद अधिकाऱ्यांचा संक्षिप्त जीवन परिचय : | | .. | १ |
| | माननीय सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद | .. | ३ |
| | माननीय उप सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद | | ७ |
| | प्रधान सचिव | .. | १३ |
| महाराष्ट्र विधानपरिषद सदस्यांचा संक्षिप्त जीवन परिचय | | .. | १५ |
| महाराष्ट्र विधानपरिषद सदस्यांची सांख्यिकीय माहिती | | .. | १५१ |
| जोडपत्र : (१) | वयानुसार विभागणी | .. | १५३ |
| (२) | महाराष्ट्र विधानपरिषद सदस्यांची जन्म दिनांकनिहाय यादी | .. | १५४ |
| (३) | शैक्षणिक पात्रतेनुसार विभागणी | .. | १६२ |
| (४) | व्यवसायानुसार विभागणी | .. | १६३ |
| (५) | अपत्यांबाबत आकडेवारी | .. | १६४ |
| (६) | मतदारसंघनिहाय सदस्यांची यादी | .. | १६५ |
| (७) | महाराष्ट्र विधानपरिषद महिला सदस्यांची यादी | .. | १७० |
| (८) | महाराष्ट्र विधानपरिषद पक्षनिहाय सदस्यांची यादी | .. | १७१ |
| (९) | महाराष्ट्र विधानपरिषद सदस्यांची कालावधीनिहाय यादी | .. | १७५ |
| (१०) | महाराष्ट्र विधानपरिषद पक्षनिहाय सदस्य संख्या | .. | १८१ |
| (११) | महाराष्ट्र विधानपरिषद सदस्यांची आडनावानुक्रमे यादी | .. | १८२ |

## महाराष्ट्र विधानपरिषद सदस्यांची आडनावानुक्रमे सूची


| अ. क्र. | सदस्यांचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १. | आसगावकर, श्री. जयंत दिनकर | १७ |
| २. | आंबटकर, श्री. रामदास भगवानजी | १९ |
| ३. | कदम, श्री. मोहनराव श्रीपती | २१ |
| ४. | कराड, श्री. रमेश काशीराम | २३ |
| ५. | कायंदे, डॉ. मनिषा श्यामसुंदर | २५ |
| ६. | काळे, श्री. विक्रम वसंतराव | २७ |
| ७. | खोत, श्री. सदाशिव रामचंद्र | २९ |
| ८. | खंडेलवाल, श्री. वसंत मदनलाल | ३२ |
| ९. | गाणार, श्री. नागो पुंडलिक | ३४ |
| १०. | गिरकर, श्री. विजय ऊर्फ भाई विठ्ठल | ३६ |
| ११. | गोऱ्हे, डॉ. नीलम दिवाकर | ७ |
| १२. | चतुर्वेदी, श्री. दुष्यंत सतिश | ३८ |
| १३. | चव्हाण, श्री. सतिश भानुदासराव | ४० |
| १४. | जानकर, श्री. महादेव जगन्नाथ | ४३ |
| १५. | ठाकरे, श्री. उद्धव बाळासाहेब | ४५ |
| १६. | ठाकूर, श्री. सुजितसिंह मानसिंह | ४८ |
| १७. | डावखरे, श्री. निरंजन वसंत | ५० |
| १८. | तटकरे, श्री. अनिकेत सुनिल | ५३ |
| १९. | तांबे, डॉ. सुधीर भास्करराव | ५५ |
| २०. | दटके, श्री. प्रविण प्रभाकरराव | ५८ |
| २१. | दराडे, श्री. किशोर भिकाजी | ६० |
| २२. | दराडे, श्री. नरेंद्र भिकाजी | ६२ |
| २३. | दरेकर, श्री. प्रविण यशवंत | ६४ |

| अ. क्र. | सदस्यांचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| २४. | दानवे, श्री. अंबादास एकनाथराव | ६६ |
| २५. | दुर्राणी, श्री. अब्दुला खान लतिफ खान ऊर्फ बाबाजानी | ६८ |
| २६. | देसाई, श्री. सुभाष राजाराम | ७० |
| २७. | दौंड, श्री. संजय पंडितराव | ७३ |
| २८. | धस, श्री. सुरेश रामचंद्र | ७५ |
| २९. | नाईक, श्री. निलय मधुकर | ७७ |
| ३०. | नाईक-निंबाळकर, श्री. रामराजे प्रतापसिंह | ३ |
| ३१. | पटेल, श्री. अमरिशभाई रसिकलाल | ७९ |
| ३२. | पटेल, श्री. चंदूलाल विश्रामभाई | ८१ |
| ३३. | पडळकर, श्री. गोपीचंद कुंडलिक | ८३ |
| ३४. | परब, ॲड. अनिल दत्तात्रय | ८४ |
| ३५. | पाटील, श्री. कपिल हरिश्चंद्र | ८६ |
| ३६. | पाटील, श्री. जयंत प्रभाकर | ९१ |
| ३७. | पाटील, श्री. बाळाराम दत्तात्रय | ९३ |
| ३८. | पाटील, डॉ. रणजित विठ्ठलराव | ९५ |
| ३९. | पाटील, श्री. रमेशदादा नारायण | ९७ |
| ४०. | पाटील, श्री. रामराव बालाजीराव | ९९ |
| ४१. | पाटील, श्री. सतेज ऊर्फ बंटी डी. | १०१ |
| ४२. | पोटे-पाटील, श्री. प्रविण रामचंद्र | १०४ |
| ४३. | पोतनीस, श्री. विलास विनायक | १०७ |
| ४४. | फाटक, श्री. रविंद्र सदानंद | १०९ |
| ४५. | फुके, डॉ. परिणय रमेश | १११ |
| ४६. | बाजोरिया, श्री. विप्लव गोपिकिशन | ११३ |
| ४७. | बावनकुळे, श्री. चंद्रशेखर कृष्णराव | ११५ |
| ४८. | भोसले, श्री. अनिल शिवाजीराव | ११७ |
| ४९. | मिटकरी, श्री. अमोल रामकृष्ण | ११९ |

| अ. क्र. | सदस्यांचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| ५०. | मिर्झा, डॉ. वजाहत मिर्झा अथर | १२१ |
| ५१. | मेटे, श्री. विनायक तुकाराम | १२३ |
| ५२. | मोहिते-पाटील, श्री. रणजितसिंह विजयसिंह | १२५ |
| ५३. | राजूरकर, श्री. अमरनाथ अनंतराव | १२८ |
| ५४. | राठोड, श्री. राजेश धोंडिराम | १३० |
| ५५. | रावते, श्री. दिवाकर नारायणराव | १३२ |
| ५६. | लाड, श्री. अरूण गणपती | १३४ |
| ५७. | लाड, श्री. प्रसाद मिनेश | १३६ |
| ५८. | वंजारी, श्री. अभिजीत गोविंदराव | १३८ |
| ५९. | शिंदे, श्री. शशिकांत जयवंतराव | १४० |
| ६०. | शिंदे, श्री. सुनिल गोविंद | १४२ |
| ६१. | सरनाईक, श्री. किरण रामराव | १४५ |
| ६२. | सातव, (डॉ.) प्रज्ञा राजीव | १४७ |
| ६३. | सिंह, श्री. राजहंस धनंजय | १४८ |

## महाराष्ट्र विधानपरिषदेचे मा. पीठासीन अधिकारी, मा. विरोधी पक्षनेता आणि विधानमंडळातील अधिकाऱ्यांची नावे व त्यांच्या निवासस्थानांचे पत्ते

### मा. सभापती

**श्री. रामराजे प्रतापसिंह नाईक-निंबाळकर,** बी.एस्सी. (फिजिक्स), एलएल.एम. (आंतरराष्ट्रीय कायदा)
"अजंठा", नारायण दाभोळकर मार्ग, मलबार हिल, मुंबई ४०० ००६.

### मा. उप सभापती

**डॉ. (श्रीमती) नीलम दिवाकर गोऱ्हे,** (बी.एस.ए.एम. मुंबई विद्यापीठ-पोद्दार आयुर्वेदिक महाविद्यालय)
क-३, शासकीय कुटीर, मादाम कामा मार्ग, मुंबई ४०० ०३२.

### विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र विधानपरिषद

**श्री. प्रविण यशवंत दरेकर** (बी.कॉम.)
८, अवंती अपार्टमेंट, नारायण दाभोळकर मार्ग, मलबार हिल, मुंबई ४०० ००६.

### प्रधान सचिव

**श्री. राजेन्द्र ग. भागवत** (बी.कॉम., एलएल.एम.)
७०१, निलांबरी बिल्डिंग, महर्षी कर्वे रोड, नरिमन पॉईंट,
अग्निशमन केंद्रासमोर, मुंबई ४०० ०२१.

### सह सचिव (समिती) तथा विशेष कार्य अधिकारी

**डॉ. अनिल शं. महाजन** (एम.व्ही.एससी अँड ए.एच.)
१००२/१० मजला, तुषार बिल्डिंग, सीताराम देवरा मार्ग, ए रोड,
चर्चगेट रेल्वे स्टेशन, चर्चगेट, मुंबई ४०० ०२०.

### उप सचिव

**(१) श्री. विलास गो. आठवले** [बी.एस.एल.(लेजिस्लेशन) एलएल.एम.]
एच-१९/५०१, प्रेस इनक्लेव को-ऑप. हौ. सोसायटी,
प्रतिक्षानगर, सायन (पूर्व), मुंबई ४०० ०२२.

**(२) श्रीमती मेघना दि. तळेकर** [एम.ए. (राज्यशास्त्र), एलएल.बी.]
५०२, डॅफोडिल्स सोसायटी, साईनाथ गार्डन,
टाटा कॉलनी, मुलुंड (पूर्व), मुंबई ४०० ०८१.

(३) **श्री. शिवदर्शन श्री. साठ्ये** (बी.ए., एलएल.बी.)
फ्लॅट नं. ३०४, तिसरा मजला, बिल्डिंग नं. २,
हरिओम को. ऑप. हौसिंग सोसायटी,
मिलेनियम पार्क, हरिओमनगर,
मुलुंड (पूर्व), मुंबई ४०० ०८१.

(४) **श्री. जितेंद्र म. भोळे,** (बी.ए., एलएल.बी.) (मा.विरोधी पक्षनेता, म.वि.स. यांच्या आस्थापनेवर प्रतिनियुक्तीने कार्यरत)
एच-१९/५०३, प्रेस एनक्लेव्ह को.ऑप. हौसिंग सोसायटी,
प्रतिक्षानगर बस आगाराजवळ, प्रतिक्षानगर, सायन, मुंबई ४०० ०२२.

(५) **श्री. रा. म. तारवी** (बी.कॉम., एलएल.एम.)
३०२, भूषण प्लाझा, पं. मल्हारराव कुलकर्णी मार्ग,
डॉन बॉस्को हायस्कूलसमोर, वझीरा नाका,
बोरिवली (प.), मुंबई ४०० ०९१.

(६) **श्री. ना. रा. थिटे** [(एम. एस्सी. (कृषी), एलएल.एम.] (मा. मुख्यमंत्री यांच्या आस्थापनेवर प्रतिनियुक्तीने कार्यरत)
३०२, लक्ष्मी-मधू को.ऑप. हौसिंग सोसायटी,
प्लॉट नं.२३, सेक्टर-४, रोड नंबर-४, नवीन पनवेल,
जि. रायगड ४१० २०६.

(७) **श्री. ऋतुराज ज. कुडतरकर** (बी.कॉम., एलएल.बी.)
अे-३०१, मुलुंड अमित को-ऑप. हौ. सोसायटी लि.,
म्हाडा कॉलनी, मुलुंड (पूर्व), मुंबई ४०० ०८१.

## उप सचिव तथा नियंत्रण अधिकारी

**श्रीमती स्वाती स. ताडफळे** (एम.ए.)
बी-३०४, निंबेश्वर संस्कृती को.ऑप.हौ. सोसायटी,
प्लॉट नं. ८अ/१, जरीमरी माता मंदीराजवळ, सुकापूर,
पनवेल, पिनकोड ४१० २०६.

## कार्यवाही संपादक

**श्री. अजयकुमार र. अग्रवाल** (एम. कॉम.)
३, गोमती, अब्दुल गफार खान रोड, मुंबई ४०० ०३०.

## ग्रंथपाल, माहिती व संशोधन अधिकारी

**श्री. निलेश ब. वडनेरकर** [बी.एस्सी., एम.लीब.आय.एस्सी., NET (राष्ट्रीय पात्रता परीक्षा)]
७०२, पन्हाळगड, आय.आय.टी. स्टाफ को.ऑ.हौ. सोसायटी.,
जलवायू विहारच्या मागे, हिरानंदानी गार्डन, पवई, मुंबई ४०० ०७६.

## अवर सचिव

(१) **श्री. संतोष ना. पराडकर** (बी.कॉम., एलएल.बी.)
०७, कृष्ण महाल, संत जनाबाई पथ, विलेपार्ले (पूर्व), मुंबई ४०० ०५७.

(२) **श्रीमती सायली सु. कांबळी** [बी.कॉम., एलएल.एम., एम.बी.ए. (वित्त)]
१२-अ-१, शासकीय वसाहत, हाजीअली, मुंबई.

(३) **श्री. सुभाष श्री. नलावडे** (बी.कॉम., एलएल.बी.)
बी-२, श्री सिद्धी को-ऑप. हौ. सोसायटी, सुनिलनगर, डोंबिवली (पूर्व), जि. ठाणे.

(४) **श्री. नितीन शि. दळवी** (बी.ए., एलएल.बी.) (मा. मंत्री, नगरविकास यांच्या आस्थापनेवर प्रतिनियुक्तीने कार्यरत)
आय/ १०२, श्री. साई उषा कॉम्प्लेक्स को-ऑप.हौ. सोसायटी लि., व्हिलेज रोड, खंडेलवाल मार्ग, उषानगर, भांडुप (प.), मुंबई ४०० ०७८.

(५) **श्री. सोमनाथ न. सानप** (बी.कॉम., एलएल.बी.)
अल्केश को-ऑप.हौ.सो.लि., फ्लॅट क्र. ५०३, ५ वा मजला, हॉराईझन फ्लोरा, कस्तुरबा लेन, व्ही.पी. रोड क्रॉसलेन, टी.जी.एस.बी. बँकेजवळ, मुलुंड (प.), मुंबई ४०० ०८०.

(६) **श्री. रविंद्र ग. जगदाळे** (बी.कॉम., एलएल.बी.)
३/१०४, अक्षयानंद, शैलेंद्रनगर, एस.व्ही. रोड, दहिसर (पू.), मुंबई ४०० ०६८.

(७) **श्रीमती पुनम हे. ढगे** (बी.कॉम., एलएल.एम.)
वाय-१२/१८३, शासकीय अधिकारी वसाहत, वांद्रे (पू.), मुंबई ४०० ०५१.

(८) **श्री. उमेश श. शिंदे** (बी.कॉम., एलएल.बी., एम्.पी.एम्.)
प्लॉट नं.५०४, बिल्डिंग नं. ३, पाचवा मजला, विजय पार्क, घोडबंदर रोड, कासारवडवली, ठाणे (प.) ४०० ६०१.

(९) **श्री. प्रकाश श्री. खोंदले** (बी.ए.,एलएल.बी.)
य-५/७९, शासकीय अधिकारी वसाहत, खेरवाडी, वांद्रे (पूर्व), मुंबई ४०० ०५१.

(१०) **श्री. विजय शं. कोमटवार** (बी.ए., एलएल.बी.)
ब-६०४, तुलसी आंगण, कात्रप, बदलापूर (पू.), ठाणे ४२१ ५०३.

(११) **श्री. मोहन स. काकड,** (बी.एस्सी., एलएल.बी.)
साकेत हार्मोनी बिल्डिंग नं.२, सी विंग, रुम. नं. २०३, म्हात्रे नाका, चिंचपाडा रिक्षा स्टँडजवळ, कल्याण (पूर्व), जि.ठाणे ४२१ ३०६.

## अवर सचिव (समिती)

(१) **श्री. सुनिल शं. झोरे** (एम.कॉम.)
सी-६०२, कुसुमभारती को. ऑप. हौ. सोसायटी,दत्तपाडा रोड, बोरिवली (पू.), मुंबई ४०० ०६६.

(२) **श्रीमती सीमा स. तांबे** [एम.ए., (समाजशास्त्र), एलएल.बी.]
आय-५०२, उषा कॉम्प्लेक्स, भांडूप (प.), मुंबई ४०० ०७८.

(३) **श्री. अमोल श.पाटील,** (एम.कॉम.) (मा.मंत्री, गृहनिर्माण यांच्या आस्थापनेवर प्रतिनियुक्तीने कार्यरत- प्रपत्र बढती)
प्लॉट बी ३/१, ३०१, सेक्टर २०, नेरुळ (प.), नवी मुंबई ४०० ७०६.

(४) **श्री. आशिष ने. जावळे,** (बी.कॉम., एम.पी.एम.)
१०३, गंधपद्मीनी हौसिंग सोसायटी, चिंचोली पाडा, सुभाष रोड, डोंबिवली (प.), ठाणे ४२१ २०२.

(५) **कु. पुष्पा र. दळवी,** (बी.ए., एलएल.बी.)
१६/१, फ्रुटवाला बिल्डिंग, दादोजी कोंडदेव मार्ग, भायखळा, मुंबई ४०० ०२७.

(६) **श्री. घननीळ ज्ञा. देबडवार,** [बी.एस.एल.(लेजिस्लेशन)]
२०५, अर्चना अपार्टमेंट, चिकनघर, कल्याण (प.), ठाणे ४२१ ३०१.

## मा. सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांचे सचिव.

**श्री. म. मु. काज, (बी.ए., एलएल.बी.)**
७१/५२, कलकत्तावाला बिल्डिंग, चौथा मजला, डॉ. भडकमकर मार्ग,
मुंबई सेंट्रल, मुंबई ४०० ००८.

## मा. उपसभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांचे खाजगी सचिव तथा जनसंपर्क अधिकारी

**श्री. रविंद्र खेबुडकर**
ए-३०६, रॉयल ग्रीन फिल्ड, ताराबाई पार्क, कोल्हापूर.

## मा. विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र विधानपरिषद यांचे खाजगी सचिव तथा जनसंपर्क अधिकारी

**श्री. विद्याधर महाले** [एम.एस्सी. (कृषि)]
१/३, बॅडमन्स क्वॉटर्स, वाळकेश्वर रोड, वाळकेश्वर , मलबार हिल, मुंबई ४०० ००६.

## महाराष्ट्र राज्य मंत्रिमंडळ
## (दिनांक २९ नोव्हेंबर २०१९ रोजीच्या शासन राजपत्राप्रमाणे)

### मुख्यमंत्री

| | | |
|---|---|---|
| १ * | **श्री. उध्दव बाळासाहेब ठाकरे** | कोणत्याही मंत्र्यांना विवक्षितपणे नेमून न दिलेले विभाग किंवा त्यांचे भाग. |

### मंत्री

| | | |
|---|---|---|
| २ * | **श्री.एकनाथ संभाजी शिंदे** | गृह, नगर विकास, वने, पर्यावरण, पाणीपुरवठा व स्वच्छता, मृद व जलसंधारण, पर्यटन, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम), संसदीय कार्य, माजी सैनिक कल्याण. |
| ३ * | **श्री. छगन चंद्रकांत भुजबळ** | ग्रामविकास, जलसंपदा व लाभक्षेत्र विकास, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य, राज्य उत्पादन शुल्क, कौशल्य विकास आणि उद्योजकता, अन्न व औषध प्रशासन. |
| ४ * | **श्री. विजय ऊर्फ बाळासाहेब भाऊसाहेब थोरात** | महसूल, ऊर्जा व अपारंपारिक उर्जा, वैद्यकीय शिक्षण, शालेय शिक्षण, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय. |
| ५ * | **श्री. सुभाष राजाराम देसाई** | उद्योग आणि खनिकर्म, उच्च व तंत्रशिक्षण, क्रीडा व युवक कल्याण, कृषि, रोजगार हमी योजना, फलोत्पादन, परिवहन, मराठी भाषा, सांस्कृतिक कार्ये, राजशिष्टाचार, भूकंप पुनर्वसन, बंदरे आणि खार भूमी विकास. |
| ६ * | **श्री. जयंत राजाराम पाटील** | वित्त आणि नियोजन, गृहनिर्माण, सार्वजनिक आरोग्य, सहकार व पणन, अन्न, नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण, कामगार, अल्पसंख्यांक विकास. |
| ७ * | **डॉ.नितीन काशिनाथ राऊत** | सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून), आदिवासी विकास, महिला व बाल विकास, वस्त्रोद्योग, मदत व पुनर्वसन, इतर मागासवर्ग, सामाजिक व शैक्षणिक मागास प्रवर्ग, विमुक्त जाती, भटक्या जमाती आणि विशेष मागास प्रवर्ग कल्याण. |

मा. मुख्यमंत्री व मंत्री महोदयांनी दिनांक २८ नोव्हेंबर, २०१९ रोजी (मध्यान्होत्तर) शपथ घेतली. दिनांक १२ डिसेंबर, २०१९ रोजीच्या **महाराष्ट्र शासन राजपत्रान्वये** खाते वाटप प्रसिद्ध करण्यात आले.

## महाराष्ट्र राज्य मंत्रिमंडळ
## (दिनांक ५ जानेवारी २०२० रोजीच्या शासन राजपत्राप्रमाणे)

### मुख्यमंत्री

| | | |
|---|---|---|
| * | **श्री. उध्दव बाळासाहेब ठाकरे** | सामान्य प्रशासन, माहिती तंत्रज्ञान, माहिती व जनसंपर्क, विधि व न्याय आणि इतर कोणत्याही मंत्र्यांना विवक्षितपणे नेमून न दिलेले विभाग किंवा विषय. |

### उप मुख्यमंत्री

| | | |
|---|---|---|
| ** | **श्री. अजित अनंतराव पवार** | वित्त, नियोजन. |

### मंत्री

| | | |
|---|---|---|
| * | **श्री. सुभाष राजाराम देसाई** | उद्योग, खनिकर्म, मराठी भाषा. |
| ** | **श्री. अशोक शंकरराव चव्हाण** | सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून). |
| * | **श्री. छगन चंद्रकांत भुजबळ** | अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण. |
| ** | **श्री. दिलीप दत्तात्रय वळसे-पाटील** | कामगार, राज्य उत्पादन शुल्क. |
| * | **श्री. जयंत राजाराम पाटील** | जलसंपदा व लाभक्षेत्र विकास. |
| #** | **श्री. अनिल वसंतराव देशमुख** | गृह. |
| * | **श्री. विजय ऊर्फ बाळासाहेब भाऊसाहेब थोरात** | महसूल. |
| ** | **डॉ. राजेंद्र भास्करराव शिंगणे** | अन्न व औषध प्रशासन. |

| | | |
|---|---|---|
| ** | **श्री. राजेश अंकुशराव टोपे** | सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण. |
| ** | **श्री. नवाब मोहम्मद इस्लाम मलिक** | अल्पसंख्यांक विकास व औकाफ, कौशल्य विकास व उद्योजकता. |
| ** | **श्री. हसन मियालाल मुश्रीफ** | ग्राम विकास. |
| * | **डॉ. नितीन काशिनाथ राऊत** | ऊर्जा. |
| ** | **श्रीमती वर्षा एकनाथ गायकवाड** | शालेय शिक्षण. |
| ** | **डॉ. जितेंद्र सतिश आव्हाड** | गृहनिर्माण. |
| * | **श्री. एकनाथ संभाजी शिंदे** | नगर विकास, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम). |
| ** | **श्री. सुनिल छत्रपाल केदार** | पशुसंवर्धन, दुग्ध व्यवसाय विकास, क्रीडा व युवक कल्याण. |
| ** | **श्री. विजय नामदेवराव वडेट्टीवार** | इतर मागासवर्ग, सामाजिक व शैक्षणिक मागास प्रवर्ग, विमुक्त जाती, भटक्या जमाती आणि विशेष मागास प्रवर्ग कल्याण, खार जमिनी विकास, भूकंप पुनर्वसन. |
| ** | **श्री. अमित विलासराव देशमुख** | वैद्यकीय शिक्षण, सांस्कृतिक कार्य. |
| ** | **श्री. उदय रविंद्र सामंत** | उच्च व तंत्रशिक्षण. |
| ** | **श्री. दादाजी दगडू भुसे** | कृषि, माजी सैनिक कल्याण. |
| #** | **श्री. संजय दुलीचंद राठोड़** | वने, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन. |
| ** | **श्री. गुलाबराव रघुनाथ पाटील** | पाणीपुरवठा व स्वच्छता. |

| | | |
|---|---|---|
| ** | **ॲड. के.सी. पाडवी** | आदिवासी विकास. |
| ** | **श्री. संदिपानराव आसाराम भुमरे** | रोजगार हमी, फलोत्पादन. |
| ** | **श्री. शामराव ऊर्फ बाळासाहेब पांडुरंग पाटील** | सहकार, पणन. |
| ** | **ॲड. अनिल दत्तात्रय परब** | परिवहन, संसदीय कार्य. |
| ** | **श्री. अस्लम रमजान अली शेख** | वस्त्रोद्योग, मत्स्यव्यवसाय, बंदरे. |
| ** | **ॲड. यशोमती चंद्रकांत ठाकूर (सोनावणे)** | महिला व बालविकास. |
| ** | **श्री. शंकरराव यशवंतराव गडाख** | मृद व जलसंधारण. |
| ** | **श्री. धनंजय पंडितराव मुंडे** | सामाजिक न्याय व विशेष सहाय्य. |
| ** | **श्री. आदित्य उध्दव ठाकरे** | पर्यटन, पर्यावरण, राजशिष्टाचार. |

## राज्यमंत्री

| | | |
|---|---|---|
| ** | **श्री. अब्दुल नबी सत्तार** | महसूल, ग्रामविकास, बंदरे, खार जमिनी विकास,विशेष सहाय्य. |
| ** | **श्री. सतेज ऊर्फ बंटी डी. पाटील** | गृह (शहरे), गृहनिर्माण, परिवहन, माहिती तंत्रज्ञान, संसदीय कार्य, माजी सैनिक कल्याण. |
| ** | **श्री. शंभूराज शिवाजीराव देसाई** | गृह (ग्रामीण), वित्त, नियोजन, राज्य उत्पादन शुल्क, कौशल्य विकास व उद्योजकता, पणन. |
| ** | **श्री. ओमप्रकाश ऊर्फ बच्चू बाबाराव कडू** | जलसंपदा व लाभक्षेत्र विकास, शालेय शिक्षण, महिला व बाल विकास, इतर मागासवर्ग, सामाजिक व शैक्षणिक मागास प्रवर्ग, विमुक्त जाती, भटक्या जमाती आणि विशेष मागास प्रवर्ग कल्याण, कामगार. |

| | | |
|---|---|---|
| ** | **श्री. दत्तात्रय विठोबा भरणे.** | सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून), मृद व जलसंधारण, वने, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय, सामान्य प्रशासन. |
| ** | **डॉ. विश्वजीत पतंगराव कदम** | सहकार, कृषि, सामाजिक न्याय, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण, अल्पसंख्याक विकास व औकाफ, मराठी भाषा. |
| ** | **श्री. राजेंद्र शामगोंडा पाटील यड्रावकर** | सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण, वैद्यकीय शिक्षण, अन्न व औषध प्रशासन, वस्त्रोद्योग, सांस्कृतिक कार्ये. |
| ** | **श्री. संजय बाबुराव बनसोडे** | पर्यावरण, पाणीपुरवठा व स्वच्छता, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम), रोजगार हमी, भूकंप पुनर्वसन, संसदीय कार्ये. |
| ** | **श्री. प्राजक्त प्रसादराव तनपुरे** | नगरविकास, ऊर्जा, आदिवासी विकास, उच्च व तंत्र शिक्षण, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन. |
| ** | **श्रीमती आदिती सुनिल तटकरे** | उद्योग, खनिकर्म, पर्यटन, फलोत्पादन, क्रीडा व युवक कल्याण, राजशिष्टाचार, माहिती व जनसंपर्क. |

**टीप :**

* **दिनांक २८ नोव्हेंबर, २०१९ रोजी मुख्यमंत्री व मंत्री यांनी शपथ घेतली.**

** **दिनांक ३० डिसेंबर, २०१९ रोजी उप मुख्यमंत्री, मंत्री व राज्यमंत्री यांनी शपथ घेतली.**

# **श्री. संजय दुलीचंद राठोड़ यांनी दिनांक ४ मार्च, २०२१ रोजी पदाचा राजीनामा दिला.**

# **श्री. अनिल वसंतराव देशमुख यांनी दिनांक ६ एप्रिल, २०२१ रोजी पदाचा राजीनामा दिला.**

## महाराष्ट्र राज्य मंत्रिमंडळ

### मुख्यमंत्री

| | | |
|---|---|---|
| * | **श्री. उध्दव बाळासाहेब ठाकरे** | सामान्य प्रशासन, माहिती व तंत्रज्ञान, माहिती व जनसंपर्क, विधि व न्याय आणि इतर कोणत्याही मंत्र्यांना विवक्षितपणे नेमून न दिलेले विभाग किंवा विषय. |

### उप मुख्यमंत्री

| | | |
|---|---|---|
| ** | **श्री. अजित अनंतराव पवार** | वित्त, नियोजन, राज्य उत्पादन शुल्क. |

### मंत्री

| | | |
|---|---|---|
| * | **श्री. सुभाष राजाराम देसाई** | उद्योग, खनिकर्म, मराठी भाषा. |
| ** | **श्री. अशोक शंकरराव चव्हाण** | सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून). |
| * | **श्री. छगन चंद्रकांत भुजबळ** | अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण. |
| ** | **श्री. दिलीप दत्तात्रय वळसे-पाटील** | गृह. |
| * | **श्री. जयंत राजाराम पाटील** | जलसंपदा व लाभक्षेत्र विकास. |
| * | **श्री. विजय ऊर्फ बाळासाहेब भाऊसाहेब थोरात** | महसूल. |
| ** | **डॉ. राजेंद्र भास्करराव शिंगणे** | अन्न व औषध प्रशासन. |
| ** | **श्री. राजेश अंकुशराव टोपे** | सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण, कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविण्यता. |

| | | |
|---|---|---|
| ** | **श्री. नवाब मोहम्मद इस्लाम मलिक** | |
| ** | **श्री. हसन मियालाल मुश्रीफ** | ग्रामविकास, कामगार. |
| * | **डॉ. नितीन काशिनाथ राऊत** | ऊर्जा. |
| ** | **श्रीमती वर्षा एकनाथ गायकवाड** | शालेय शिक्षण. |
| ** | **डॉ. जितेंद्र सतिश आव्हाड** | गृहनिर्माण, अल्पसंख्याक विकास व औकाफ. |
| * | **श्री. एकनाथ संभाजी शिंदे** | नगर विकास, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम). |
| ** | **श्री. सुनिल छत्रपाल केदार** | पशुसंवर्धन, दुग्ध व्यवसाय विकास, क्रीडा व युवक कल्याण. |
| ** | **श्री. विजय नामदेवराव वडेट्टीवार** | इतर मागास बहुजन कल्याण, खार जमिनी विकास, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन. |
| ** | **श्री. अमित विलासराव देशमुख** | वैद्यकीय शिक्षण, सांस्कृतिक कार्य. |
| ** | **श्री. उदय रविंद्र सामंत** | उच्च व तंत्रशिक्षण. |
| ** | **श्री. दादाजी दगडू भुसे** | कृषि, माजी सैनिक कल्याण. |
| ** | **श्री. गुलाबराव रघुनाथ पाटील** | पाणीपुरवठा व स्वच्छता. |
| ** | **ॲड. के.सी. पाडवी** | आदिवासी विकास. |
| ** | **श्री. संदिपानराव आसाराम भुमरे** | रोजगार हमी, फलोत्पादन. |
| ** | **श्री. शामराव ऊर्फ बाळासाहेब पांडुरंग पाटील** | सहकार, पणन. |

| | | |
|---|---|---|
| ** | **ॲड. अनिल दत्तात्रय परब** | परिवहन, संसदीय कार्ये. |
| ** | **श्री. अस्लम रमजान अली शेख** | वस्त्रोद्योग, मत्स्यव्यवसाय, बंदरे. |
| ** | **ॲड. यशोमती चंद्रकांत ठाकूर (सोनावणे)** | महिला व बालविकास. |
| ** | **श्री. शंकरराव यशवंतराव गडाख** | मृद व जलसंधारण. |
| ** | **श्री. धनंजय पंडितराव मुंडे** | सामाजिक न्याय व विशेष सहाय्य. |
| ** | **श्री. आदित्य उध्दव ठाकरे** | पर्यटन, पर्यावरण व वातावरणीय बदल, राजशिष्टाचार. |

**राज्यमंत्री**

| | | |
|---|---|---|
| ** | **श्री. अब्दुल सत्तार** | महसूल, ग्रामविकास, बंदरे, खार जमिनी विकास,विशेष सहाय्य. |
| ** | **श्री. सतेज ऊर्फ बंटी डी. पाटील** | गृह (शहरे), गृहनिर्माण, परिवहन, माहिती तंत्रज्ञान, संसदीय कार्ये, माजी सैनिक कल्याण. |
| ** | **श्री. शंभूराज शिवाजीराव देसाई** | गृह (ग्रामीण), वित्त, नियोजन, राज्य उत्पादन शुल्क,कौशल्य विकास व उद्योजकता, पणन. |
| ** | **श्री. ओमप्रकाश ऊर्फ बच्चू बाबाराव कडू** | जलसंपदा लाभक्षेत्र विकास, शालेय शिक्षण, महिला व बाल विकास, इतर मागास बहुजन कल्याण, कामगार. |
| ** | **श्री. दत्तात्रय विठोबा भरणे** | सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून), मृद व जलसंधारण, वने, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय, सामान्य प्रशासन. |
| ** | **डॉ. विश्वजीत पतंगराव कदम** | सहकार, कृषि, सामाजिक न्याय, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण, अल्पसंख्याक विकास व औकाफ, मराठी भाषा. |

| | | |
|---|---|---|
| ** | **श्री. राजेंद्र शामगोंडा पाटील यड्रावकर** | सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण, वैद्यकीय शिक्षण, अन्न व औषध प्रशासन, वस्त्रोद्योग, सांस्कृतिक कार्य. |
| ** | **श्री. संजय बाबुराव बनसोडे** | पर्यावरण व वातावरणीय बदल, पाणीपुरवठा व स्वच्छता, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम), रोजगार हमी, भूकंप पुनर्वसन, संसदीय कार्ये. |
| ** | **श्री. प्राजक्त प्रसादराव तनपुरे** | नगरविकास, ऊर्जा, आदिवासी विकास, उच्च व तंत्र शिक्षण, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन. |
| ** | **श्रीमती आदिती सुनिल तटकरे** | उद्योग, खनिकर्म, पर्यटन, फलोत्पादन, क्रीडा व युवक कल्याण, राजशिष्टाचार, माहिती व जनसंपर्क, विधी व न्याय. |

---

**टीप :** * **दिनांक २८ नोव्हेंबर, २०१९ रोजी मुख्यमंत्री व मंत्री यांनी शपथ घेतली.**

** **दिनांक ३० डिसेंबर, २०१९ रोजी उप मुख्यमंत्री, मंत्री व राज्यमंत्री यांनी शपथ घेतली.**

# महाराष्ट्र विधानपरिषद अधिकाऱ्यांचा संक्षिप्त जीवन परिचय



मा. श्री. रामराजे प्रतापसिंह नाईक-निंबाळकर
सभापती,
महाराष्ट्र विधानपरिषद

## नाईक-निंबाळकर, श्री. रामराजे प्रतापसिंह
## मा. सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद

**जन्म** : ८ एप्रिल, १९४८

**जन्म ठिकाण** : फलटण, तालुका-फलटण, जिल्हा-सातारा.

**शिक्षण** : बी.एस्सी. (फिजिक्स), एलएल.एम. (आंतरराष्ट्रीय कायदा)

**ज्ञात भाषा** : मराठी, हिंदी व इंग्रजी.

**वैवाहिक माहिती** : विवाहित, पत्नी श्रीमती रेखादेवी.

**अपत्ये** : एकूण-३ (एक मुलगा व दोन मुली).

**व्यवसाय** : शेती व कायदा अध्यापन.

**पक्ष** : राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष.

**मतदारसंघ** : महाराष्ट्र विधानसभा सदस्यांद्वारा निर्वाचित.

**इतर माहिती** : संस्थापक व पाच वर्षे प्राचार्य, प्रियदर्शनी ज्ञान प्रबोधिनी विधी महाविद्यालय, फलटण; चेअरमन व नियामक मंडळाचे सदस्य, फलटण एज्युकेशन सोसायटी; आयएलएस विधी महाविद्यालय व सिम्बॉयसिस विधी महाविद्यालय प्राध्यापक; संस्थापक, श्रीमंत निर्मलादेवी मुद्रण संस्था, श्रीमंत निर्मलादेवी फौंडेशन, फलटण; विद्यार्थी चळवळ, अंधत्व निर्मूलन चळवळ, एड्स रोगाविषयी जनजागृतीसाठी परिषदा व परिसंवादांचे आयोजन; अंधत्व निवारण कार्यक्रम, रक्तदान शिबीर, भूकंपग्रस्तांना मदत, महिलांना विशेष अधिकार मिळवून देण्याचे प्रयत्न; गॅट करार व डंकेल प्रस्तावाबाबत शेतकऱ्यांना मार्गदर्शन; आधुनिक तंत्रज्ञान व माहिती तंत्रज्ञान, संगणक याबाबत मार्गदर्शन; लेझीम व हलगी वाद्य स्पर्धांचे आयोजन; गणेशोत्सव व शिवजयंती उत्सव कार्यक्रमांचे आयोजन; २०१३ पासून रयत शिक्षण संस्थेच्या जनरल बॉडीचे सभासद, क्रिकेटमध्ये नैपुण्य; १९६२ कप्तान, महाराष्ट्र स्कूल, १९६८ फर्ग्युसन कॉलेज आंतरमहाविद्यालयीन अजिंक्य संघ व पुणे

विद्यापीठ संघात समावेश, महाराष्ट्राच्या रणजी पूर्व क्रिकेट सामन्यात समावेश; सदस्य, पंचायत समिती फलटण व जिल्हा परिषद सातारा; १९९१-९६ नगराध्यक्ष, फलटण नगरपरिषद; नगरपरिषदेच्या कामांना न्याय मिळवून देण्यासाठी प्रयत्न; जकातीचे खाजगीकरण प्रयोगात यशस्वी प्रयत्न; फलटण शहरातील सांस्कृतिक भवन प्रकल्प पूर्ण करण्यासाठी प्रयत्न; सदस्य, महाराष्ट्र राज्य नगराध्यक्ष समिती; स्थानिक पातळीवर युवकांचे, शेतकऱ्यांचे, कामगारांचे संघटन करून त्यांचे प्रश्न सोडविण्यात पुढाकार; फलटण येथे औद्योगिक व बिगर औद्योगिक उद्योग सुरू करण्यासाठी विशेष प्रयत्न; कै. निर्मलादेवी ट्रस्टची स्थापना करून महिलांना उद्योग मिळवून देण्यात पुढाकार; २००१ पासून संचालक, सातारा जिल्हा सहकारी बँक लि.; १९९५-१९९९ उपाध्यक्ष, कृष्णा-खोरे सिंचन विकास महामंडळ; १९९५-९९, १९९९-२००४, २००४-२००९ सदस्य, महाराष्ट्र विधानसभा; नोव्हेंबर १९९९ ते जुलै २००४ महसूल व पुनर्वसन खात्याचे राज्यमंत्री; नोव्हेंबर २००४ ते डिसेंबर २००८ जलसंपदा (कृष्णा खोरे पाटबंधारे महामंडळ) खात्याचे मंत्री; डिसेंबर २००८ ते ऑक्टोबर २००९ जलसंपदा (कृष्णा खोरे पाटबंधारे महामंडळ) खात्याचे मंत्री; नोव्हेंबर २००९ ते मे २०१० जलसंपदा (कृष्णा खोरे पाटबंधारे महामंडळ) खात्याचे मंत्री; जुलै २०१० ते नोव्हेंबर २०१० जलसंपदा (कृष्णा खोरे पाटबंधारे महामंडळ) खात्याचे मंत्री; नोव्हेंबर २०१० ते ११ जून २०१३ जलसंपदा (कृष्णा खोरे पाटबंधारे महामंडळ) खात्याचे मंत्री म्हणून टेंभू आशिया खंडातील महत्वाकांक्षी उपसा सिंचन योजनेचा केंद्र शासनाच्या वेगवर्धित सिंचन लाभ योजनेत समावेश केला; उमरोडी, धोमबलकवडी प्रकल्प व कृष्णा कोयना उपसा सिंचन योजना यांना केंद्र शासनाच्या वेगवर्धित सिंचन लाभ योजनेत समावेश करण्यासाठी विशेष प्रयत्न; नवीन कृष्णा पाणी तंटा लवादापुढे महाराष्ट्र शासनाची बाजू सक्षमपणे मांडून राज्यास वाढीव ८१ टी.एम.सी. पाणी मिळविण्यात यशस्वी असे उल्लेखनीय कार्य केले; धोमबलकवडी प्रकल्प व निरा देवधर प्रकल्प उभारणीत महत्वाचे योगदान; कृष्णा खोरे महामंडळ उभारण्यात महत्वाचे योगदान व त्या माध्यमातून अवर्षणग्रस्त व शेतकरी बांधवाना न्याय मिळवून दिला; खंडकरी शेतकऱ्यांना रामराजे नाईक निंबाळकर समितीमार्फत

न्याय मिळवून दिला; राज्यमंत्री (महसूल) म्हणून कार्यरत असताना नोंदणीकृत कागदपत्रांचे संगणकीकरण करण्याबाबत पुढाकार; ७४ व्या घटना दुरूस्ती समितीचे सदस्य; जुलै २०१० ते जुलै २०१६ सदस्य, महाराष्ट्र विधानपरिषद; २० मार्च २०१५ ते ७ जुलै २०१६ सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद; जुलै २०१६ मध्ये महाराष्ट्र विधानपरिषदेवर फेरनिवड; ८ जुलै २०१६ रोजी महाराष्ट्र विधानपरिषदेचे सभापती म्हणून बिनविरोध निवड.

**परदेश प्रवास** : ऑस्ट्रेलिया, न्युझीलंड, सिंगापूर, चीन, युनायटेड किंगडम्, रशिया, स्वित्झरलँड, डेनमार्क, नॉर्वे, स्विडन, फिनलँड.

**छंद** : क्रिकेट, वाचन व कायदा अध्ययन.

**पत्ता** : (१) लक्ष्मी-विलास, लक्ष्मी नगर, मु.पो.ता. फलटण, जिल्हा सातारा ४१५ ५२३.

(२) “अजंठा”, नारायण दाभोळकर रोड, मलबार हिल, मुंबई-४०० ००६.

(३) मा.सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद, विधानभवन, मुंबई-४०००३२.

**दूरध्वनी** : (निवास) (०२२) २३६७६६३२/२३६७६६७३.
(कार्यालय) : (०२२) २२०२७३७३/२२०२४०८६.

**फॅक्स** : (०२२) २२८४६६५९.

**भ्रमणध्वनी** : ९८५०८८३३८८.

**ई-मेल** : ramrajennimbalkar@gmail.com.

❑❑❑



**मा. डॉ. (श्रीमती) नीलम दिवाकर गोऱ्हे**

**उप सभापती,**

**महाराष्ट्र विधानपरिषद**

## गोऱ्हे, डॉ. (श्रीमती) नीलम दिवाकर

**जन्म** : १२ सप्टेंबर, १९५४.

**जन्म ठिकाण** : पंढरपूर, जिल्हा सोलापूर.

**शिक्षण** : बी.एस.ए.एम. (मुंबई विद्यापीठ-पोद्दार आयुर्वेदिक महाविद्यालय). १९९२ बँकॉक येथील एशियन लोक विकास संस्थेत प्रशिक्षण विषयक डिप्लोमा.

**ज्ञात भाषा** : मराठी, हिंदी व इंग्रजी.

**वैवाहिक माहिती** : विवाहित, पती श्री. आनंद गोविंद करंदीकर.

**अपत्ये** : एकूण-१ (एक मुलगी).

**व्यवसाय** : वैद्यकीय/सामाजिक कार्य.

**पक्ष** : शिवसेना.

**मतदारसंघ** : महाराष्ट्र विधानसभा सदस्यांद्वारा निर्वाचित.

**इतर माहिती** : मानद-अध्यक्षा, स्त्री आधार केंद्र व क्रांतीकारी महिला संघटना, पुणे; १९९२ बँकॉक येथील एशियन लोकविकास संस्थेत प्रशिक्षण विषयक डिप्लोमा पूर्ण केला; पंचायत राज, महिला विकास, स्त्रियांवर होणारे अत्याचार या विषयांवर १००० च्या वर व्याख्याने दिली; हुंडा, सामाजिक विषमता, महिला सक्षमीकरण, महिला संघटन इत्यादी कार्यक्रमांचे आयोजन; १९९३ लातूर-उस्मानाबाद व २००० गुजरात येथील भूकंपग्रस्तांना तसेच, १९९३ मुंबई येथील बॉम्ब स्फोटातील कुटुंबियांना मदत कार्य; पूरग्रस्त तसेच २००६ साली मुंबई बॉम्बस्फोटानंतर नेपाळी कुटुंबियांना मदत कार्य; १९९०-९१ चित्रपट परिक्षण मंडळावर सदस्य म्हणून कार्य; १९९३-९४ नाट्य परिक्षण मंडळावर कार्य; पथनाट्य लेखन, महिला विषयक चित्रपट, नाटके यावरील समीक्षा; पाश्चात्य नाट्यकृती व कविता गायन कार्यक्रमांचे आयोजन; १९९९-२००० अध्यक्षा, महिला आर्थिक विकास महामंडळ; महाराष्ट्र राज्याच्या १९९४, १९९८, २००१ व २००३ च्या महिला धोरण निर्मितीत सहभाग; १९९२-९३ सदस्या,

भारतीय लोकविकास कार्यक्रम; १९९३-९५ सदस्या, महाराष्ट्र राज्य महिला आयोग; १९९८ सदस्या, पर्यावरण संतुलन व संरक्षण समिती, भारत सरकार; १९९४-९५ सदस्या, हुंडा निर्मूलन समिती व कायदा सहाय्य समिती; १९९२-९८ यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानच्या महाराष्ट्र महिला व्यासपीठाच्या निमंत्रक; २००० पासून पश्चिम महाराष्ट्र संपर्क प्रमुख, शिवसेना महिला आघाडी; स्त्री मतदारांच्या जाहीरनामा कार्यक्रमात सहभाग; शिवसेनेच्या सर्व आंदोलनात सहभाग; शिवसेना-भाजप वचननामा २००४ समितीच्या सदस्या; २०१०-२०१४ शिवसेनेच्या पुणे जिल्हा संपर्क नेत्या; सन २००७-२०२१ शिवसेना पक्षाच्या प्रवक्त्या; १९९९, २००४, २००९, २०१४ मधील निवडणूकांमध्ये शिवसेनेच्या स्टार प्रचारक; २००४ सिनेट सदस्या, शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर; २०१६-२०१८ सिनेट सदस्या, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ; महाराष्ट्रातील ५००० पेक्षा अधिक कुंटुंबे व महिलांना कायदेशीर मदत, सल्ला, मार्गदर्शन, समुपदेशन सेवा उपलब्ध करून देण्यात पुढाकार; घरगुती हिंसाचार, बलात्कार, छळ अशा विषयांमध्ये महिलांच्या मदत गटांची स्थापना, स्त्री आधार केंद्रामार्फत न्यायालयात न्याय मिळवून देण्यासाठी सहाय्य व सक्रिय सहभाग; कट्टर शिवसैनिक म्हणून पश्चिम महाराष्ट्र , विदर्भ, मराठवाडा, खान्देश, कोंकण आदि भागात कार्यरत; २०१५ पासून विधान परिषदेतील शिवसेनेच्या मुख्य प्रतोद म्हणून कार्यरत; २००५ शिवसेना उपनेत्या;  २००७-२०२१ शिवसेना पक्षाच्या प्रवक्त्या म्हणून सामाजिक न्याय, राजकिय भूमिका या विषयांवर मराठी, हिंदी व इंग्रजी वाहिन्यांवर ६००० चर्चा सत्रात सहभाग; जनसाथी दुष्काळ निवारण मंचच्या माध्यमातून महाराष्ट्रभर शेतकरी, महिला यांच्या करीता रोजगार विषयक कार्य, आंतरराष्ट्रीय पातळीवरील डेव्हलपमेंट सपोर्ट टीमच्या स्व मदत गट आणि मुलांच्या हक्क विषयक परिषदेत सहभाग; खाण कामगार संदर्भात कार्य; २०१२-२०१५ आदिवासी करीता विदर्भ विकास मंचच्या माध्यमातून संयुक्त वनीकरण कार्यक्रमाबाबत जागृती; २०१०-२०१४ महिलांकरीता निर्भया मोहिमेच्या माध्यमातून काम; २००२-२००६ एशिया पॅसिफिक फोरममध्ये सहभाग; महाराष्ट्रातील पोलीस अधिकारी- कर्मचारी यांच्यासाठी महिलांच्या कायद्याविषयी संवेदनशीलता वाढविण्याच्या हेतूने १०० पेक्षा अधिक कृतीसत्रांचे

आयोजन; महिला केस मधील न्यायाधिशांची संवेदनशीलता वाढवून लवकर निकाल लागावेत यासाठी युएनडीपी आयोजित परिषदेत सहभाग; १९८१-१९९२ महाराष्ट्रातील दुर्गम आणि मागास क्षेत्रात वैद्यकिय सेवा कार्य; १९८५-१९९४ भुमिहिन मजुरांच्या हक्कासाठी कार्य; दलित आणि भटक्या जमातीसाठी विकास चळवळीत काम; महिला व मुलींच्या अनैतिक व्यापार क्षेत्रात मुलींच्या संरक्षणात कायदेशीर मदत व आधार देण्याचे काम; मुस्लीम महिलांमधील अल्प वयात लग्न, तोंडी तलाक देण्याच्या विषयावर राष्ट्रीय पातळीवर कार्यशाळेचे आयोजन; दलित अत्याचार व महिला अत्यांचाराच्या घटनांमध्ये पिडीत कुंटुंबांना प्रत्यक्ष भेटी देऊन आधार देण्याचे काम अव्याहतपणे सुरू; १९९३ ते आजतागायत लातूर परिसरातील भुकंपग्रस्त महिलांसाठी विशेष कार्य; १९९६-२००० नाओ या ख्यातनाम आंतरराष्ट्रीय संस्थेच्या उपक्रमात सहभाग; ट्रान्स एशियन चेंबर्स ऑफ कॉमर्सच्या महिला सक्षमीकरण विभागाच्या उपाध्यक्षा; स्त्री आधार केंद्राच्या वतीने ट्रान्स एशियन चेंबर्स ऑफ कॉमर्स सोबत राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन विषयावर मुंबई येथे कार्य शाळेचे आयोजन; ४४ देशांच्या प्रतिनिधींची उदयपूर राजस्थान येथे आरोग्य व प्रजनन हक्काविषयी आंतरराष्ट्रीय कार्य शाळेचे आयोजन; भारताकरीता महिला धोरण ठरविण्याकरीता संयुक्त राष्ट्रसंघाच्या आर्थिक व सामाजिक परिषदेच्या सहकार्याने प्रयत्न; २००२-२००८, २००८-२०१४, २०१४-२०२० सदस्या, महाराष्ट्र विधानपरिषद; सन २०१५ ते २०१८ समिती प्रमुख, विधानपरिषद विशेष हक्क समिती, विधीमंडळाच्या महिला तदर्थ समिती, विधानपरिषद आश्वासन समिती, महिलांचे हक्क व कल्याण समिती, पंचायत राज समिती, अंदाज समिती, विधानपरिषद कामकाज सल्लागार समितीच्या सदस्या; २०१९ मध्ये बीड येथील अवैध शस्त्रक्रिया करून महिलांची गर्भ पिशवी काढणाऱ्या प्रकरणांची चौकशी करण्यासाठी नेमण्यात आलेल्या समितीच्या अध्यक्षा; २०१३-२०१४ एचआयव्ही/एड्स जन जागृती समिती, २०१५-२०१८ गर्भलिंगनिदान प्रतिबंध कायदा समिती, २०१७-२०१८ महिलांच्या सुरक्षा विषयक आय.टी. समितीच्या सदस्या म्हणून कार्य; राष्ट्रकुल संसदीय मंडळाच्या महाराष्ट्र शाखेतर्फे दिनांक ५ जुलै २००९ रोजी भारताच्या राष्ट्रपती महामहिम श्रीमती प्रतिभाताई पाटील यांच्या हस्ते

विधानपरिषदेतील “उत्कृष्ट भाषण” पुरस्कार प्राप्त; सन २०२० मध्ये महाराष्ट्र विधानपरिषदेवर फेरनिवड; २४ जून, २०१९ ते २४ एप्रिल २०२० पर्यंत महाराष्ट्र विधानपरिषदेच्या उप सभापती. ८ सप्टेंबर, २०२० पासून उप सभापती पदी फेरनिवड.

**लेखन व प्रकाशन** : साहित्यिक वारसा :- राजकवी चंद्रशेखर शिवराम गोऱ्हे यांचा परिवार वारसा; श्रीमती लतिका गोऱ्हे (देशपांडे) यांच्या घराण्याचा कवि श्रीधर यांचा वारसा, त्याचबरोबर सासरे विंदा करंदीकर यांच्याकडून साहित्यिक वारसा मिळाला. साहित्य समीक्षा विषयाची आवड, कथासंग्रह व विविध वृत्तपत्रांमधून लिखाण; ‘उरल्या कहाण्या’ हा कथासंग्रह व ‘नारीपर्व’, ‘माणूसपणाच्या वाटेवर’, ‘महिला आणि समाज’, ‘एक प्रवास संघर्षाचा’, ‘महाराष्ट्राच्या महिलांचा कायदेविषयक दर्जा’, ‘पिडीत महिलांओकी सहेली’ व ‘आम्ही स्त्रिया’ या दिवाळी अंकाचे संपादन; ‘पोलिस मार्गदर्शक’, ‘स्त्रिया समान भागीदार’, ‘कौटुंबिक हिंसाचार विरोधी कायदा’, ‘वेध स्त्री प्रश्नांचा’, ‘विधानपरिषद-माझे कामकाज-माझा सहभागः सन २००२-२००७’, ‘विधानपरिषद माझे कामकाजः कायदा-सुव्यवस्था सन २००२-२०१३’, ‘विधानपरिषद-माझे कामकाज-माझा सहभागः सन २००७-२०१३’, ‘शिवसेनेतील माझी २० वर्षे’ इत्यादी पुस्तकांचे लेखन; ‘पूर्वाः मुलींच्या अधिकाराची’, ‘महिला मंडळ मार्गदर्शक’, ‘अन्यायग्रस्त महिलांची मैत्रीण’, ‘पंचायतराज मार्गदर्शक’, ‘महिला विकासाची एकाकी वाटचाल’, ‘महिला विकासाची जागतिक कृतिरूपरेषा’, ‘स्त्री आरोग्याची कुळकथा’, ‘स्त्रियांचा निर्णय प्रक्रियेतील सहभाग’, ‘स्त्रीया व कायदा’, ‘आरोग्यातून विकासाकडे’, ‘शरीराची ओळख’, ‘महिला संबंधी धोरण’ (१९९४): ‘स्वयंसिद्धतेकडे वाटचाल’, ‘नव्या शतकासाठी महिला धोरणे व अंमलबजावणी’ आणि ‘भिंतीमागचा आक्रोश’ या पुस्तकांचे संपादन. तसेच, ‘Wail Behind the Wall’, ‘Legal status of Women in Maharashtra’, ‘Women in decision making’, ‘A lonely path to development’, ‘Girl Child in oblivion’ या इंग्रजी पुस्तकांचे संशोधन व संपादन तसेच अनेक वृत्तपत्रांमध्ये व नियतकालिकांमध्ये महिला विषयक लेखांचे सतत लेखन करून समाज जागृतीचे कार्य.

**पुरस्कार** : 'उरल्या कहाण्या' या कथा संग्रहास १९९० चा महाराष्ट्र साहित्य परिषदेचा सर्वोत्कृष्ट कथासंग्रह पुरस्कार प्राप्त; १९९४ मध्ये सर्वोत्कृष्ट कथेला किर्लोस्कर पारितोषिक प्राप्त; शशिकला जाधव उत्कृष्ट समाजसेविका पुरस्कार प्राप्त; १९९९ मुंबई महानगरपालिकेतर्फे उत्कृष्ट समाजसेविका पुरस्कार प्राप्त; राष्ट्रीय कुल संसदीय मंडळाच्या महाराष्ट्र शाखेतर्फे दिनांक ५ जुलै, २००९ रोजी भारताच्या राष्ट्रपती महामहिम श्रीमती प्रतिभाताई पाटील यांच्या हस्ते विधानपरिषदेतील 'उत्कृष्ट भाषण' पुरस्कार प्राप्त; २०१५ आयकॉन फाऊन्डेशन नाशिक यांचा पुरस्कार; २०१६ दैनिक नवशक्ती यांचा जीवन गौरव पुरस्कार; २०१६ दैनिक लोकमत यांचा उत्कृष्ट महिला आमदार पुरस्कार; २०१७ सार्वजनिक वाचनालय नाशिक यांचा कार्यक्षम आमदार पुरस्कार प्राप्त.

**परदेश प्रवास** : १९९० मध्ये स्वीडन व २००० मध्ये ऑस्ट्रिया येथील संशोधन संस्थांत प्रबंधांचे वाचन; १९९६-२००१, २००७-२०१० व २०१५-२०१८ न्युयॉर्क येथील जागतिक महिला आयोगाच्या चर्चासत्रात सतत सोळा वर्षे सहभाग; १९९५ बिजिंग येथील चौथ्या विश्व महिला संमेलनात सहभाग; बँकॉक येथील महिला विकास परिषदेत सहभाग; नेपाळ, बांग्लादेशचा अभ्यास दौरा; आशियाई पॅसिफिक एनजीओ फोरम बिजींग २००४ बँकॉक येथील बैठकीत सहभाग; सपत या दक्षिण आशियाई व्यासपीठाच्या निमंत्रक, राष्ट्रकूल संसदीय मंडळ महाराष्ट्र शाखेद्वारे ऑस्ट्रेलिया, न्युझिलंड, सिंगापुर, चीन, स्वीडन, रशिया, इंग्लंड, फिनलँड, स्वीत्झरलँड, डेन्मार्क इत्यादी देशांचा संसदीय अभ्यास दौरा.

**छंद** : लेखन, वाचन व महिला विषयक कार्य.

**पत्ता** : (१) घर क्र. ११०५/१, सिल्व्हर रॉक्स, हरेकृष्ण मंदिर मार्ग, मॉडेल कॉलनी, शिवाजी नगर, पुणे ४११ ०१६.

**दूरध्वनी** : (०२०) २५६५२१७२, २४२२५७४८.

**भ्रमणध्वनी** : ९८२२०२२१५५, ९५९५४५५८८८, ९८२०३५१२७५.

(२) उप सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद, विधान भवन, मुंबई-४०००३२.

(३) क-३, शासकीय कुटीर, मादाम कामा रोड, मुंबई-४०००३२.

**ई-मेल** : asmita.jagruti@gmail.com.
neeilamgorhe@gmail.com.
**वेबसाईट** : www.neelamgorheshivsena.org

❑❑❑



## भागवत, श्री. राजेन्द्र गजानन
**प्रधान सचिव**

**जन्म** : १० एप्रिल, १९६३.

**जन्म ठिकाण** : सावंतवाडी, जिल्हा सिंधुदूर्ग.

**शिक्षण** : बी.कॉम., एलएल. एम. (मुंबई विद्यापीठ).

**ज्ञात भाषा** : मराठी, हिंदी, इंग्रजी, संस्कृत, कोकणी व गुजराथी.

**वैवाहिक माहिती** : विवाहित, पत्नी श्रीमती गायत्री.

**अपत्ये** : एकूण १ (एक मुलगा)

**इतर माहिती** : सन १९८८-१९८९ मध्ये शैक्षणिक गुणवत्तेमुळे मुंबई विद्यापीठाच्या अधिसभेवर (सिनेट) नामनियुक्ती; सन १९८७-१९९६ या कालावधीत मुंबई उच्च न्यायालयात वकिली व तीन महत्त्वपूर्ण न्यायनिर्णयामध्ये महत्त्वाची भूमिका; सन १९९६ मध्ये महाराष्ट्र लोकसेवा आयोगाद्वारे महाराष्ट्र शासनाच्या विधी व न्याय विभागाच्या विधिविधान शाखेचे सहायक प्रारूपकार तथा अवर सचिव या पदावर सेवाप्रवेश; सन २००३-२००४ उप प्रारूपकार नि-उप सचिव पदावर आणि तदनंतर प्रारुपकार-नि-सहसचिव पदावर पदोन्नती; सन २०१७ मध्ये सचिव (विधिविधान) पदावर नियुक्ती तसेच संसदीय कामकाज विभागाच्या सचिव पदाचा अतिरिक्त कार्यभार; दिनांक ५ नोव्हेंबर, २०१९ ते २ सप्टेंबर, २०२० महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाचे सचिव (कार्यभार); दिनांक ३ सप्टेंबर, २०२० पासून महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाचे प्रधान सचिव.

**छंद** : वाचन, लेखन, संगीत, संसदीय प्रथा व परंपरा आणि सांविधानिक विधी व्यासंग.

**पत्ता** : ७०१, नीलांबरी, महर्षी कर्वे मार्ग, नरिमन पॉईंट, अग्नीशमन केंद्रासमोर, मुंबई ४०० ०२१.

**मोबाईल** ९३२३९५३९२९.

**ई-मेल** : rajendra.bhagwat@nic.in

❑❑❑

# महाराष्ट्र विधानपरिषद
# सदस्यांचा संक्षिप्त जीवन परिचय



## आसगावकर, श्री. जयंत दिनकर

| | |
|---|---|
| **जन्म** | : १५ फेब्रुवारी, १९६७. |
| **जन्म ठिकाण** | : कोल्हापूर, जिल्हा-कोल्हापूर. |
| **शिक्षण** | : बी. ए., डी. ए. ई. |
| **ज्ञात भाषा** | : मराठी, हिंदी व इंग्रजी. |
| **वैवाहिक माहिती** | : विवाहित, पत्नी-श्रीमती अनु. |
| **अपत्ये** | : एकूण १ (एक मुलगा). |
| **व्यवसाय** | : अद्यापन. |
| **पक्ष** | : भारतीय राष्ट्रीय काँग्रेस. |
| **मतदारसंघ** | : पुणे विभाग शिक्षक. |
| **इतर माहिती** | : सदस्य, माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, कोल्हापूर; सदस्य, एम.सी.व्ही.सी. रूपांतर समिती; डिसेंबर,२०२० मध्ये महाराष्ट्र विधानपरिषदेवर निर्वाचित. |
| **परदेश प्रवास** | : श्रीलंका, हाँगकाँग, मलेशिया, मकाऊ, बाली, सिंगापूर, फुकेट (थायलंड) इत्यादी देशांचा दौरा. |
| **छंद** | : वाचन, लेखन व खेळ. |
| **पत्ता** | : आर.एस. नं २०९/ए/१, बी.विंग. क्लाईड होम्स, आयकर भवन जवळ, ताराबाई पार्क, कोल्हापूर ४१६ ००६. |

**भ्रमणध्वनी** : ९९२३१५२५२५,७७९८१५२५२५, ९२८४२८३०२१, ७२६२९५२५२५.

**ई-मेल** : jda9799@gmail.com.

❑❑❑



## आंबटकर, डॉ. रामदास भगवानजी

| | |
|---|---|
| **जन्म** | : १ जुलै, १९६० |
| **जन्म ठिकाण** | : वडनेर, तालुका-हिंगणघाट, जिल्हा-वर्धा. |
| **शिक्षण** | : बी.ए.एम.एस. (नागपूर विद्यापीठ) |
| **ज्ञात भाषा** | : मराठी, हिंदी व इंग्रजी. |
| **वैवाहिक माहिती** | : विवाहित, पत्नी डॉ. गीता. |
| **अपत्ये** | : एकूण-२ (एक मुलगा व एक मुलगी). |
| **व्यवसाय** | : शेती. |
| **पक्ष** | : भारतीय जनता पक्ष. |
| **मतदारसंघ** | : वर्धा-चंद्रपूर-गडचिरोली स्थानिक प्राधिकारी संस्था. |
| **इतर माहिती** | : १९९५-२०१० सिनेट सदस्य, स्थायी समिती अध्यक्ष, व्यवस्थापन परिषद सदस्य, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापीठ, नागपूर; संयोजक, विद्यापीठ उपकेंद्र, गडचिरोली; १९९२-१९९५ संचालक, नागपूर नागरिक सहकारी बँक लि.; संचालक, अकोला अर्बन बँक; २००४-२०१५ पश्चिम विदर्भ संघटन मंत्री, भारतीय जनता पक्ष; २०१५-२०२० पासून सरचिटणीस, महाराष्ट्र प्रदेश भारतीय जनता पक्ष; जून २०१८ मध्ये महाराष्ट्र विधानपरिषदेवर निवड. |

**छंद** : वाचन व गायन.

पत्ता : पत्ता : अपार्टमेंट नं. २०१, दुसरा मजला, प्लॉट नं.९६, प्रणव-१, पांडे लेआऊट, खामला, नागपूर-४४० ०२५.

**दुरध्वनी** : (निवास) (०७१२) २२९३४३३.

**भ्रमणध्वनी** : ९४२२११३००७, ९०९६०८९८३५.

**ई-मेल** : dr.ramdasambatkar@gmail.com

❑❑❑



## कदम, श्री. मोहनराव श्रीपती

| | |
|---|---|
| **जन्म** | : १५ जून, १९३६ |
| **जन्म ठिकाण** | : येडेमच्छिंद्र, ता. वाळवा, जि.सांगली. |
| **शिक्षण** | : सातवी. |
| **ज्ञात भाषा** | : मराठी. |
| **वैवाहिक माहिती** | : विवाहित, पत्नी श्रीमती यशोदा. |
| **अपत्ये** | : एकूण-३ (दोन मुलगे, एक मुलगी). |
| **व्यवसाय** | : शेती. |
| **पक्ष** | : भारतीय राष्ट्रीय काँग्रेस. |
| **मतदारसंघ** | : सांगली-सातारा स्थानिक प्राधिकारी संस्था. |
| **इतर माहिती** | : सदस्य, भारती विद्यापीठ नियामक मंडळ; सदस्य, रयत शिक्षण संस्था, सातारा; अध्यक्ष, सोनहिरा सहकारी दुध उत्पादक संघ; अध्यक्ष, खानापूर-कडेगाव तालुका देखरेख संघ; १९९० पासून संचालक, सागरेश्वर सहकारी सुतगिरणी लि.; १९९९ पासून चेअरमन, सोनहिरा सहकारी साखर कारखाना लि. वांगी; २००० पासून संचालक, महाराष्ट्र राज्य सहकारी संघः १९६४-१९६७ सरचिटणीस, खानापूर तालुका काँग्रेस कमिटी; १९७८ ते २००२ व २०१४ पासून अध्यक्ष सांगली |

जिल्हा काँग्रेस कमिटी; १९६७ सरपंच, ग्रामपंचायत सोनसळ; १९९०-९५ सभापती, खानापूर तालुका पंचायत समिती; १९७२-२००२ सदस्य व १९९५-१९९९ अध्यक्ष, जिल्हापरिषद सांगली; उल्लेखनीय सामाजिक कार्याबद्दल "राष्ट्र निर्माणरत्न पुरस्कार २००२", 'भारतीय उद्योगरत्न पुरस्कार', 'सहकार रत्न पुरस्कार', 'कृषीरत्न पुरस्कार', 'राज्यस्तरीय श्री. पुरस्कार' तसेच महाराष्ट्र शासनाचा 'छत्रपती शिवाजी महाराज वनश्री पुरस्कार २०१०' अशा विविध पुरस्कारांनी सन्मानित; डिसेंबर २०१६ मध्ये महाराष्ट्र विधानपरिषदेवर निवड.

**परदेश प्रवास** : ब्राझील देशाचा अभ्यास दौरा.

**छंद** : समाजसेवा.

**पत्ता** : (१) मु.पो.वाजेगांव गावठाण, चिंचणी (वांगी), ता.कडेगाव, जि. सांगली.
(२) सोनहिरा सहकारी साखर कारखाना, वांगी, ता. कडेगाव, जि. सांगली.

**दूरध्वनी** : (निवास) : ०२३४७-२३२५२५/२३२६२५.

**(कार्यालय)** : ०२३४७-२३५८०२/२३५८०४.

**भ्रमणध्वनी** : ९८२२०९७०५०.

**ई-मेल** : sonhirasakhar@yahoo.co.in

❑❑❑



## कराड, श्री. रमेश काशीराम

**जन्म** : ३० मे, १९६७.

**जन्म ठिकाण** : रामेश्वर , तालुका-जिल्हा-लातूर.

**शिक्षण** : बी.कॉम., बी.एड.

**ज्ञात भाषा** : मराठी, हिंदी व इंग्रजी.

**वैवाहिक माहिती** : विवाहित, पत्नी श्रीमती संजिवनी.

**अपत्ये** : एकूण-३ (दोन मुलगे व एक मुलगी).

**व्यवसाय** : शेती.

**पक्ष** : भारतीय जनता पक्ष.

**मतदारसंघ** : महाराष्ट्र विधानसभा सदस्यांद्वारा निर्वाचित.

**इतर माहिती** : १९८९ ते २०१९, मुख्याध्यापक, श्री. सरस्वती माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, रामेश्वर; २०१५ पासून संचालक, लातूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लिमीटेड; २०१५ पासून तज्ञ संचालक, उच्चतम कृषी उत्पन्न बाजार समिती, लातूर; कार्यकारी संचालक, एम.आय.एम.एस.आर. वैद्यकिय महाविद्यालय, एम.आय.एस.आर दंत महाविद्यालय, एम.आय.पी. फिजीओथेरपी कॉलेज, एम.आय.एन.एस. नर्सिंग कॉलेज, लातूर व यशवंतराव चव्हाण ग्रामीण रूग्णालय, लातूर; संस्थापक-अध्यक्ष, विश्वकल्याण सामाजिक पतसंस्था, लातूर; सदस्य,

महाराष्ट्र प्रदेश कार्यकारिणी, भारतीय जनता पक्ष; उपाध्यक्ष, भारतीय जनता युवा मोर्चा; जिल्हाध्यक्ष, लातूर जिल्हा भारतीय जनता पक्ष; शेतकऱ्यांच्या कर्ज माफी व वीज बील माफीसाठी आंदोलन; शेतकरी व शेतमजूरांना आर्थिक सहाय्य; दिव्यांग व्यक्तींना सायकल, कुबड्या व श्रवणयंत्रांचे वाटप; १३५ सामूहिक विवाह सोहळ्यांचे आयोजन; पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी दीड लाख वृक्षांचे वृक्षरोपण; आरोग्य शिबीरासह रक्तदान शिबीरांचे आयोजन; कोरोना काळात अनेक कुटुंबांना शिधा वाटप; श्रीमती प्रयाग अक्का कराड आरोग्य योजनेतून ७५ हजार कुटुंबांना दत्तक घेतले; २००७ पासून राष्ट्रधर्म पूजक दादाराव कराड राज्यस्तरीय महाराष्ट्र महावीर कुस्ती स्पर्धेचे आयोजन; सामाजिक क्षेत्रात उल्लेखनिय कार्यासाठी दिला जाणारा डॉ. बाबासाहेब आंबेडकर दलित मित्र पुरस्काराने सन्मानित; मे २०२० मध्ये महाराष्ट्र विधानपरिषदेवर निर्वाचित.

**छंद** : शेती, दुग्धव्यवसाय.

**पत्ता** : (१) 'प्रयाग निवास', विश्वनाथपूरम, एम.आय.टी. परिसर, अंबाजोगाई रोड, लातूर.

(२) मु. पो. रामेश्वर (रूई), ता. जि.लातूर.

**दूरध्वनी** : (निवास) (०२३८२) २२७३२८.

**भ्रमणध्वनी** :९८२२४३२३३३, ९१५८७९००००.

**ई-मेल** : rkkarad@gmail.com

❑❑❑



## कायंदे, डॉ. मनीषा श्यामसुंदर

**जन्म** : १० फेब्रुवारी, १९६३

**जन्म ठिकाण** : मुंबई.

**शिक्षण** : एम. एस्सी., पी.एचडी., डी.एम.एल.टी., बी.एड.

**ज्ञात भाषा** : मराठी, हिंदी व इंग्रजी.

**वैवाहिक माहिती** : अविवाहित.

**व्यवसाय** : अध्यापन.

**पक्ष** : शिवसेना.

**मतदारसंघ** : महाराष्ट्र विधानसभा सदस्यांद्वारा निर्वाचित.

**इतर माहिती** : १९८६-८७ सहायक प्राध्यापिका, एस.आय.ई.एस. कॉलेज, सायन; १९८७-१९८८ सहायक प्राध्यापिका, विल्सन कॉलेज, मुंबई; सहायक प्राध्यापिका, हजारीमल सोमानी कॉलेज, मुंबई; १९९०-१९९४ सहायक प्राध्यापिका, एम.व्ही. अँड एल.यु.जे. कॉलेज, मुंबई; १९९४-२००६ सहायक प्राध्यापिका, २००६-२०१८ असोसिएट प्रोफेसर (प्राणिशास्त्र), महर्षी दयानंद महाविद्यालय, परळ, मुंबई; आजीव सदस्या, बॉम्बे नॅचरल हिस्ट्री सोसायटी, कुलाबा, मुंबई; सदस्या, बोर्ड ऑफ गव्हर्निंग कौन्सिल महाराष्ट्र सोसायटी, नेचर पार्क, धारावी, मुंबई; आजीव सदस्या, फोरम फॉर फेअरनेस इन एज्युकेशन, दादर, मुंबई; २००३-२००५ सदस्या, सबर्बन रेल युजर्स कन्सलटेटिव्ह कमिटी; आजीव सदस्या, नॅशनल

सोसायटी फॉर प्रिवेंशन ऑफ ब्लाईंडनेस, दादर, मुंबई; १९९५-१९९७ सदस्या, जिल्हा नियोजन समिती, मुंबई शहर; १९९६-२००० सदस्या, महिला दक्षता समिती (मुंबई पोलिस); १९९५-२००० विशेष कार्यकारी दंडाधिकारी; प्रवक्त्या, शिवसेना पक्ष; शिवसेना महिला संपर्क प्रमुख, औरंगाबाद व जालना जिल्हा; १९९७-२००८ स्वीकृत सदस्या, शिक्षण समिती, महानगरपालिका, मुंबई; विश्वस्त, साई संस्थान, शिर्डी; संस्थापिका-अध्यक्षा, अवनी फाऊंडेशन, मुंबई; जुलै २०१८ मध्ये महाराष्ट्र विधानपरिषदेवर निर्वाचित.

**परदेश प्रवास** : न्युझीलंड, स्वीडन, थायलँड, बँकॉक, सिंगापूर, मलेशिया व मॉरिशस इत्यादी देशांचा अभ्यास दौरा.

**छंद** : वाचन, पर्यावरण व वन्यजीवन अभ्यास.

**पत्ता** : ५-२२/१, रूपल अपार्टमेंट, ९८, दादासाहेब फाळके रोड,
दादर (पूर्व), मुंबई-४०० ०१४.

**दूरध्वनी** : कार्यालय : ७९७७४६६०८५.

**भ्रमणध्वनी** : ९८२०२३६३०४.

**ई-मेल** : manishakayande@rediffmail.com.

❑❑❑



## काळे, श्री. विक्रम वसंतराव

**जन्म** : १ जुलै, १९६८.

**जन्म ठिकाण** : पळसप, जिल्हा-उस्मानाबाद.

**शिक्षण** : बी.ए., बी.एड.

**ज्ञात भाषा** : मराठी, हिंदी व इंग्रजी.

**वैवाहिक माहिती** : विवाहित, पत्नी श्रीमती शुभांगी.

**अपत्ये** : एकूण-३ (एक मुलगा व दोन मुली).

**व्यवसाय** : सामाजिक कार्य.

**पक्ष** : राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष.

**मतदारसंघ** : औरंगाबाद विभाग शिक्षक.

**इतर माहिती** : १५ वर्षे प्राचार्य, कनिष्ठ महाविद्यालय, ८ वर्षे चेअरमन, शिक्षक पतसंस्था, ५ वर्षे विद्यापीठ सिनेट सदस्य, ३ वर्षे सदस्य, एस.एस.सी. व एच.एस.सी. बोर्ड; जिजामाता माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, एम.आय.डी.सी., लातूर येथे नोकरी; २००२ चेअरमन, लातूर तालुका खाजगी शिक्षक सह. पतसंस्था, लातूर; चेअरमन, वसंतराव काळे शिक्षक कर्मचारी सहकारी पतसंस्था; विश्वस्त, किसान शिक्षण प्रसारक मंडळ, बोरगाव (काळे), ता.जि. लातूर; २००२ सदस्य, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाचे विभागीय मंडळ, लातूर व पुणे विभागीय मंडळ; १९९२ विद्यापीठ प्रतिनिधी; कलकत्ता येथील

राष्ट्रीय सेवा योजनेच्या राष्ट्रीय एकात्मता शिबीरात महाराष्ट्र राज्याचे नेतृत्व; १९९४ विद्यार्थी संसद पॅनेलचे नेतृत्व; १९९४ संस्थापक, किसान वाचनालय पळसप; वाचनालयामार्फत व्याख्यानमालेचे आयोजन; १९९४ लोकनायक विद्यालय, नायगाव, येथे शिक्षक म्हणून नोकरी व तेथे उत्कृष्ट अध्यापनासाठी विषय समित्या सक्षम बनविण्यासाठी प्रयत्न; ५ वर्षे सिनेट सदस्य, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, या काळात विद्यापीठाचे लातूर येथे उपकेंद्र सुरू करण्यासाठी विशेष प्रयत्न, विद्यापीठ परिसरात शिक्षण शास्त्र पदव्युत्तर शिक्षणाची सोय तसेच विद्यार्थ्यांचे शैक्षणिक शुल्क वाढवू नये यासाठी आग्रही भूमिका; शिक्षण महर्षी वसंतराव काळे यांच्या पुण्यतिथीनिमित्त दरवर्षी दि. २ फेब्रुवारी या दिवशी मराठवाडास्तरीय एक दिवसाचे 'ग्रामीण साहित्य संमेलनाचे आयोजन'; मराठवाडा विभागातील उत्कृष्ट काम करणाऱ्या शिक्षकांना दरवर्षी 'वसंतराव काळे सेवा गौरव', "आदर्श शिक्षक पुरस्कार" देऊन त्यांच्या कार्याचा गौरव करण्याचा उपक्रम सुरू केला. प्रदेश कार्यकारणी सदस्य, राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष; नॅशनल इंटिग्रेशन ऑफ ईकॉनॉमिक्स कौन्सिल, दिल्ली या संस्थेचा शैक्षणिक क्षेत्रातील उत्कृष्ट कार्याबद्दलचा "इंदिरा गांधी सद् भावना" पुरस्कार प्राप्त; इंटरनॅशनल गोल्ड स्टार मिलेनियम ॲवॉर्ड ने सन्मानित; शिक्षक आमदार आपल्या दारी हा उपक्रम राबवून प्रत्येक जिल्ह्यात "शिक्षक दरबार" कार्यक्रमांचे आयोजन; २००६-२०१०, २०१०-२०१६, सदस्य, महाराष्ट्र विधानपरिषद, फेब्रुवारी, २०१७ मध्ये महाराष्ट्र विधानपरिषदेवर फेरनिवड.

**परदेश प्रवास** : युरोप, थायलंड व दुबई इत्यादी देशांचा अभ्यास दौरा.

**छंद** : लोकांना भेटणे, प्रवास करणे, मराठी-हिंदी गाणी ऐकणे व जनसेवा करणे.

**पत्ता** : (१) मु.पो.पळसप, तालुका व जिल्हा उस्मानाबाद-४१३५०९.
(२) 'वसंत विहार', महाराष्ट्र हौसिंग सोसायटी, बार्शी रोड, लातूर ४१३ ५१२.

**दूरध्वनी** : (निवास) ०२३८२-२२२२११.
(कार्यालय) ०२३८२-२२०३९३.

**भ्रमणध्वनी** : ९४२२०७२९९०, ९४२२०७२९९१, ९९६००६२४४५.

**ई-मेल** : vvkmlc@rediffmail.com

❑❑❑



## खोत, श्री. सदाशिव रामचंद्र

**जन्म** : १ जून, १९६५.

**जन्म ठिकाण** : मरळनाथपूर, ता. वाळवा, जि. सांगली.

**शिक्षण** : सातवी.

**ज्ञात भाषा** : मराठी व हिंदी.

**वैवाहिक माहिती** : विवाहित, पत्नी श्रीमती सुमन.

**अपत्ये** : एकूण-२ (दोन मुलगे).

**व्यवसाय** : शेती.

**पक्ष** : भारतीय जनता पक्ष.

**मतदारसंघ** : महाराष्ट्र विधानसभा सदस्यांद्वारा निर्वाचित.

**इतर माहिती** : संस्थापक, कै. रामचंद्र नाना खोत विविध कार्यकारी सेवा सोसायटी लि. मरळनाथपूर; संस्थापक, मरळनाथ दुध उत्पादक सहकारी संस्था लि.; संस्थापक, मरळनाथ सार्वजनिक वाचनालय; १९९०-९२ अध्यक्ष, वाळवा तालुका, १९९२ सांगली जिल्हा अध्यक्ष, २००२ पश्चिम महाराष्ट्र अध्यक्ष, २००२ युवा आघाडी अध्यक्ष, शेतकरी संघटना; २००७ ते २०१७ स्वाभिमानी शेतकरी संघटना; सन १९८६ ते २०१७ शरद जोशी यांच्या नेतृत्वाखाली शेतकरी संघटनेच्या कार्यात सक्रिय; २०१७ पासून संस्थापक-अध्यक्ष, रयत क्रांती संघटना; सन १९९६

मध्ये ऊस झोन बंदी विरोधात झालेल्या आंदोलनात सक्रिय सहभाग व कारावासः सन २००० मध्ये कापसाला दर मिळावा यासाठी सेवाग्राम ते नागपूर पदयात्रा काढली; सन २००२ मध्ये पुणे जिल्ह्यातील दौंड येथे युवा अधिवेशनाचे आयोजन; दुध, ऊस, सोयाबीन, कापूस, पाणी इत्यादी प्रश्नांसाठी शेतकरी संघटनेच्या माध्यमातून राज्यभर आंदोलनांचे नेतृत्व व दोन वेळा कारावास; सन २००८ मध्ये शेतकरी कर्जमुक्तीसाठी नाशिक ते कोल्हापूर मोटारसायकल रॅलीचे आयोजन; सन २०११ मध्ये पाण्याचा अग्रक्रम शेतीला देण्यासाठी राधानगरी ते कोल्हापूर कावड मोर्चा काढला; शेतकऱ्यांच्या प्रश्नांसाठी पंढरपूर ते बारामती पदयात्रा काढली; सन २०१४ मध्ये दोन हजार किलोमीटर दिलासा यात्रा काढली; सन २०१५ मध्ये सेझ प्रश्नासाठी खेड ते पुणे पदयात्रा काढली; स्वाभिमानी विद्यार्थी परिषद स्थापन करून लोकसेवा आयोगाच्या परिक्षांसाठीच्या वयाची अट वाढवून घेण्यात यशस्वी; ऊसाची झोनबंदी उठवून शेतकऱ्यांना कोणत्याही साखर कारखान्यास ऊस देण्याचा हक्क मिळवून दिला. आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या कुटुंबीयांना सर्वोतोपरी मदत; लोकसहभागातून पंचवीस हजार वृक्ष लागवड केली; गरीब व गरजू रूग्णांना मदत; शेतकऱ्यांचा शेतमाल थेट ग्राहकापर्यंत विकता यावा यासाठी शेतीमाल नियमन कायदा करून त्याची अंमलबजावणी करण्यात पुढाकार; मुलांना दर्जेदार शिक्षण मिळावे यासाठी ‘इंटरनॅशनल स्कूलची स्थापना, खेळांसाठी ‘स्पोर्टस् अकादमी’ ची स्थापना केली; आश्रमशाळा सुरू केली; ग्रंथालय चळवळीत सहभाग; छत्रपती शिवाजी महाराज यांचे गड-किल्ले संवर्धन व्हावे, सुविधा उपलब्ध व्हाव्यात यासाठी प्रयत्न; शेतकरी चळवळीतील उल्लेखनीय कार्याबद्दल २२ व्या अखिल भारतीय नवोदित मराठी साहित्य संमेलनात मानपत्र देवून कार्याचा गौरव; ९५ व्या अखिल भारतीय जैन समाजाकडून क्रांतीवीर नागनाथ आण्णा नायकवडी “समाजसेवा” पुरस्काराने सन्मानित; जुलै २०१६ मध्ये विधानपरिषदेवर निवड; जुलै २०१६ ते ९ नोव्हेंबर, २०१९ कृषी व फलोत्पादन, पणन खात्याचे राज्यमंत्री. विधानमंडळाच्या विधानपरिषद आश्वासन समिती, पंचायत राज समिती तसेच सदस्यांचे वेतन व भत्ते समितीवर सदस्य म्हणून कार्य.

**परदेश प्रवास** : मालदीव, इस्त्राईल, नेपाळ

**छंद** : वाचन करणे, भजन-किर्तन, कुस्ती खेळणे, शेतकरी, शेतमजूर यांचे प्रश्न जाणून घेणे.

**पत्ता** : (१) मु. मरळनाथपूर, पो. रेठरे धरण, ता. वाळवा, जि. सांगली.

(२) 'रामरत्न निवास', प्रशासकीय इमारतीच्या बाजूला, खिश्चन बंगल्या शेजारी, इस्लामपूर, जि. सांगली-४१५४०९.

(३) ६०४/२ अ विंग, वृंदावन कॉम्प्लेक्स, राजू नगर, डोंबिवली (पश्चिम), जिल्हा-ठाणे.

**दूरध्वनी** : (निवास) ०२३४२-२२४९००.

**भ्रमणध्वनी** : ९८५०८८८३०७, ८१०८८४४१६१, ९४२२४०६०३५

**ई-मेल** : sadabhau123@gmail.com.

❑❑❑



## खंडेलवाल, श्री. वसंत मदनलाल

| | |
|---|---|
| **जन्म** | : ११ मार्च, १९६४. |
| **जन्म ठिकाण** | : अकोला, ता. जिल्हा-अकोला. |
| **शिक्षण** | : डिप्लोमा इन मॅकेनिकल इंजिनिअरिंग अॅन्ड प्रोडक्शन टेक्नोलॉजी. (द्वितीय वर्ष) |
| **ज्ञात भाषा** | : मराठी, हिंदी, इंग्रजी व राजस्थानी. |
| **वैवाहिक माहिती** | : विवाहित, पत्नी श्रीमती पुष्पा. |
| **अपत्ये** | : एकूण-२ (दोन मुलगे). |
| **व्यवसाय** | : उद्योग व व्यापार. |
| **पक्ष** | : भारतीय जनता पक्ष. |
| **मतदारसंघ** | : अकोला-वाशिम-बुलढाणा स्थानिक प्राधिकारी संस्था. |
| **इतर माहिती** | : सदस्य, शिक्षण प्रसारक मंडळ, अकोला; सन २०१५ पासून व्यवस्थापन समिती सदस्य, शंकरलाल खंडेलवाल महाविद्यालय व भिकमचंद खंडेलवाल विद्यालय; जानेवारी २०२२ मध्ये महाराष्ट्र विधानपरिषदेवर निर्वाचित. |
| **परदेश प्रवास** | : युरोप, रशिया, ऑस्ट्रेलिया, अमेरिका व आशियाई देश. |
| **छंद** | : संगीत. |

**पत्ता** : (१) ''पुष्पलता'', खंडेलवाल भवनच्या मागे, आळशी प्लॉट, अकोला. पिन- ४४४ ००५.

(२) खंडेलवाल अलंकार केंद्राच्या मागे, गांधी रोड, अकोला. पिन- ४४४ ००१.

**दूरध्वनी** : (निवास) (०७२४) २४०२४४४.
(कार्यालय) ९४२९००४४४४.

**भ्रमणध्वनी** : ९८२२२०४४४४.

**ई-मेल** : vasantkhandelwal@yahoo.com.

❑❑❑



## गाणार, श्री. नागो पुंडलिक

**जन्म** : ३ ऑगस्ट, १९५५.

**जन्म ठिकाण** : नागपूर.

**शिक्षण** : बी.एस्सी. (गणित), एम.ए. (अर्थशास्त्र), बी.एड.

**ज्ञात भाषा** : मराठी, हिंदी व इंग्रजी.

**वैवाहिक माहिती** : विवाहित, पत्नी श्रीमती मिनल.

**अपत्ये** : एकूण-१ (एक मुलगी).

**व्यवसाय** : अध्यापन.

**पक्ष** : अपक्ष.

**मतदारसंघ** : नागपूर विभाग शिक्षक.

**इतर माहिती** : संघटन मंत्री व कार्यालय मंत्री, अखिल भारतीय विद्यार्थी परिषद; अध्यक्ष, श्री. मथुरादास मोहता विज्ञान महाविद्यालय, विद्यार्थी संघ नागपूर; कार्याध्यक्ष, महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषद; महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषदेचा पदाधिकारी व कार्यकर्ता या नात्याने शिक्षक व विद्यार्थी यांना न्याय व हक्क मिळवून देण्यासाठी विशेष प्रयत्न; भागधारक, शिक्षक सहकारी बँक लि. नागपूर; वंदनीय संतकवी कमलासूत यांच्या स्मृतीप्रित्यर्थ संतकवी कमलासूत सत्संग पुरस्कार प्राप्त; २०१०-२०१६ सदस्य, महाराष्ट्र विधानपरिषद; सदस्य, विधानमंडळ अनुसूचित जाती

कल्याण समिती, अल्पसंख्यांक विकास समिती, विधानमंडळ सदस्यांचे वेतन व भत्ते समिती, उपविधान समिती, विधान परिषद आश्वासन समिती, सदस्य अनुपस्थिती समिती; फेब्रुवारी २०१७ मध्ये महाराष्ट्र विधानपरिषदेवर फेरनिवड.

**छंद** : वाचन, शैक्षणिक बाबी व न्यायालयीन बाबींवर चर्चा.

**पत्ता** : सिरस पेठ, प्राथमिक शाळेच्या मागे, मट्टीपुरा, नागपूर ४४०००९.

**दूरध्वनी** : (निवास) ०७१२-२०४४२६०.

**भ्रमणध्वनी** : ९७६४११७०१४, ९२७१५६५२३८.

**ई-मेल** : nagoganar@gmail.com

❑❑❑



## गिरकर, श्री. विजय (भाई) विठ्ठल

**जन्म** : १५ जुलै, १९५२.

**जन्म ठिकाण** : मुंबई.

**शिक्षण** : बी.ए.

**ज्ञात भाषा** : मराठी, हिंदी व इंग्रजी.

**वैवाहिक माहिती** : विवाहित, पत्नी श्रीमती शैलजा.

**अपत्ये** : एकूण-२ (एक मुलगा व एक मुलगी).

**पक्ष** : भारतीय जनता पक्ष.

**मतदारसंघ** : महाराष्ट्र विधानसभा सदस्यांद्वारा निर्वाचित.

**इतर माहिती** : संस्थापक, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर हायस्कूल, आंबवडे, तालुका मंडणगड, जिल्हा रत्नागिरी; उपाध्यक्ष, सावित्रीबाई फुले शिक्षण संस्था, दापोली, जिल्हा रत्नागिरी; सल्लागार, जागृती विद्या मंदिर, गोवंडी, मुंबई; संचालक, जनकल्याण सहकारी बँक लि. मुंबई; सल्लागार, पंचशील सहकारी पतसंस्था, नागपाडा व कुर्ला, मुंबई; अध्यक्ष, समता परिषद मुंबई; संचालक, रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनी; अध्यक्ष, मुंबई उपनगर जिल्हा मल्लखांब संघटना; अध्यक्ष, समता क्रिडा भवन, कांदिवली; अध्यक्ष, सफाई कर्मचारी विकास महासंघ; अध्यक्ष, एस.आर.ए. बचाव संघर्ष समिती; अध्यक्ष, जनता सेवासंघ, नागपाडा, मुंबई; अध्यक्ष, स्वास्थ सेवा संघ, कांदिवली; सल्लागार, नवा

नागपाडा सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ; सल्लागार, वरिष्ठ नागरिक पंचशील मित्रमंडळ, कांदिवली; १९७७ आणीबाणी लढ्यात सहभाग; १९८३ बेळगाव कारवार सीमा लढ्यात सहभाग; जम्मू काश्मीर येथे दोडा बचाव आंदोलनात सहभाग; भारतीय जनता पक्षाच्या महागाई विरोधी मोर्चाचे नेतृत्व; पक्षाच्या अनेक आंदोलनात सक्रीय सहभाग; जयप्रकाश नारायण यांच्या १९७४ च्या रम्यक क्रांती लढ्यात सक्रिय सहभाग; २००८ झोपडपट्टीवासीयांच्या मंत्रालयावरील विशाल मोर्चाचे नेतृत्व; २०१३ सफाई कर्मचाऱ्यांच्या विविध मागण्यांसाठी माता रमाबाई नगर ते आझाद मैदान लॉगमार्च चे आयोजन; अध्यक्ष, मुंबई प्रदेश; सरचिटणीस, महाराष्ट्र प्रदेश, उपाध्यक्ष, महाराष्ट्र प्रदेश, राष्ट्रीय सचिव, भारतीय जनता पक्ष; १९९८-२००४, २०१२-२०१८ सदस्य, महाराष्ट्र विधानपरिषद; १९९८-१९९९ समाजकल्याण व आदिवासी विकास खात्याचे मंत्री; जुलै, २०१८ मध्ये महाराष्ट्र विधानपरिषदेवर फेरनिवड.

**परदेश प्रवास** : थायलंड, सिंगापूर, मलेशिया, हाँगकाँग इत्यादी देशांचा दौरा.

**छंद** : सामाजिक कार्य.

**पत्ता** : (१) मु.पो. गिर्ये, तालुका-देवगड, जिल्हा-सिंधुदूर्ग.
(२) ए-१५०२, मधुपूरी अपार्टमेंट, डहाणुकर वाडी, दामू अण्णा दाते रोड, कांदिवली (पश्चिम) मुंबई-४०००६७.

**दूरध्वनी** : (निवास) ०२२-२८६१०८४४.

**भ्रमणध्वनी** : ९८२०१८०५९५.

**फॅक्स** : ०२२-२८०६६२६४.

**ई-मेल** : bhaigirkar16@gmail.com.

❑❑❑



## चतुर्वेदी, श्री. दुष्यंत सतीश

**जन्म** : २१ मे, १९७९

**जन्म ठिकाण** : नागपूर.

**शिक्षण** : बी. कॉम.

**ज्ञात भाषा** : मराठी, हिंदी व इंग्रजी.

**वैवाहिक माहिती** : विवाहित, पत्नी श्रीमती शितल.

**अपत्ये** : एकूण-२ (दोन मुलगे).

**व्यवसाय** : सामाजिक कार्य.

**पक्ष** : शिवसेना.

**मतदारसंघ** : यवतमाळ स्थानिक प्राधिकारी संस्था.

**इतर माहिती** : कार्यकारी संचालक, लोकमान्य टिळक जनकल्याण शिक्षण संस्था; कार्यकारी अध्यक्ष, विदर्भ माथाडी कामगार सेना; संपर्क प्रमुख, शिवसेना, नागपूर; सिनेट सदस्य, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ; कार्यकारी सदस्य, महाराष्ट्र रायफल असोसिएशन; नॅशनल रायफल असोसिएशन आयोजित विविध राज्य व राष्ट्रीय स्तरांवरील नेमबाजी स्पर्धामध्ये सहभाग व विशेष प्राविण्य; फेब्रुवारी २०२० मध्ये महाराष्ट्र विधानपरिषदेवर निर्वाचित. विधानमंडळाच्या अंदाज समिती, आहार समिती, सदस्यांचे वेतन समिती, आमदार निवास समितीवर सदस्य म्हणून कार्यरत,

**पत्ता** : (१) "महाविद्या" ३१०/अ, वेस्ट हायकोर्ट मार्ग, चॅरीटी कमिशनर, नागभवन, किनखेडे ले-आऊट, टेंपल रोड ता.जि. नागपूर-४४०००१.

(२) १४०१, वैतरणा वरळी सागर को. ऑप. हाऊसिंग सोसायटी, सर पोचखानवाला रोड, वरळी, मुंबई-४०००३०.

**निवास** : ०७१२-२५३९९४९.

**कार्यालय** : ०७१२-२५४३१४१.

**भ्रमणध्वनी** : ९८२२२२८२५८.

**ई-मेल** : chaturvedi_dushyant@yahoo.com.

❑❑❑



## चव्हाण, श्री. सतीश भानुदासराव

| | |
|---|---|
| **जन्म** | : २६ जानेवारी, १९६२. |
| **जन्म ठिकाण** | : तुरोरी, तालुका-उमरगा, जिल्हा-उस्मानाबाद. |
| **शिक्षण** | : बी.ई. (मॅकॅनिकल). |
| **ज्ञात भाषा** | : मराठी, हिंदी व इंग्रजी. |
| **वैवाहिक माहिती** | : विवाहित, पत्नी श्रीमती आशा. |
| **अपत्ये** | : एकूण-२ (एक मुलगा व एक मुलगी). |
| **व्यवसाय** | : शेती. |
| **पक्ष** | : राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष. |
| **मतदारसंघ** | : औरंगाबाद विभाग पदवीधर. |
| **इतर माहिती** | : १९८५ ते २०१३ कार्यकारणी सदस्य व २०१३ पासून सरचिटणीस, मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळ; २०००-२००५ व्यवस्थापन परिषदेचे सदस्य, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद; २०११-२०१४, २०१४-२०२०, कार्यकारणी सदस्य, वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी; सन २०१८ पासून सदस्य, महाराष्ट्र राज्य उच्च शिक्षण व विकास आयोग; सरचिटणीस, पक्ष प्रवक्ते, मराठवाडा प्रभारी, राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष, २६ फेब्रुवारी, २०१४ रोजी अनेक वर्षे पाठपुरावा करून राज्यातील कनिष्ठ महाविद्यालयांचा 'कायम' शब्द |

वगळण्यात यशस्वी; कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षकांना पाचवा वेतन आयोग २६ फेब्रुवारी, २०१४ पासून लागू करण्यात यशस्वी; औरंगाबाद येथे विधी विद्यापीठ सुरू केले; महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या मुख्य परिक्षेसाठी कृषीशास्त्र विषयाचा समावेश करून घेण्यासाठी पाठपुरावा केला; मराठवाड्यातील सुशिक्षित बेरोजगार युवकांसाठी नोकरी महोत्सवाचे आयोजन करून अनेक तरूणांना नामांकित कंपनीमध्ये नोकरी मिळवून दिली; मराठवाड्यातील दुष्काळी परिस्थितीत विद्यार्थ्यांना आर्थिक मदत मिळवून दिली; अनेक गरीब व निराधार मुलींचे पालकत्व स्वीकारून त्यांचा शैक्षणिक खर्च भागविला; मराठवाडा विद्यापीठातून पदवी घेतलेल्या विद्यार्थ्यांना डिग्री प्रमाणपत्रासाठी आकारला जाणारा दंड माफ केला; दहावी, बारावीच्या विद्यार्थ्यांसाठी ''वेध भविष्याचा'' या करिअर मार्गदर्शन मेळाव्यांचे आयोजन; मराठवाडा विभागात आंतर महाविद्यालयीन वक्तृत्व स्पर्धेचे प्रतिवर्षी आयोजन; राज्यात वैद्यकीय महाविद्यालयातील प्रवेशासाठी गुणवत्ता असूनही मराठवाड्यातील विद्यार्थ्यांना ७०:३० या फॉम्युलानुसार प्रादेशिक आरक्षणाला तोंड द्यावे लागत असे. सदर वैद्यकीय प्रवेशासाठीचा ७०:३० फॉम्युला रद्द करण्याचा एतिहासिक निर्णय शासनाने घ्यावा यासाठी यशस्वी प्रयत्न; महाराष्ट्र लोकसेवा आयोगाअंतर्गत घेण्यात येणाऱ्या परीक्षांसाठी उमेदवारांची वयोमर्यादा वाढावी यासाठी सतत पाठ पुरावा. शासनाने २०१६ पासून खुल्या प्रवर्गातील उमेदवारांसाठी ३८ वर्षे व मागासवर्गीय उमेदवारांसाठी ४३ वर्षे कमाल वयोमर्यादा करून घेण्यात यशस्वी. राज्य सरकारच्या विविध पद भरतीच्या परीक्षा 'महापरीक्षा पोर्टलद्वारे' घेण्यात येत होत्या मात्र महापरीक्षा पोर्टलमध्ये होत असणारे अनेक गैरप्रकार समोर आल्याने सदर परीक्षा महापरीक्षा पोर्टलद्वारे घेण्यात येऊ नये. अशी मागणी करून महापरीक्षा पोर्टल बंद करण्यास आलेले यश. NEET परीक्षेसाठी नांदेड, लातूर व बीड जिल्ह्यांना NEET परीक्षेचे केंद्र मंजूर करण्यास यशस्वी. औरंगाबादमध्ये विधी विद्यापीठाची स्थापना करण्यासाठी पुढाकार. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी 'करीअर मार्गदर्शन' मेळाव्यांचे आयोजन; मराठवाड्यात विविध ठिकाणी नोकरी महोत्सवाचे आयोजन; असंख्य बेरोजगार तरूणांना रोजगार मिळवून देण्यासाठी प्रयत्न; कै. भानूदासराव चव्हाण प्रतिष्ठानची स्थापना करून

प्रतिष्ठानच्या माध्यमातून मराठवाड्यातील गोर गरिब गरजू रुग्णांना वैद्यकिय मदत; कोरोना काळात विद्यार्थी, गरजू नागरीक यांची उपासमार होऊ नये. म्हणून मोफत भोजनाची व्यवस्था केली; कोरोना काळात मराठवाडा शिक्षक प्रसारक मंडळाच्या माध्यमातून मुख्यमंत्री सहायता निधी व पी.एम केअर फंडसाठी एक कोटीचा निधी दिला. २००८-२०१४, २०१४-२०२० सदस्य, महाराष्ट्र विधानपरिषद, महाराष्ट्र विधानमंडळाच्या विविध समित्यांवर कार्य; डिसेंबर, २०२० मध्ये महाराष्ट्र विधानपरिषदेवर फेरनिवड.

**परदेश प्रवास** : कृषी क्षेत्राचे व्यवस्थापन पाहण्यासाठी मा. श्री. शरदचंद्रजी पवार साहेबांसोबत नेदरलँडचा अभ्यास दौरा.

**छंद** : वाचन करणे.

**पत्ता** : १०, "सुप्रिया", ज्योतीनगर, औरंगाबाद-४३१००५.

**दुरध्वनी** : (कार्यालय) ०२४०-२३६२२७७, २३६२२८८.
(निवास) ०२४०-२३५३४३६

**भ्रमणध्वनी** : ९८२२०३९८९८, ९९३०४२४३०७.

**ई-मेल** : satishchavan55@gmail.com.

❑❑❑



## जानकर, श्री. महादेव जगन्नाथ

**जन्म** : २ जून, १९६८.

**जन्म ठिकाण** : मु.पो.वाढे, तालुका-सातारा, जिल्हा-सातारा.

**शिक्षण** : एच.एस.सी., डिप्लोमा इन इलेक्ट्रिकल इंजिनिअरिंग.

**ज्ञात भाषा** : मराठी, हिंदी व इंग्रजी.

**वैवाहिक माहिती** : अविवाहित.

**व्यवसाय** : सामाजिक कार्य.

**पक्ष** : राष्ट्रीय समाज पक्ष.

**मतदारसंघ** : महाराष्ट्र विधानसभा सदस्यांद्वारा निर्वाचित.

**इतर माहिती** : १९९०-९१ विद्यार्थी प्रतिनिधी, वालचंद इंजिनिअरिंग कॉलेज, सांगली; ३१ मे, २००३ पासून संस्थापक-अध्यक्ष, राष्ट्रीय समाज पक्ष; संघटनात्मक कामासाठी राज्यभर दौरे; देशातील अनेक राज्यांमध्ये पक्षाचे संघटन; सर्वसामान्य माणसांच्या सर्वांगीण विकासासाठी सतत प्रयत्नरत; संपादक, 'विश्वाचा यशवंत नायक'; संस्थापक-अध्यक्ष, रा-सेफ; २०१५-२०१८ सदस्य, महाराष्ट्र विधानपरिषद; जुलै २०१६ ते ऑक्टोबर, २०१९ पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यविकास खात्याचे मंत्री; जुलै २०१८ मध्ये महाराष्ट्र विधानपरिषदेवर फेरनिवड.

**पत्ता** : (१) मु.पो.पळसावडे, ता.माण, जि.सातारा, पिन कोड-४१५५०९.

(२) राष्ट्रीय समाज पक्ष कार्यालय, १/ब/३५, हमाम स्ट्रीट, अंबालाल दोषी मार्ग, फोर्ट, मुंबई-४००००१.

**दूरध्वनी** : (कार्यालय) ०२२-२२६१८५१०.

**भ्रमणध्वनी** : ९०२२३३३३९९/९८३३२०९९९९/८७५०२९९९९९.

**ई-मेल** : rashtriyasamaj@gmail.com.

❑❑❑



## ठाकरे, श्री. उद्धव बाळासाहेब

| | |
|---|---|
| **जन्म** | : २७ जुलै, १९६०. |
| **जन्म ठिकाण** | : मुंबई. |
| **शिक्षण** | : सर जे.जे.स्कूल ऑफ आर्टस मधून पदवी. |
| **ज्ञात भाषा** | : मराठी, हिंदी व इंग्रजी. |
| **वैवाहिक माहिती** | : विवाहित, पत्नी श्रीमती रश्मी ठाकरे. |
| **अपत्ये** | : एकूण २ (दोन मुलगे) |
| **व्यवसाय** | : राजकारण. |
| **पक्ष** | : शिवसेना. |
| **मतदारसंघ** | : महाराष्ट्र विधानसभा सदस्यांद्वारा निर्वाचित. |
| **इतर माहिती** | : थोर समाजसेवक विचारवंत केशव सिताराम ठाकरे उपाख्य प्रबोधनकार ठाकरे यांचे नातू व हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे ह्याचे चिरंजीव; प्रबोधनकार ठाकरे यांनी आपल्या ठाम व परखड कृतीतून, भाषा व लेखणीतून महाराष्ट्रातील पुरोगामी विचार तळागाळा पर्यंत पोहोचविले. हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांनी महाराष्ट्रात शिवसेना पक्षाची स्थापना केली. बाळासाहेबांच्या ज्वलंत विचारधारेचे बाळकडू व आई मीनाताई ठाकरे यांच्या संस्कारातून उद्धव ठाकरे यांचा राजकीय उदय झाला. |

राजकारणाव्यतिरिक्त निष्णांत छायाचित्रकार म्हणून श्री. उद्धव ठाकरे महाराष्ट्राला परिचित आहेत. त्यांनी काढलेली असंख्य छायाचित्रे विविध नामांकित मासिकात प्रकाशित झाली आहेत. व्यावसायिक छायाचित्रकार म्हणून कार्यरत असताना अर्धा डझनहून अधिक पुस्तके तसेच छायाचित्र मासिके प्रकाशित; शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या पश्चात सहा वर्षे 'व्यंगचित्र साप्ताहिक मार्मिक' व 'दैनिक सामना' चे संपादक.

वन्यजीव, निसर्ग व विशेषतः महाराष्ट्रातील स्वराज्याची प्रतिके असलेल्या गडकिल्ल्यांच्या केलेल्या हवाई छायाचित्रणाचे देशभरात कौतूक झाले आहे. आपल्या छायाचित्र प्रदर्शनातून उभारलेले पाच कोटी रूपये शेतकऱ्यांच्या प्रती कृतज्ञतेच्या भावनेतून खर्च; २०१० साली 'महाराष्ट्र देशा' हे छायाचित्रांचे पहिले पुस्तक प्रकाशित; २०११ साली पंढरपूर येथील सोहळा व विठ्ठलरूपी वारकऱ्यांची छायाचित्रे असलेले 'पहावा विठ्ठल' हे पुस्तक प्रकाशित.

२००३ साली शिवसेना पक्षाच्या कार्याध्यक्षपदी पक्षाच्या महाबळेश्वर येथील अधिवेशनात निवड; उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखाली १९९७ मध्ये मुंबई महानगरपालिकेच्या निवडणूकीत शिवसेनेचा विजय, पुढे १९९७ ते २०१७ हि विजयी परंपरा कायम ठेवण्यात यशस्वी; शिवसेनेतर्फे महाराष्ट्रातील शेतकऱ्यांच्या अनेक प्रश्नांवर केलेल्या यशस्वी आंदोलनांचे नेतृत्व; महाराष्ट्र, मध्य प्रदेश व इतर राज्यात वनक्षेत्रात वास्तव्यास असणाऱ्या नागरिकांसाठी रोजगार, आरोग्य सुविधा उपलब्ध करून दिल्या; २०१४ साली महाराष्ट्रात शिवसेना पक्षाला स्वबळावर दुसऱ्या क्रमांकाचा पक्ष म्हणून यश मिळवून देण्यात यशस्वी. २०१४-२०१९ मध्ये शिवसेना पक्ष सत्तेत असतानाही नाणार, जैतापूर प्रकल्प विरोधात स्थानिक भूमिपुत्रांना पाठिंबा; मुंबई महानगरपालिका क्षेत्रात लोकोपयोगी योजना राबविण्यात यशस्वी, ५०० चौ. फुट पर्यंतच्या घरांना करातून सवलत. २८ नोव्हेंबर, २०१९ रोजी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री म्हणून शपथ; मे, २०२० मध्ये महाराष्ट्र विधानपरिषदेवर निर्वाचित.

**पत्ता** : (१) १४-प्लॉट क्र. २५, मातोश्री बंगला, कलानगर, बांद्रा (पूर्व), मुंबई-४०००५१.

(२) मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई-४०००३२.

**भ्रमणध्वनी** : ९००४११५४७२.

**ई-मेल** : uddhavthackeray@gmail.com.

❑❑❑



## ठाकूर, श्री. सुजितसिंह मानसिंह

**जन्म** : २१ फेब्रुवारी, १९६७.

**जन्म ठिकाण** : परांडा, जिल्हा उस्मानाबाद.

**शिक्षण** : एच.एस.सी.

**ज्ञात भाषा** : मराठी, हिंदी व इंग्रजी.

**वैवाहिक माहिती** : विवाहित, पत्नी श्रीमती शैला.

**अपत्ये** : एकूण-२ (एक मुलगा व एक मुलगी).

**व्यवसाय** : शेती व सामाजिक कार्य.

**पक्ष** : भारतीय जनता पक्ष.

**मतदारसंघ** : महाराष्ट्र विधानसभा सदस्यांद्वारा निर्वाचित.

**इतर माहिती** : संस्थापक-अध्यक्ष, कल्याणसागर समुह; संस्थापक-अध्यक्ष, श्रीकृष्ण बहुउद्देशीय शिक्षण प्रसारक मंडळ; संचालक, लोकमान्य सार्वजनिक वाचनालय, परांडा; संस्थापक-अध्यक्ष, कल्याणसागर माध्यमिक विद्यालय, परांडा व डोमगाव; संस्थापक-अध्यक्ष, कल्याणसागर अर्बन को-ऑप.बँक लि. परांडा; संचालक व उपाध्यक्ष, मराठवाडा अर्बन बँक असोसिएशन; सन १९९३ मध्ये युवक कल्याण व सामाजिक क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याबद्दल भारत सरकारचा जिल्हास्तरीय पुरस्कार प्राप्त; १९९७-१९९९ सदस्य, गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, औरंगाबाद;

१९९३-१९९५ जिल्हाध्यक्ष, भारतीय जनता पक्ष युवा मोर्चा; १९९५-१९९७ जिल्हा सरचिटणीस, भारतीय जनता पक्ष; १९९७-२००३ उस्मानाबाद जिल्हाध्यक्ष, भारतीय जनता पक्ष; २००२-२००३ प्रदेश उपाध्यक्ष व २००३-२००४ प्रदेशाध्यक्ष, भारतीय जनता पक्ष युवा मोर्चा; २००५ पासून प्रदेश सरचिटणीस, भारतीय जनता पक्ष; २०१४ प्रदेश प्रमुख, सदस्य नोंदणी अभियान; २०१५-२०१६ प्रदेश निवडणूक अधिकारी, भारतीय जनता पक्ष; १९९१-२००१ नगरसेवक, १९९५-१९९६ व १९९८-२००१ नगराध्यक्ष, परांडा नगरपरिषद; जुलै २०१६ मध्ये महाराष्ट्र विधानपरिषदेवर निर्वाचित.

**छंद** : वाचन, प्रवास व मैत्री करणे.

**पत्ता** : “संवाद”, राजापुरा गल्ली, मु. पो. ता. परांडा,
जि. उस्मानाबाद-४१३५०२.
**दूरध्वनी** : (निवास) ०२४७७-२३२०५५.
(कार्यालय) ०२४७७-२३२३२७.
**भ्रमणध्वनी** : ९४०३४९००००/९७६४२९९९९९.
**ई-मेल** : thakursujitm@gmail.com.

❑❑❑



## डावखरे, ॲड. निरंजन वसंत

**जन्म** : १५ एप्रिल, १९७९.

**जन्म ठिकाण** : ठाणे.

**शिक्षण** : बी.कॉम., एलएल.बी. (तृतीय वर्ष)

**ज्ञात भाषा** : मराठी, हिंदी व इंग्रजी.

**वैवाहिक माहिती** : विवाहित, पत्नी श्रीमती निलिमा.

**अपत्ये** : एकूण-२ (दोन मुलगे).

**व्यवसाय** : व्यावसायिक.

**पक्ष** : भारतीय जनता पक्ष.

**मतदारसंघ** : कोकण विभाग पदवीधर.

**इतर माहिती** : १९९९-२००० विद्यार्थी प्रतिनिधी, मुलुंड वाणिज्य महाविद्यालय; दहावी व बारावीच्या विद्यार्थ्यांसाठी मार्गदर्शन शिबीरांचे प्रतिवर्षी आयोजन; मुंबई विद्यापीठाचे कल्याण येथे उपकेंद्र सुरू करण्यासाठी प्रयत्न; महाविद्यालयीन अध्यापकांचे प्रश्न सोडविण्यासाठी शासनाकडे पाठपुरावा; राज्यभर शैक्षणिक अभियान कार्यक्रमांचे आयोजन करून ७५ ठिकाणी "करिअरच्या वाटा" प्रदर्शन भरविले; शाळा व महाविद्यालय प्रवेशासाठी शिक्षक तज्ञांच्या परिसंवादाचे आयोजन; देशपातळीवर युवा बॉक्सर स्पर्धेचे आयोजन; २००३ संस्थापक-अध्यक्ष, समन्वय प्रतिष्ठान

ठाणे या संस्थेद्वारे अनेक सामाजिक, शैक्षणिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन; २००४ मध्ये अखिल भारतीय अपंग संस्थेच्यावतीने अपंग क्रिकेट स्पर्धेचे आयोजन; २००५ पासून राज्यस्तरीय जलतरण स्पर्धेचे आयोजन; आरोग्य शिबीरांचे आयोजन; गरीब गरजू रुग्णांना सर्वोतोपरी मदत; रिक्षा चालकांना विम्याचे संरक्षण देण्यासाठी जनश्री विमा योजना सुरू केली; सिद्धीविनायक ट्रस्टमार्फत विद्यार्थ्यांना शालोपयोगी साहित्याचे वाटप; कार्यक्रमांचे प्रतिवर्षी आयोजन; कोकण विभागात पदवीधर मतदार मेळाव्याचे आयोजन; युवकांसाठी रोजगार-स्वयंरोजगार मार्गदर्शन शिबीरांचे आयोजन; विधान परिषदेचे माजी उपसभापती दिवंगत वसंतराव डावखरे यांच्या जयंतीनिमित्त दरवर्षी कोकण विभागीय भजन स्पर्धांचे आयोजन, कोकणातील होतकरु शिक्षकांना प्रोत्साहन देण्यासाठी दरवर्षी वसंत स्मृती आदर्श शिक्षक पुरस्कार; कर्णबधीरांना मोफत श्रवणयंत्राचे वाटप; कोविड आपत्तीच्या काळात नागरिकांना अन्न पाकिटांचे वाटप, रुग्णांना मोफत औषधे तसेच गरजूना धान्य वाटप; पोलिस भरतीसाठी कोकणातील तरूणांना ऑनलाईन मार्गदर्शन; २००८ ते २०१६ पर्यंत राष्ट्रवादी विद्यार्थी संघटनेचे प्रदेशाध्यक्ष; ठाणे महानगरपालिका कामगारांच्या समस्या सोडविण्यासाठी भव्य मोर्चाचे आयोजन; राष्ट्रवादी विद्यार्थी काँग्रेसतर्फे "झेप" अभियान करिअर मार्गदर्शन शिबीरांचे राज्यभर आयोजन; विद्यार्थी प्रबोधन व मार्गदर्शन जनजागृतीसाठी राज्यभर अभ्यास दौऱ्यांचे आयोजन; सन २०१२-१८ सदस्य, महाराष्ट्र विधानपरिषद; मे २०१८ पासून भारतीय जनता पक्षाचे कार्य; २०२० पासून जिल्हाध्यक्ष, ठाणे, भारतीय जनता पक्ष; कोकण कृषी विद्यापीठाच्या कार्यकारी परिषदेचे सदस्य; जुलै २०१८ मध्ये महाराष्ट्र विधानपरिषदेवर फेरनिवड; विधानमंडळाच्या पंचायत राज समिती, आदिवासी विकास समितीचे सदस्य म्हणून कार्य.

**छंद** : वाचन, लेखन व क्रिकेट.

**पत्ता** : (१) रूम नं. २०१, गौतमदिप बिल्डिंग, वीर बाजीप्रभु देशपांडे मार्ग, विष्णूनगर, ठाणे जनता सहकारी बँक जवळ, ब्राम्हण विद्यालयासमोर, नौपाडा, ठाणे (पश्चिम)-४०० ६०१.

**दूरध्वनी** : (निवास) ०२२-२५३०४००५.
(कार्यालय) ०२२-२५३०४००५.

**भ्रमणध्वनी** : ९८९२०२५५५५.

**ई-मेल** : niranjandavkhare@gmail.com.

**संकेतस्थळ** : www.niranjandavkhare.in.

❑❑❑



## तटकरे, श्री. अनिकेत सुनिल

**जन्म** : १५ ऑक्टोबर, १९८२.

**जन्म ठिकाण** : सुतारवाडी, पो. जामगाव, ता. रोहा, जि. रायगड.

**शिक्षण** : बी.एस्सी. (केमिस्ट्री).

**ज्ञात भाषा** : मराठी, हिंदी व इंग्रजी.

**वैवाहिक माहिती** : विवाहित, पत्नी श्रीमती वेदांती.

**अपत्ये** : एकूण-२ (दोन मुलगे).

**व्यवसाय** : सामाजिक कार्य.

**पक्ष** : राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष.

**मतदारसंघ** : रायगड, रत्नागिरी तथा सिंधुदूर्ग स्थानिक प्राधिकारी संस्था.

**इतर माहिती** : अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य लगोरी असोसिएशन; २०१०-२०११ श्रीवर्धन पर्यटन महोत्सवाचे आयोजन; सुनिल तटकरे युवा प्रतिष्ठान मार्फत गरीब गरजू विद्यार्थ्यांना शालोपयोगी साहित्याचे वाटप; २०१३ दिवेआगार पर्यटन महोत्सवाचे आयोजन; २०१७ रोहा पर्यटन महोत्सवाचे आयोजन; रोहा येथे ९ व्या राष्ट्रीय बॉडी बिल्डिंग स्पर्धेचे आयोजन; राष्ट्रीय कबड्डी स्पर्धेचे रोहा येथे आयोजन; जून २०१८ मध्ये महाराष्ट्र विधानपरिषदेवर निर्वाचित.

**छंद** : वाचन व क्रिकेट.

**पत्ता** : गीता बाग, मु. सुतारवाडी, पो. जामगांव, ता. रोहा, जि. रायगड. ४०२३०८.
**दूरध्वनी** : (निवास) ०२१९४-२५५२५५.
**भ्रमणध्वनी** : ९८६७७०००००६.
**ई-मेल** : aniket.tat@gmail.com.

❑❑❑



## तांबे, डॉ. सुधीर भास्करराव

| | |
|---|---|
| **जन्म** | : १७ जानेवारी, १९५५. |
| **जन्म ठिकाण** | : श्रीरामपूर, जिल्हा अहमदनगर. |
| **शिक्षण** | : एम.बी.बी.एस., एम.एस. |
| **ज्ञात भाषा** | : मराठी, हिंदी व इंग्रजी. |
| **वैवाहिक माहिती** | : विवाहित, पत्नी श्रीमती दुर्गाताई. |
| **अपत्ये** | : एकूण-२ (दोन मुलगे). |
| **व्यवसाय** | : वैद्यकीय. |
| **पक्ष** | : भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस. |
| **मतदारसंघ** | : नाशिक विभाग पदवीधर. |
| **इतर माहिती** | : मुख्य विश्वस्त, सौ. मथुराबाई भाऊसाहेब थोरात सेवाभावी ट्रस्ट, या संस्थेमार्फत अमृतवाहिनी ग्रामीण रुग्णालय, दंत महाविद्यालय, फार्मसी महाविद्यालय, आयुर्वेद महाविद्यालय, नर्सिंग कॉलेज व आदिवासी आश्रमशाळा सुरू केल्या; विश्वस्त, ग्रामोदय ट्रस्ट, संगमनेर, अमृत वाहिनी शेती व शिक्षण विकास संस्था, या संस्थेमार्फत अभियांत्रिकी पॉलिटेक्निक, फार्मसी व एम.बी.ए. (व्यवस्थापन) कॉलेज सुरू केले; चेअरमन, सह्याद्री बहुजन विद्या प्रसारक मंडळ, संगमनेर; संस्थापक, संग्राम मुकबधीर विद्यालय व डॉ. देवेंद्र ओहरा मतिमंद विद्यालय; संस्थापक, |

संग्राम करिअर ॲकेडमी या संस्थेमार्फत ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या बौद्धिक विकासासाठी बुद्धिमत्ता विकास प्रकल्प, संगणक प्रशिक्षण, मुलभूत कौशल्य, वैद्यकीय व इंजिनिअरिंग प्रवेश परीक्षा मार्गदर्शन, इंग्रजी संभाषण कौशल्य वर्गांचे आयोजन केले; सिनेट सदस्य, पुणे विद्यापीठ; १९९८ संस्थापक-अध्यक्ष, जयहिंद लोकचळवळ व युवामंच; २००२ मुख्य प्रवतक, जयहिंद सामुदायिक विवाह सोहळा; २००७ अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य अपंग शाळा व कार्यशाळा पदाधिकारी महासंघ; २००५ मुख्य प्रवर्तक, जयहिंद दंडकारण्य अभियान, या अभियानामार्फत हरितसृष्टी व पर्यावरण बचाव तसेच वृक्षारोपण कार्यक्रमांचे आयोजन; दंडकारण्य अभियानाची युनो संघटनेकडून दखल; २००५ कार्याध्यक्ष, अखिल भारतीय बाल आनंद महोत्सव, अहमदनगर; अध्यक्ष, सर्वांगीण आदिवासी व पाणलोट विकास क्षेत्र संस्था; २००४ स्वागताध्यक्ष, बंधुता साहित्य संमेलन, अहमदनगर; २००९ स्वागताध्यक्ष, अखिल भारतीय मराठी नवोदित साहित्य संमेलन; १९८८ संस्थापक-अध्यक्ष, संग्राम नागरी सहकारी पतसंस्था; २००१ संस्थापक-अध्यक्ष, संगमनेर तालुका ॲग्रिकल्चर प्रोड्यूस मार्केटिंग सहकारी सोसायटी; २००१ पासून अध्यक्ष, संगमनेर तालुका सहकारी पतसंस्था फेडरेशन; १९९१-१९९६ नगराध्यक्ष, नगरपालिका, संगमनेर, १९९७-२००० अध्यक्ष, संगमनेर तालुका काँग्रेस कमिटी; २०००-२००१ उपाध्यक्ष व २००१ -२००५ कार्याध्यक्ष, अहमदनगर जिल्हा काँग्रेस कमिटी; २००५ सदस्य, अखिल भारतीय काँग्रेस कार्यकारिणी; २००९-२०१०, २०१०-२०१६ सदस्य, महाराष्ट्र विधानपरिषद; फेब्रुवारी २०१७ मध्ये महाराष्ट्र विधानपरिषदेवर फेरनिवड.

**परदेश प्रवास** : इंग्लंड, जर्मनी, स्वित्झरलँड, फ्रान्स, मलेशिया, चीन, इस्त्राईल इत्यादी देशांचा अभ्यास दौरा.

**छंद** : वाचन.

**पत्ता** : (१) 'प्रभा', इंदिरा नगर, नवीन अकोले रोड, संगमनेर, जि. अहमदनगर-४२२६०५.

(२) तांबे हॉस्पिटल, नवीन अकोले रोड, संगमनेर, जि. अहमदनगर-४२२६०५.

**दूरध्वनी** : (कार्यालय) ०२४२५-२२५६८८.
**भ्रमणध्वनी** : ९८२२०६१३३२/९९२१४६१७७७.
**ई-मेल** : drsudhirtambe@rediffmail.com.
abhaynirmal21@gmail.com.

❑❑❑



## दटके, श्री. प्रविण प्रभाकरराव

**जन्म** : १६ डिसेंबर, १९७८.

**जन्म ठिकाण** : नागपूर.

**शिक्षण** : पॉलिटेक्निक ॲपिअर.

**ज्ञात भाषा** : मराठी, हिंदी व इंग्रजी.

**वैवाहिक माहिती** : विवाहित, पत्नी श्रीमती प्रवदा.

**अपत्ये** : एकूण-२ (दोन मुली).

**व्यवसाय** : शेती.

**पक्ष** : भारतीय जनता पक्ष.

**मतदारसंघ** : महाराष्ट्र विधानसभा सदस्यांद्वारा निर्वाचित.

**इतर माहिती** : संचालक, शिक्षक सहकारी बँक, नागपूर; २०१७ ते २०२० राष्ट्रीय उपाध्यक्ष, भारतीय जनता युवा मोर्चा; २०१९ पासून नागपूर शहर अध्यक्ष, भारतीय जनता पक्ष; २००० ते २०२१, नगरसेवक, नागपूर महानगरपालिका; २०१४ ते २०१६ महापौर, नागपूर महानगरपालिका; विधानमंडळाच्या सार्वजनिक उपक्रम समिती व विशेष हक्क समितीचे सदस्य; मे २०२० मध्ये महाराष्ट्र विधानपरिषदेवर निर्वाचित.

**छंद** : समाजसेवा.

**पत्ता** : शिवगौरी, दक्षिणामुर्ती चौक, महाल, नागपूर-३२.

**दूरध्वनी** : (निवास) (०७१२) २७२६०२५.

**भ्रमणध्वनी** : ७७०९९२८८८८/९९२३६६६६७७.

**ई-मेल** : pravinp.datke2020@gmail.com.

❑❑❑



## दराडे, श्री. किशोर भिकाजी

**जन्म** : १ जून, १९६५.

**जन्म ठिकाण** : येवला, जिल्हा-नाशिक.

**शिक्षण** : बी.ए.

**ज्ञात भाषा** : मराठी, हिंदी व इंग्रजी.

**वैवाहिक माहिती** : विवाहित, पत्नी श्रीमती मीना.

**अपत्ये** : एकूण-३ (दोन मुलगे व एक मुलगी).

**पक्ष** : अपक्ष.

**मतदारसंघ** : नाशिक विभाग शिक्षक.

**इतर माहिती** : २००४ पासून अध्यक्ष, मातोश्री एज्युकेशन संस्था, येवला; २०१४ पासून संचालक, नाशिक जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि.; कुस्तीपट्टु पुरस्काराने सन्मानित; जुलै, २०१८ मध्ये महाराष्ट्र विधानपरिषदेवर निर्वाचित.

**परदेश प्रवास** : सिंगापूरचा अभ्यास दौरा.

**छंद** : कुस्ती.

**पत्ता** : (१) जुनी माळी गल्ली, घर नं. ३४२६, मु.पो.येवला, ता. येवला, जि.नाशिक-४२३ ४०१.

(२) मा. आमदार दराडे बंधु कार्यालय, कृषी उत्पन्न बाजार समिती समोर, येवला, जिल्हा नाशिक.

**दुरध्वनी** : (कार्यालय) (०२५५९) २६५२०१.

**भ्रमणध्वनी** : ७०३८२८६६६६, ९८२२६५१८५०.

**ई-मेल** : kbdarade1965@gmail.com.

❑❑❑



## दराडे, श्री. नरेंद्र भिकाजी

**जन्म** : २ जून, १९५४.

**जन्म ठिकाण** : नगरसुल, तालुका-येवला, जिल्हा-नाशिक.

**शिक्षण** : बी.ए., एन.सी.टी.व्ही.

**ज्ञात भाषा** : मराठी, हिंदी व इंग्रजी.

**वैवाहिक माहिती** : विवाहित, पत्नी श्रीमती सुरेखा.

**अपत्ये** : एकूण-२ (एक मुलगा व एक मुलगी).

**व्यवसाय** : शेती.

**पक्ष** : शिवसेना.

**मतदारसंघ** : नाशिक स्थानिक प्राधिकारी संस्था.

**इतर माहिती** : चेअरमन, जगदंबा एज्युकेशन संस्था, येवला; चेअरमन, बाभुळगाव विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटी; २००८-२०१२ संचालक, नाशिक कृषी औद्योगिक संघ; २००८-२०११ व्हाईस चेअरमन, नाशिक जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि.; २०१३-२०१५ चेअरमन, महाराष्ट्र गृहनिर्माण मंडळ (म्हाडा) नाशिक विभाग; सभापती येवला कृषी उत्पन्न बाजार समिती; संचालक, चिल्ड्रन एड् सोसायटी, माटुंगा; १९९१-१९९५ नगरसेवक, नगरपालिका येवला; १९९१ ते १९९९ काँग्रेस शहराध्यक्ष, १९९५ ते १९९९, जिल्हा उपाध्यक्ष काँग्रेस पक्ष;

२०१८ शिवसेनेचे कार्य; संपर्क प्रमुख, शिवसेना, उत्तर नगर; उत्कृष्ट सामाजिक कार्याबद्दल 'इंदिरा गांधी पुरस्कार', 'समाज भुषण पुरस्कार' तसेच 'शैक्षणिक पुरस्काराने' सन्मानित; जून २०१८ मध्ये महाराष्ट्र विधानपरिषदेवर निर्वाचित.

**छंद** : कुस्ती.

**परदेश प्रवास** : जर्मनी, इस्त्राईल, फ्रान्स, इटली, हाँगकाँग, मलेशिया व बँकॉक, नेपाळ, स्वित्झलँड, थायलंड, ऑस्ट्रेलिया, लंडन इत्यादी देशांचा अभ्यास दौरा.

**पत्ता** : (१) पॅनासिया हॉस्पीटल येवला, विंचूर रोड, ता. येवला, जिल्हा-नाशिक-४२३४०१.
(२) नरेंद्र दराडे यांचे फार्म हाऊस, गोशाळा मैदानाजवळ, ता. येवला, जिल्हा-नाशिक-४२३४०१.

**दूरध्वनी** : (कार्यालय व निवास) :- (०२५५९) २६५५२६.

**भ्रमणध्वनी** : ९४२२७५७६८५.

**ई-मेल** : narendradarade@gmail.com.

❑❑❑



## दरेकर, श्री. प्रविण यशवंत

**जन्म** : १३ ऑक्टोबर, १९६८.

**जन्म ठिकाण** : वसाप, ता.महाड, जि. रायगड.

**शिक्षण** : बी.कॉम.

**ज्ञात भाषा** : मराठी, हिंदी व इंग्रजी.

**वैवाहिक माहिती** : विवाहित, पत्नी श्रीमती सायली.

**अपत्ये** : एकूण-१ (एक मुलगा).

**व्यवसाय** : व्यापार.

**पक्ष** : भारतीय जनता पक्ष.

**मतदारसंघ** : महाराष्ट्र विधानसभा सदस्यांद्वारा निर्वाचित.

**इतर माहिती** : विश्वस्त, यशवंत चॅरिटेबल ट्रस्ट व रायगड प्रतिष्ठान; अध्यक्ष, दहिसर भावदेवी क्रीडा व सांस्कृतिक मंडळ या संस्थेमार्फत एकांकिका, नाट्य स्पर्धा, विद्यार्थ्यांसाठी व्याख्यानमाला, व्यवसाय मार्गदर्शन शिबिर व फोटोग्राफी शुटींग शिबीरांचे आयोजन; मुंबई बँकेच्या सहाय्यता केंद्राच्या माध्यमातून बेरोजगार, महिला बचत गट, स्वयंरोजगारांसाठी मदत; वाचनालये सुरू केली, रूग्णवाहिका सुविधा उपलब्ध केली; दहिसर येथील शैलेंद्रनगर येथे आपत्कालीन सहायता केंद्र सुरू केले; शैक्षणिक फी वाढ विरोधी आंदोलन, रेल्वे भरतीत स्थानिकांना न्याय

मिळावा यासाठी आंदोलन, बेरोजगारी व महागाई विरोधी आंदोलनाचे नेतृत्व; सरचिटणीस, सहकार सेलचे प्रमुख, पश्चिम विदर्भ संपर्क नेता व प्रभारी उत्तर मुंबई जिल्हा, महाराष्ट्र नवनिर्माण सेना; जुलै २०१६ पासून भारतीय जनता पक्षाचे कार्य; सन २००० पासून संचालक व सन २०१० पासून अध्यक्ष, मुंबई जिल्हा मध्यवर्ती सह.बँक लि.; अध्यक्ष, मुंबई शहर लेबर को. ऑप. फेडरेशन लि; तज्ञ संचालक, महाराष्ट्र राज्य सहकारी संघ पुणे; संचालक, राज्य मजूर सह. संस्था संघ, पुणे; संचालक, साई सावली सहकारी पतपेढी लि.; संस्थापक मातोश्री फोटोग्राफर्स व शुटिंग सहकारी संस्था; प्रशासक, बृहन्मुंबई बँक्स असोसिएशन; तज्ञ संचालक, महाराष्ट्र राज्य सहकारी संघ, मुंबई; २००९-२०१४ सदस्य, महाराष्ट्र विधानसभा; जुलै २०१६ मध्ये महाराष्ट्र विधानपरिषदेवर निर्वाचित तसेच १६ डिसेंबर, २०१९ रोजी महाराष्ट्र विधानपरिषदेचे विरोधी पक्षनेते म्हणून निवड.

**छंद** : वाचन, नाविण्यपूर्ण उपक्रम राबविणे, भाषण, कोणत्याही गोष्टीचे सूक्ष्म निरिक्षण व फिरणे.

**पत्ता** : (१) सी-७०१, सातवा मजला, श्रीकृष्ण कॉम्प्लेक्स, नॅशनल पार्क समोर उड्डाणपुलाजवळ, बोरिवली (पूर्व), मुंबई-४०० ०६६.

(२) प्रवीण दरेकर यांचे जनसंपर्क कार्यालय, वेस्टर्न एक्स्प्रेस हायवे, गोकुळ आनंद हॉटेलजवळ, दहिसर (पूर्व) मुंबई-६८.

(३) विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र विधानपरिषद, विधान भवन, मुंबई-४०००३२.

(४) ८, अवंती अपार्टमेंट, नारायण दाभोळकर मार्ग, मलबार हिल, मुंबई- ४०० ००६.

**भ्रमणध्वनी** : ९८३३३२१२६३.

**ई-मेल** : pydmlaoffice@gmail.com

❑❑❑



## दानवे, श्री. अंबादास एकनाथराव

**जन्म** : ८ डिसेंबर, १९७०.

**जन्म ठिकाण** : औरंगाबाद.

**शिक्षण** : एम.ए. (समाजशास्त्र), एम.ए. (जर्नलिझम व जनसंवाद), एम.ए. (योगशास्त्र), एलएल.बी. (द्वितीय वर्ष).

**ज्ञात भाषा** : मराठी, हिंदी व इंग्रजी.

**वैवाहिक माहिती** : विवाहित, पत्नी श्रीमती अनुराधा.

**अपत्ये** : एकूण-२ (एक मुलगा व एक मुलगी).

**व्यवसाय** : सामाजिक कार्य.

**पक्ष** : शिवसेना.

**मतदारसंघ** : औरंगाबाद तथा जालना स्थानिक प्राधिकारी संस्था.

**इतर माहिती** : अमेरिकेतील बर्कले विद्यापीठ कॅलिफोर्नियाची मान्यता असलेल्या हैद्राबाद येथील पॅथॉलॉजिकल विद्यापीठातर्फे सामाजिक व आध्यात्मिक कार्याबद्दल डॉक्टरेट देऊन सन्मानीत; अध्यक्ष, मातृभूमी प्रतिष्ठान, औरंगाबाद; अध्यक्ष, नृसिंह शिक्षण व विद्याप्रसारक मंडळ, औरंगाबाद; अध्यक्ष, जिल्हा हॅन्ड बॉल संघटना; अध्यक्ष, जिल्हा योग संघटना; संचालक, श्री स्वामी प्रतिष्ठान, वाळुंज; संपर्क प्रमुख, अखिल भारतीय वारकरी महामंडळ, औरंगाबादः २००४ मध्ये दैनिक सामनामधील

"रोखठोक" स्तभांतील 'अभिव्यक्ती एक संवादशास्त्रीय अभ्यास' या विषयावर डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठामध्ये लघुप्रबंध सादर; औरंगाबाद येथे शिवसेना पीक विमा केंद्र सुरू केले. २०००, नगरसेवक व सभागृह नेता, औरंगाबाद महानगरपालिका; २००४-२०२० शिवसेना जिल्हा प्रमुख, औरंगाबाद; ऑगस्ट, २०१९ मध्ये महाराष्ट्र विधानपरिषदेवर निर्वाचित.

**छंद** : वाचन, योगाभ्यास व गडकिल्ले भ्रमंती.

**पत्ता** : 'तोरणा', टिळक रोड, अजबनगर, औरंगाबाद -४३१००१.

**दूरध्वनी** : (निवास) ०२४०-२३५६३९९. ०२४०-२३५७७९९

**भ्रमणध्वनी** : ९४२२७०७२७९, ९६६५१९९९९९.

**फॅक्स** : ०२४०-२३५७७९९

**ई-मेल** : ambadasdanve79@gmail.com.

❑❑❑



## दुर्राणी, अब्दुला खान लतीफ खान उर्फ बाबाजानी

**जन्म** : १५ जुलै, १९५७.

**जन्म ठिकाण** : पाथरी, जिल्हा-परभणी.

**शिक्षण** : एस.एस.सी.

**ज्ञात भाषा** : मराठी, हिंदी, इंग्रजी व उर्दू.

**वैवाहिक माहिती** : विवाहित, पत्नी श्रीमती शाहीस्ता बेगम.

**अपत्ये** : एकूण-३ (दोन मुलगे व एक मुलगी).

**व्यवसाय** : शेती.

**पक्ष** : राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष.

**मतदारसंघ** : महाराष्ट्र विधानसभा सदस्यांद्वारा निर्वाचित.

**इतर माहिती** : अध्यक्ष, महात्मा गांधी एज्युकेशन सोसायटी, पाथरी, या संस्थेमार्फत पाथरी, मानवत, सेलू येथे विद्यालये, महाविद्यालये व उर्दू विद्यालय सुरू केले; अध्यक्ष, सामाजिक सलोखा व सार्वजनिक दवाखाना सल्लागार समिती; अनेक सामाजिक, शैक्षणिक व धार्मिक संस्थांशी निकटचा संबंध; धार्मिक सण, उत्सव, जातीय सलोखा राखण्यासाठी विविध कार्यक्रमांचे आयोजन; अध्यक्ष, विविध कार्यकारी सोसायटी; २००२ पासून संचालक, परभणी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक; १९८५-८७ शहर अध्यक्ष, पाथरी (एस.काँग्रेस); १९९६-२००१

नगराध्यक्ष, नगरपरिषद, पाथरी; १९९०-९७ सभापती, कृषी उत्पन्न बाजार समिती, पाथरी; १९९१-२००० सदस्य, वक्फ बोर्ड मराठवाडा; १९९९-२००१ जिल्हा अध्यक्ष, राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष, परभणी; २००१-२००२ उपाध्यक्ष, महाराष्ट्र प्रदेश राष्ट्रवादी काँग्रेस; ऑक्टोबर २००२ ते जानेवारी २००५ अध्यक्ष, ग्राहक कल्याण सल्लागार समिती, महाराष्ट्र राज्य, मुंबई; २००४-२००९ सदस्य, महाराष्ट्र विधानसभा; २०१२-२०१८, सदस्य, महाराष्ट्र विधानपरिषद, जुलै २०१८ मध्ये महाराष्ट्र विधानपरिषदेवर फेरनिवड.

**परदेश प्रवास** : रशिया, चीन, दुबई, दक्षिण आफ्रिका, श्रीलंका इत्यादी देशांचा दौरा.

**छंद** : वाचन, खेळ, पर्यटन व सामाजिक कार्य.

**पत्ता** : फक्राबाद मोहल्ला, मु.पो. पाथरी, तालुका पाथरी, जिल्हा परभणी ४३१ ५०६.

**दूरध्वनी** (निवास) : ०२४५१-२५५३३५.

**भ्रमणध्वनी** : ९४२२१७६९७७/९५४५८७१०१०.

फॅक्स : ०२४५१-२५५५३५.

**ई-मेल** : durrani.tk777@gmai.com.

❑❑❑



## देसाई, श्री. सुभाष राजाराम

| | |
|---|---|
| **जन्म** | : १२ जुलै, १९४२. |
| **जन्म ठिकाण** | : मालगुंड, तालुका, जिल्हा रत्नागिरी. |
| **शिक्षण** | : एस.एस.सी., पत्रकारिता पदविका. |
| **ज्ञात भाषा** | : मराठी, हिंदी, इंग्रजी व गुजराथी. |
| **वैवाहिक माहिती** | : विवाहित, पत्नी श्रीमती सुषमा. |
| **अपत्ये** | : एकूण-३ (तीन मुलगे). |
| **व्यवसाय** | : उद्योग. |
| **पक्ष** | : शिवसेना. |
| **मतदारसंघ** | : महाराष्ट्र विधानसभा सदस्यांद्वारा निर्वाचित. |
| **इतर माहिती** | : १९७२ संस्थापक, 'प्रबोधन गोरेगाव' विश्वस्त संस्था; १९७३ आंतरशालेय क्रिडा महोत्सव व आंतरमहाविद्यालयीन वक्तृत्व स्पर्धांचे आयोजन; १९७३ शिवसेना रूग्णवाहिका सेवा गोरेगाव येथे सुरू केली; १९७७ प्रमुख कार्यवाह, मुंबई उपनगर मराठी साहित्य संमेलन; १९८९ विश्वस्त, प्रबोधन प्रकाशन; प्रकाशक, 'दैनिक सामना', साप्ताहिक 'मार्मिक' व 'दोपहार का सामना'; १९९१ प्रबोधन क्रीडा भवनाची उभारणी; १९९२ मुख्य संयोजक, कोकण रेल्वे परिषद, खेड, जिल्हा रत्नागिरी; १९९९ प्रबोधन जॉगर्स पार्कची उभारणी; २००० मुख्य |

संयोजक, मुंबई फेस्टीवल व हिंदूस्थानी शास्त्रीय संगीत उत्सव; २००१ मुख्य संयोजक, 'हर्बलवर्ल्ड' औषधी वनस्पतींचे प्रदर्शन व चर्चा सत्राचे आयोजन; २००२ मध्ये उल्लेखनीय सार्वजनिक कार्याबद्दल संभाजी प्रतिष्ठानतर्फे धर्मवीर पुरस्कार प्राप्त; २००३ सहार विमानतळावर अश्वारूढ शिव प्रतिमेची स्थापना; २००४ प्रबोधन रक्तपेढी सुरू केली; १९६६ शिवसेनेच्या स्थापनेपासून शिवसैनिक म्हणून कार्य; १९८४ शिवसेना नेता; १९८५ प्रमुख संयोजक, शिवसेनेचे दुसरे महाराष्ट्रव्यापी अधिवेशन (महाड); १९८६-९० शिवसेना जळगाव जिल्हा संपर्क प्रमुख; १९८९ पासून सरचिटणीस, शिवसेना; १९९५ अध्यक्ष, उर्वरित महाराष्ट्र वैधानिक विकास मंडळ, १९९० मध्ये विधानसभेवर निवड; १९९४ हिंदुत्वाच्या आधारे प्रचार केला या आक्षेपावरून न्यायालयाने सदर विधानसभेवरील निवड अवैध ठरविली; २००४-२००९, २००९-२०१४ सदस्य, महाराष्ट्र विधानसभा; २०१५-२०१६ सदस्य, महाराष्ट्र विधानपरिषद; जुलै, २०१६ मध्ये महाराष्ट्र विधानपरिषदेवर फेरनिवड, ५ डिसेंबर, २०१४ ते ९ नोव्हेंबर, २०१९ महाराष्ट्र राज्याचे उद्योग मंत्री; २८ नोव्हेबर, २०१९ ते ५ जानेवारी, २०२० उद्योग आणि खनिकर्म, उच्च व तंत्र शिक्षण, क्रीडा व युवक कल्याण, कृषी, रोजगार हमी योजना, फलोत्पादन, परिवहन, मराठी भाषा, सांस्कृतिक कार्य, राजशिष्टाचार, भूकंप पुनर्वसन, बंदरे आणि खार भूमी विकास खात्याचे मंत्री, १६ डिसेंबर, २०१९ ते २४ फेब्रुवारी २०२० विधानपरिषदेचे सभागृह नेते, ५ जानेवारी २०२० पासून उद्योग, खनिकर्म व मराठी भाषा या खात्याचे मंत्री.

**परदेश प्रवास** : युरोप, अमेरिका, रशिया, चीन, मलेशिया, थायलँड, सिंगापूर इत्यादी देशांचा अभ्यास दौरा; सन २००४ मध्ये बँकॉक येथील आशियातील राजकीय पक्षांच्या दुसऱ्या परिषदेत शिवसेना पक्षातर्फे प्रतिनिधी म्हणून सहभाग.

**छंद** : वाचन, संगीत ऐकणे व बागकाम.

**पत्ता** : (१) १, 'विद्युत', लोकमान्य टिळकनगर, रस्ता क्र.४, महात्मा गांधी मार्ग, गोरेगांव (प), मुंबई ४०० ०६२.

(२) अ/१४०२, महिंद्र एन्जेलिका, पाटकर कॉलेज जवळ, एसव्ही रोड, गोरेगाव (पश्चिम), मुंबई-४०००६२.

(३) उद्योग, खनिकर्म, मराठी भाषा मंत्री, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.

**दूरध्वनी** : (०२२) २८७२२६३०.

**भ्रमणध्वनी** : ९८२१०३७०४०.

**ई-मेल** : subhash.desai12@gmail.com.

❑❑❑



## दौंड, श्री. संजय पंडितराव

| | |
|---|---|
| **जन्म** | : १ फेब्रुवारी, १९६४. |
| **जन्म ठिकाण** | : मु.दौंडवाडी, ता.परळी, जिल्हा-बीड. |
| **शिक्षण** | : बी.एस्सी. |
| **ज्ञात भाषा** | : मराठी, हिंदी व इंग्रजी. |
| **वैवाहिक माहिती** | : विवाहित, पत्नी श्रीमती आशा. |
| **अपत्ये** | : एकूण-२ (एक मुलगा व एक मुलगी). |
| **व्यवसाय** | : शेती. |
| **पक्ष** | : राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष. |
| **मतदारसंघ** | : महाराष्ट्र विधानसभा सदस्यांद्वारा निर्वाचित. |
| **इतर माहिती** | : अध्यक्ष, प्रियदर्शनी शिक्षण प्रसारक मंडळ, अंबेजोगाई; चेअरमन, सोमेश्वर सहकारी जिनींग प्रेस, महादेव औद्यागिक सहकारी संस्था मर्यादित, दौंडवाडी विविध कार्यकारी सेवा सोसायटी तसेच संचालक, कृषी उत्पन्न बाजार समिती, परळी वैजनाथ; १९९२-२००२ व २०१०-२०१२ सदस्य, जिल्हापरिषद, बीड; जानेवारी २०२० मध्ये महाराष्ट्र विधानपरिषदेवर निवड. |
| **छंद** | : शेती, वाचन व कुस्ती. |

**पत्ता** : पत्ता : मु.दौंडवाडी, पो. घाटनांदुर, ता. परळी वैजनाथ., जिल्हा-बीड ४३१५१५.

**भ्रमणध्वनी** : ८८८८९८९८०६.

**ई-मेल** : sanjaydoundo118@gmail.com.

❑❑❑



## धस, श्री. सुरेश रामचंद्र

**जन्म** : २ फेब्रुवारी, १९७०

**जन्म ठिकाण** : जामगाव, तालुका-आष्टी, जिल्हा-बीड.

**शिक्षण** : बी.ए., स्थापत्य अभियांत्रिकी पदविका.

**ज्ञात भाषा** : मराठी, हिंदी व इंग्रजी.

**वैवाहिक माहिती** : विवाहित, पत्नी श्रीमती संगीता व श्रीमती प्राजक्ता.

**अपत्ये** : एकूण-३ (दोन मुलगे व एक मुलगी).

**व्यवसाय** : सामाजिक कार्य व शेती.

**पक्ष** : भारतीय जनता पक्ष.

**मतदारसंघ** : उस्मानाबाद-बीड-लातूर स्थानिक प्राधिकारी संस्था.

**इतर माहिती** : १९९३ पासून सचिव, श्री दत्त शिक्षण प्रसारक मंडळ, जामगाव; २०१३ पासून अध्यक्ष, पिंपळेश्वर देवस्थान ट्रस्ट; आष्टी तालुक्यातील लोकमान्य कलारंग संस्था, कलादर्शन संस्था, राजर्षी शाहू कलामंच तसेच सम्राट अशोक कला व क्रिडा मंडळांशी निकटचा संबंध; १९९२-१९९७ सरपंच, ग्रामपंचायत, जामगाव; १९९७-१९९८ सदस्य व १९९८ -१९९९ उपाध्यक्ष, जिल्हा परिषद, बीड; १९९६ पासून संचालक व २००१-२००२, २०१०-२०११ व २०११-२०१३ चेअरमन, आष्टी तालुका दूध उत्पादक व पुरवठा सहकारी संघ लि. आष्टी; २०११-

२०१२ संचालक व २०१२-२०१३ अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य सहकारी दुध महासंघ (महानंद), मुंबई; १९९९-२००४ कार्यकारणी सदस्य, महाराष्ट्र प्रदेश भारतीय जनता पक्ष; २००९ मध्ये राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे कार्य; २०१०-२०१४ औरंगाबाद व परभणी जिल्हा संपर्कप्रमुख; सन २०१४ मध्ये उत्तराखंड येथे झालेल्या अतिवृष्टीमुळे व महाप्रलयात अडकलेल्या भाविकांना सुरक्षित ठिकाणी आणून अनेकांचे प्राण वाचविल्याबद्दल तत्कालीन केंद्रिय कृषी मंत्री शरद पवार आणि महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांच्याकडून विशेष गौरव करण्यात आला; २००२-२००४ व २०१३ मधील दुष्काळी परिस्थितीत पशुधन वाचविण्यासाठी छावणी सुरू केली; १९९९-२००४, २००४-२००९, २००९-२०१४ सदस्य, महाराष्ट्र विधानसभा; विधानमंडळाच्या अंदाज समिती व अनुसूचित जाती-जमाती कल्याण समितीचे सदस्य; २०१०-२०११ समिती प्रमुख, अनुसूचित जाती-जमाती कल्याण समिती; जून २०१३ ते ऑक्टोबर २०१४ महसूल, मदत व पुनवर्सन, सहकार, पणन, वस्त्रोद्योग खात्याचे राज्यमंत्री, जून २०१८ मध्ये महाराष्ट्र विधानपरिषदेवर निवड.

**छंद** : वाचन, खेळ व सामाजिक कार्य.

**परदेश प्रवास** : दुबई व इस्त्रायल देशांचा अभ्यास दौरा.

**पत्ता** : (१) "अव्दैतचंद्र", जामगाव रोड, मु.पो.आष्टी, ता. आष्टी, जि. बीड.

**दूरध्वनी** : (निवास) (०२४४१) २८२९८७.
(कार्यालय) (०२४४१) २८२००१.

**भ्रमणध्वनी** : ९९२०४१०००२, ९५५१९३३०३०.

**ई-मेल** : sureshdhasmla@gmail.com.
sureshdhas2014@gmail.com.

❑❑❑



## नाईक, श्री. निलय मधुकरराव

| | |
|---|---|
| **जन्म** | : २४ मार्च,१९६३. |
| **जन्म ठिकाण** | : पुसद, जिल्हा यवतमाळ. |
| **शिक्षण** | : बी.ए., एलएल.एम. |
| **ज्ञात भाषा** | : मराठी, हिंदी, इंग्रजी व बंजारी. |
| **वैवाहिक माहिती** | : विवाहित, पत्नी डॉ. सुजाता. |
| **व्यवसाय** | : शेती. |
| **पक्ष** | : भारतीय जनता पक्ष. |
| **मतदारसंघ** | : महाराष्ट्र विधानसभा सदस्यांद्वारा निर्वाचित. |
| **इतर माहिती** | : अध्यक्ष, वसंतराव नाईक प्रतिष्ठान, मुंबई; अध्यक्ष, वसंतराव नाईक फाऊंडेशन, पुसद; सचिव, विद्या शिक्षण प्रसारक मंडळ, गहुली; अध्यक्ष, यवतमाळ जिल्हा बास्केट बॉल संघटना; १९९१-१९९५ उपाध्यक्ष, वसंत सहकारी साखर कारखाना, पोफाळी, उमरखेड; १९९९-२००१ अध्यक्ष, पुष्पावंती सहकारी साखर कारखाना, महागाव, जिल्हा यवतमाळ; १९८९-१९९७ सरचिटणीस, महाराष्ट्र प्रदेश युवक काँग्रेस; २००२-२०१६ सरचिटणीस, महाराष्ट्र प्रदेश राष्ट्रवादी काँग्रेस; १९९२-१९९७ अध्यक्ष, जिल्हा परिषद, यवतमाळ; जुलै २०१८ मध्ये महाराष्ट्र विधानपरिषदेवर निवड. |

**छंद** : बास्केट बॉल खेळणे, वाचन व संगीत ऐकणे.

**पत्ता** : (१) मु.पो.गहुली, ता. पुसद, जि. यवतमाळ.
(२) अजिंक्य प्रिटिंग प्रेस, गांधी नगर, पुसद,
जिल्हा यवतमाळ-४४५२०४.

**दूरध्वनी** : ०७२३३-२४६७१०.

**भ्रमणध्वनी** : ९४२२१६५५२२.

**ई-मेल**: nilaymnaik@gmail.com.

❑❑❑



## पटेल, श्री. अमरिशभाई रसिकलाल

**जन्म** : १४ सप्टेंबर, १९५२

**जन्म ठिकाण** : नडियाद, तालुका-नडियाद, जिल्हा-खेडा (गुजरात).

**शिक्षण** : एस.एस.सी.

**ज्ञात भाषा** : मराठी, हिंदी, इंग्रजी व गुजराथी.

**वैवाहिक माहिती** : विवाहित, पत्नी श्रीमती जयश्री.

**अपत्ये** : एकूण-२ (एक मुलगा व एक मुलगी).

**व्यवसाय** : व्यापार.

**पक्ष** : भारतीय जनता पक्ष.

**मतदारसंघ** : धुळे तथा नंदुरबार स्थानिक प्राधिकारी संस्था.

**इतर माहिती** : शिरपूर तालुक्यातील ७१ व मुंबई शहरातील २२ शैक्षणिक संस्थांचे अध्यक्ष, या संस्थामधून शिरपूर तालुक्यात १७,००० व मुंबई शहरात ३४,००० विद्यार्थी शिक्षणाचा लाभ घेत आहेत; धुळे शहरात दोन भव्य स्टेडियम बांधले व प्रत्येक तालुक्यासाठी एका स्टेडियमसाठी मंजुरी दिली व महाराष्ट्र राज्यात २०० स्टेडियम बांधकामासाठी मंजुरी दिली; पहिली ते दहावी विद्यार्थ्यांना पाठ्यपुस्तके मोफत पुरविण्याचा निर्णय घेतला; राज्यातील विद्यार्थ्यांचा अपघाती विमा उतरविण्याचा निर्णय घेतला; तसेच, शिरपुर तालुक्यातील मतदारांचा अपघाती विमा

उतरविला व ४७५ अपघाती विमाधारकांनी लाभ घेतला; जातीय सलोखा राखण्यासाठी प्रयत्न; आदिवासींच्या विकासासाठी प्रयत्न; सूतगिरणी, पिपल्स बँक, प्रियदर्शनी पतपेढी व प्रियदर्शनी प्रिंटिंग प्रेस व अमोदा तेलबिया उद्योग सुरू केला; आदिवासी भागात ५४४ कि.मी. लांबीचे रस्ते तयार केले; पुल, फरशा, मोऱ्या, नळपाणी पुरवठा, सर्व शिक्षा मोहिम, विजेची नवीन उपकेंद्रे, जवाहर योजना व अनेक लहान मोठ्या जलसिंचन योजना कार्यान्वीत केल्या; १९८५-९८ नगराध्यक्ष, शिरपूर, या काळात नगरपालिकेला राज्यातील स्वच्छता मोहिमेचे प्रथम पारितोषिक मिळाले; नगरपालिकेचा पाण्याचा प्रश्न, इंदिरा हॉस्पिटल, झोपडपट्टीधारकांसाठी पक्की घरे तसेच गांडूळ खत व सेंद्रिय खताची निर्मिती व विक्री सुरू केली; १९९०-९५, १९९५-९९, १९९९-२००४, २००४-२००९ सदस्य, महाराष्ट्र विधानसभा; २०१०-२०१६, २०१६-२०१९, २०२०-२०२२ सदस्य, महाराष्ट्र विधानपरिषद; जानेवारी २००३ ते ऑक्टोबर, २००४ शालेय शिक्षण, क्रिडा व युवक कल्याण खात्याचे मंत्री; जानेवारी, २०२२ मध्ये महाराष्ट्र विधानपरिषदेवर फेरनिवड.

**परदेश प्रवास** : अमेरिका, यु.के., युरोपीय देश, जपान, हाँगकाँग इत्यादी देशांचा अभ्यास दौरा.

**छंद** : सामाजिक व शैक्षणिक कार्य.

**पत्ता** : (१) जनक व्हिला, रामसिंग नगर समोर, नेहरू रोड, शिरपूर, जिल्हा-धुळे, ४२५४०५.

**दूरध्वनी** : ०२५६३-२५५३००, ०२५६३-२५५४००.

(२) पल्लवी बीच, 'एंजल' बंगला नं.१, रूईया पार्क, जुहू, विलेपार्ले (पश्चिम), मुंबई.

**भ्रमणध्वनी** : ९८२००२०९९९.

**ई-मेल** : arpdhule@gmail.com

❑❑❑



## पटेल, श्री. चंदुलाल विश्रामभाई

**जन्म** : १० ऑक्टोबर, १९६५.

**जन्म ठिकाण** : जळगाव.

**शिक्षण** : एस.एस.सी.

**ज्ञात भाषा** : मराठी, हिंदी व गुजराथी.

**वैवाहिक माहिती** : विवाहित, पत्नी श्रीमती शारदाबेन.

**अपत्ये** : एकूण-२ (दोन मुलगे).

**व्यवसाय** : शेती.

**पक्ष** : भारतीय जनता पक्ष.

**मतदारसंघ** : जळगाव स्थानिक प्राधिकारी संस्था.

**इतर माहिती** : जळगाव मधील अपंग मुलांना शैक्षणिक साहित्याचे वाटप; जळगाव महापालिकेला रूग्णवाहिका उपलब्ध करून दिल्या ; चेअरमन, सुभाष चौक नागरी सहकारी पतसंस्था लि. जळगाव; डिसेंबर २०१६ मध्ये महाराष्ट्र विधानपरिषदेवर निर्वाचित. विधानमंडळाच्या इतर मागासवर्ग कल्याण समितीचे सदस्य म्हणून कार्य.

**परदेश प्रवास** : चीन देशाचा दौरा.

**छंद** : वाचन, लेखन व खेळणे.

**पत्ता** : ७८, विश्राम शिवराम नगर, ओंकारेश्वर मंदिराजवळ, मु. पो. ता. जि. जळगाव-४२५ ००१.

**दूरध्वनी** : (निवास व कार्यालय) (०२५७) २२२३२३०.

**भ्रमणध्वनी** : ९९६०३८३३३०.

**ई-मेल** : mlccvpatel@gmail.com.

❑❑❑



## पडळकर, श्री. गोपीचंद कुंडलिक

**जन्म** : १ ऑक्टोबर, १९८१.

**जन्म ठिकाण** : पडळकरवाडी, तालुका-आटपाडी, जिल्हा-सांगली.

**शिक्षण** : बारावी.

**ज्ञात भाषा** : मराठी व हिंदी.

**वैवाहिक माहिती** : अविवाहित.

**व्यवसाय** : शेती.

**पक्ष** : भारतीय जनता पक्ष.

**मतदारसंघ** : महाराष्ट्र विधानसभा सदस्यांद्वारा निर्वाचित.

**इतर माहिती** : मे, २०२० मध्ये महाराष्ट्र विधानपरिषदेवर निर्वाचित.

**छंद** : वाचन.

**पत्ता** : (१) मु.पो. पडळकरवाडी, पो.पिंपरी बु., तालुका-आटपाडी, जिल्हा- सांगली.
(२) मु.पो.झरे, तालुका-आटपाडी, जिल्हा सांगली.
**भ्रमणध्वनी** : ९९७०५२१००३.
**ई-मेल** : gopichandpadalkar007@gmail.com.

❑❑❑



## परब, ॲड. अनिल दत्तात्रय

**जन्म** : ३१ डिसेंबर, १९६४.

**जन्म ठिकाण** : मुंबई.

**शिक्षण** : बी.कॉम., एलएल.बी.

**ज्ञात भाषा** : मराठी, हिंदी व इंग्रजी.

**वैवाहिक माहिती** : विवाहित, पत्नी श्रीमती सुनिता.

**अपत्ये** : एकूण-२ (दोन मुली).

**व्यवसाय** : उद्योग.

**पक्ष** : शिवसेना.

**मतदारसंघ** : महाराष्ट्र विधानसभा सदस्यांद्वारा निर्वाचित.

**इतर माहिती** : संघटनेच्या माध्यमातून सामाजिक व सांस्कृतिक कार्य; गरीब, गरजू विद्यार्थ्यांना शालोपयोगी साहित्यांचे वाटप; गरीब रुग्णांना सर्वोतोपरी मदत, दहिहंडी, गणेशोत्सव, नवरात्रोत्सव कार्यक्रमांचे आयोजन, आरोग्य तपासणी, रक्तदान शिबीरांचे आयोजन; सामान्य माणसांना कायदेविषयक मोफत सल्ला; विविध क्रिडा स्पर्धांचे तसेच सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन; बांद्रा येथील शासकीय वसाहतीच्या समस्या सोडविण्याचा प्रयत्न; स्पर्धा परिक्षांसाठी मार्गदर्शन शिबीरांचे आयोजन; २००१ पासून शिवसेना विभाग प्रमुख, पक्षाच्या कायदेविषयक कामाची

जबाबदारी, पक्षाच्या सर्व आंदोलनात सक्रीय सहभाग; २००४-२०१०, २०१२-२०१८ सदस्य, महाराष्ट्र विधानपरिषद; जुलै २०१८ मध्ये विधानपरिषदेवर फेरनिवड तसेच ३० डिसेंबर, २०१९ पासून परिवहन, संसदीय कार्य खात्यांचे मंत्री.

**परदेश प्रवास** : सिंगापूर, मलेशिया, बँकॉक, ऑस्ट्रेलिया, अमेरिका व युरोप.

**छंद** : खो-खो, क्रिकेट व वाचन.

**पत्ता** : (१) ५८/२६२५, रविकिरण को.ऑप. हाऊसिंग सोसायटी लि., गांधीनगर, वांद्रे (पूर्व), मुंबई ४०००५१.

(२) परिवहन, संसदीय कार्य मंत्री, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई-४०००३२.

(३) क-५, शासकीय कुटीर, मादाम कामा मार्ग, मुंबई-४०००३२.

**भ्रमणध्वनी** : ९८२०४१३५०५.

**ई-मेल** : anildattatray@gmail.com

❑❑❑



## पाटील, श्री. कपिल हरिश्चंद्र

**जन्म** : ऑगस्ट, १९६१

**जन्म ठिकाण** : मु.पो.पोफरण, तालुका-डहाणू, जिल्हा- पालघर.

**शिक्षण** : बी.ए.

**ज्ञात भाषा** : मराठी, हिंदी व इंग्रजी.

**वैवाहिक माहिती** : विवाहित, पत्नी श्रीमती वर्षा लक्ष्मण कांबळे.

**अपत्ये** : एकूण-१ (एक मुलगा).

**व्यवसाय** : पत्रकारिता/प्रकाशक.

**पक्ष** : लोकभारती.

**मतदारसंघ** : मुंबई विभाग शिक्षक.

**इतर माहिती** : कार्यकारी विश्वस्त, राष्ट्र सेवा दल; संस्थापक अध्यक्ष, लोकभारती; संस्थापक, शिक्षक भारती; माजी संपादक, दैनिक आज दिनांक; माजी सहसंचालक, हरकिसनदास मेहता इन्स्टिटयूट ऑफ जरनॅलिझम, मुंबई.; माजी सदस्य, महाराष्ट्र राज्य मराठी विकास संस्था; संस्थापक सचिव, छात्रभारती (विद्यार्थी चळवळ); साधना साप्ताहिकाचे गाजलेले संपादक यदुनाथ थत्ते, विचारवंत प्राचार्य डॉ. ना. य. डोळे आणि प्रख्यात लेखक व छात्रभारतीचे संस्थापक अध्यक्ष डॉ. मु.ब.शहा यांच्या समवेत काम; सचिव, नामांतरवादी कृती समिती. मराठवाडा विद्यापीठ नामांतर लढ्यात सहभाग; ग.ल.पाटील. दि.बा.पाटील, मुकुंदराव भुजबळ-पाटील हे नेते

ह्यात नाहीत, पण या नेत्यांच्या सोबत ओबीसी जाती व ज्ञाती संघटनांमध्ये १९८० पासून कार्यरत; 'मंडल आयोग : ओबीसींचा जाहीरनामा' या नावाची दोन पुस्तके लिहिली आणि प्रकाशित केली; मंडल आणि ओबीसींच्या प्रश्नांवरची महाराष्ट्रातील ती पहिली पुस्तके; मुस्लीम ओबीसी संघटनेच्या स्थापनेत (१९८४) शब्बीर अन्सारी यांच्या सोबत सहभाग; हिंदी चित्रपट अभिनेते दिलीपकुमार यांच्या समवेत मुस्लीम ओबीसींमध्ये जागृती आणि संघटन; मंडल आयोगाच्या शिफारशींच्या अंमलबजावणीसाठीच्या, आरक्षण समर्थनार्थ जनार्दन पाटील यांच्या समवेत महाराष्ट्रभर परिषदांचे आयोजन; राजकीय लेखांचा संग्रह 'रागदरबारी'; विधान परिषदेतील निवडक भाषणांचा संग्रह 'आयुध'; माजी केंद्रीयमंत्री, माजी मुख्यमंत्री विलासराव देशमुख यांच्या गाजलेल्या भाषणांचा संग्रह 'देश-मुखी' चे संपादन; बी.एड., डी.टी.एड. विद्यार्थ्यांचं आंदोलन, कॅपिटेशन फी विरोधी कायद्यासाठी आंदोलन; अंधश्रद्धा निर्मूलन यात्रेचे आयोजन; महात्मा फुले गौरव शताब्दी कार्यक्रमांचे संयोजन; कर्मवीर भाऊराव पाटील जन्मशताब्दी कार्यक्रमाचे आयोजन; महात्मा फुले विचार संवर्धन समितीच्या स्थापनेत पुढाकार; सच्चर समितीच्या शिफारशींची अंमलबजावणी करावी यासाठीच्या लढ्यात सहभाग; मराठवाड्यातील भुतेगावात पिण्याच्या पाण्याच्या प्रश्नावरून झालेल्या संघर्षात शहीद झालेल्या दलित तरूणाचे स्मारक उभे केले; शिखर शिंगणापूरचा इतिहास सांगणाऱ्या सामाजिक बंधुभाव परिषदेचे आयोजन केले; विनाअनुदान धोरणाच्या विरोधात संघर्ष; रात्रशाळा वाचवण्यासाठी ऐतिहासिक ठरलेल्या प्रचंड बॅटरी मोर्चाचं नेतृत्व; विकास भारती, गांधी-आंबेडकर फाऊंडेशन व नवनिर्माण शिक्षण संस्थांच्या स्थापनेत पुढाकार. थोर समाजसेवक अण्णा हजारे यांच्या भ्रष्टाचार विरोधी आंदोलनात पहिल्या पासून सक्रिय सहभाग; हरित वसई आंदोलनात फादर फ्रान्सिस दिब्रेटो यांच्यासोबत सक्रिय सहभाग;

शिक्षकांना छळणारी आचारसंहिता रोखली; मुंबईतल्या कोसळणाऱ्या इमारतींचा प्रश्न सभागृहात मांडून स्ट्रक्चरल ऑडिटची नवी कल्पना शासनाला मान्य करायला भाग पाडलं; समुद्रातला दुष्काळ व वादळ याचा फटका बसलेल्या मच्छिमारांना ३४ कोटीचे पॅकेज

मिळवून दिले. शिक्षण क्षेत्रात महत्वाचे योगदान देणाऱ्यांना शिक्षक भारतीतर्फे सावित्रीबाई फुले-फातिमा शेख यांच्या नावाने दरवर्षी पुरस्कार सुरू केला; शिक्षकांच्या साहित्य प्रज्ञेचा शोध घेण्यासाठी शिक्षक साहित्य संमेलन सुरू केले; मधु मंगेश कर्णिक, भालचंद्र नेमाडे, वसंत आबाजी डहाके, सदानंद मोरे, नागनाथ कोत्तापल्ले, संभाजी भगत, शफाअत खान, रमेश इंगळे उत्रातकर यांचा संमेलनात सहभाग राहिला आहे; डॉ. राममनोहर लोहिया यांच्या जन्मशताब्दीच्या निमित्ताने मुंबईत लोहिया मेळाव्याचे आयोजन; गुरूदेव रवींद्रनाथ टागोर आणि साने गुरूजींचा आंतरभारतीचा नारा देण्यासाठी देशभरातल्या प्रतिनिधींचा सहभाग असलेली आंतरभारती परिषदेचे २००८ मध्ये मुंबईत आयोजन; राजभाषा आणि पाठ्यपुस्तकातली मराठी सोपी आणि आनंददायी करण्याची मागणी करत २००६ ते २००९ सलग तीन वर्षे स्कोअरींग मराठी परिषदेचे आयोजन; मुंबईतील विज्ञान प्रदर्शनात शिक्षकांना प्रोत्साहन देण्यासाठी आमदार चषकाची सुरूवात. मुंबईत २६ जुलैच्या महापुरात वाहून गेलेल्या शाळांना संस्थेचा, पालकांचा आणि शिक्षकांना एकही रूपया खर्च होऊ न देता नवीन इमारती मिळवून दिल्या; लोकमान्य टिळकांचे सहकारी, स्वातंत्र्यसेनानी काका बाप्टिस्टा आणि मराठीचे पहिले कादंबरीकार, मराठी पाठ्यपुस्तकांचे आद्यलेखक बाबा पद्मनजी यांच्या कबरी शिवडीच्या स्मशानभूमीत बेदखल होऊन झाडाझुडपात लपून गेल्या होत्या, या थोरांचे स्मारक उभारले; मुंबईतील अतिरेकी हल्ल्यातील शहिदांना अभिवादन करणाऱ्या कार्यक्रमांचे आयोजन; विद्यार्थ्यांच्या आत्महत्यांनी महाराष्ट्र हादरल्यानंतर त्या रोखण्यासाठी मुंबईतील शिक्षक, मुख्याध्यापकांची कार्यशाळा आयोजित करून तणावमुक्त विद्यार्थी अभियान राबवले; मार्च २०१० महिला शिक्षकांना १८० दिवसाची प्रसुती रजा महिला दिनाच्या दिवशी मिळवून दिली; फेब्रुवारी, २०११ मध्ये देशात अग्रेसर असणाऱ्या दिल्ली, केरळ, बिहार एसएससी बोर्डांचा तुलनात्मक अभ्यास करण्यासाठी मुंबईच्या तज्ज्ञ शिक्षक, मुख्याध्यापक आणि शिक्षणाधिकारी यांच्या तीन टीम पाठवल्या, त्याचा अहवाल शासनाला सादर केला, त्यानुसार आता एस.एस.सी बोर्डात बदल घडत आहेत; शिक्षकांना धार्मिक यात्रा आणि पाल्यांच्या

उच्च शिक्षणासाठी पी.एफ. फंडातून विना परतावा कर्ज मिळवण्याचा निर्णय करून घेतला. मुंबईतल्या शिक्षकांचे पगार राष्ट्रीयकृत बँकेमार्फत १ तारखेला करून घेण्यात पुढाकार; शिक्षकांना सहावा वेतन आयोग नाकारणाऱ्या हकीम समितीच्या शिफारशींची होळी आणि जेलभरो; हिंदी विषय अभ्यासक्रमातून वगळण्याचा शासनाचा निर्णय रद्द करण्यास सरकारला भाग पाडले, हजारो शिक्षकांच्या नोकऱ्या वाचवल्या; हिंदी भाषिकांवरील हल्ल्यांच्या विरोधात मुंबईत एक दिवसाचे लाक्षणिक उपोषण;

शिक्षणसेवक कायद्यात सुधारणा करणारे अशासकीय विधेयक सादर करून 'शिक्षण सेवक' हा शब्द बदलण्यास सरकारला भाग पाडले; आता 'प्रोबेशनरी टिचर' असे नामाभिधान आणि मानधनही वाढले; वाड्या, वस्त्यांवर गरीबांच्या घरात शिक्षण पोचवणाऱ्या, सतत १३ वर्ष संघर्ष करणाऱ्या ८५०० वस्तीशाळा शिक्षकांच्या संघर्षात साथ; तीन दिवस उपोषण करून न्याय मिळवून दिला; केजी टू पीजी मोफत शिक्षणाचा हक्क मिळालाच पाहिजे, शिक्षणाच्या खाजगीकरणाच्या विरोधात २०१३ आणि २०१४ मध्ये मुंबईत पालक-शिक्षक- संस्थाचालक यांचे मेळावे आयाजित केले, या मेळाव्यांमध्ये महाराष्ट्र राज्य शिक्षण हक्क कृती समितीचे अध्यक्ष प.म.राऊत, निमंत्रक अमोल ढमढेरे यांचा सहभाग होता. मुंबईतल्या झोपडपट्टीतल्या शाळांत पिण्याचे स्वच्छ पाणी आणि स्वच्छतागृहासाठी २६ कोटीचा निधी मिळवून दिला; अंधश्रद्धा निर्मूलन चळवळीचे नेते डॉ. नरेंद्र दाभोळकर यांच्या हत्येच्या निषेधार्थ करण्यात आलेल्या विविध आंदोलनात पुढाकार.

सन २००६-२०१२, २०१२-२०१८ सदस्य, महाराष्ट्र विधानपरिषद. राष्ट्रकुल संसदीय मंडळाच्या महाराष्ट्र शाखेतर्फे सन २००९ मध्ये महाराष्ट्र विधानमंडळाच्या अमृत महोत्सव कार्यक्रमात भारताच्या महामहिम राष्ट्रपती प्रतिभाताई पाटील यांच्या हस्ते "उत्कृष्ट भाषण" पुरस्कार प्राप्त; राष्ट्रकुल संसदीय मंडळ, महाराष्ट्र शाखेतर्फे सन २०१६-२०१७ चा "उत्कृष्ट भाषण" पुरस्कार प्राप्त; जुलै २०१८ मध्ये महाराष्ट्र विधानपरिषदेवर फेरनिवड.

**प्रकाशने** : ● मंडल आयोगाच्या शिफारशी

● राजकीय लेख संग्रह "रागदरबारी"

● विलासराव देशमुख यांच्या गाजलेल्या भाषणांचा संग्रह "देश-मुखी"

● विधान परिषदेतील भाषणांचा संग्रह "आयुध".

● पोस्टर कविता :-" येवोत किती द्रोणाचार्य !
काळ आता डरणार नाही !
नवा एकलव्य येत आहे !
दान अंगठ्याचे करणार नाही !

**छंद** : वाचन.

**पत्ता** : (१) फ्लॅट नं. ४०१, अस्मी ड्रीम्स, एम.जी.रोड, ऑफ एस.व्ही.रोड, गोरेगाव (प), मुंबई-४००१०४.

(२) कार्यालय : शिक्षक भारती, १४, तळमजला, पोयबावडी म्युन्सिपल स्कुल, के.ई.एम. हॉस्पिटल समोर, कामगार मैदानाजवळ, परळ, मुंबई-४०० ०१२.

**दूरध्वनी** : (कार्यालय) (०२२) २४१५०५७६,
(निवास) (०२२) २८७९२००२.

**भ्रमणध्वनी** : ९८१९८७०५५५, ९९६७९६६५५५.

**फॅक्स** : (०२२) २४१५०५७६.

**ई-मेल** : kapilhpatil@gmail.com.

**Facebook** : @kapilHpatil.

**Twitter** : @ kapilHpatil.

❑❑❑



## पाटील, श्री. जयंत प्रभाकर

**जन्म** : ७ जुलै, १९५५.

**जन्म ठिकाण** : भडवळ, तालुका-कर्जत, जिल्हा-रायगड.

**शिक्षण** : एस.एस.सी.

**ज्ञात भाषा** : मराठी, हिंदी व इंग्रजी.

**वैवाहिक माहिती** : विवाहित, पत्नी श्रीमती सुप्रिया.

**अपत्ये** : एकूण-१ (मुलगा).

**व्यवसाय** : व्यापार.

**पक्ष** : शेतकरी कामगार पक्ष.

**मतदारसंघ** : महाराष्ट्र विधानसभा सदस्यांद्वारा निर्वाचित.

**इतर माहिती** : सन २००० पासून अध्यक्ष, प्रभाकर पाटील एज्युकेशन संस्था, अलिबाग; संचालक, कोकण एज्युकेशन सोसायटी, या संस्थेमार्फत अभियांत्रिकी महाविद्यालय, रोहा, आर्टस, कॉमर्स कॉलेज व महिला विद्यालय, पेझारी येथे सुरू केले; १९९१ संचालक, महाराष्ट्र राज्य मार्केटिंग फेडरेशन; १९९५ संचालक, महाराष्ट्र राज्य सहकारी बँक लि., मुंबई; संचालक, मच्छिमार संघ; १९८६ संचालक व १९९६ पासून चेअरमन, रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक; राज्यात प्रथमच या बँकेला २००८-२००९ मध्ये “आय.एस.ओ”. नामांकन मिळवून दिले; ५ वर्षे संचालक, महाराष्ट्र राज्य मजूर संघ, पुणे; संस्थापक, रायगड बझार, या संस्थेमार्फत

अलिबाग, पेण, खोपोली, पनवेल व जिल्ह्यात १० ठिकाणी डिपार्टमेंटल स्टोअर्स सुरू केले; सहकार क्षेत्रातील उल्लेखनीय कामगिरीबद्दल २०११-२०१२ महाराष्ट्र शासनाचा "सहकार निष्ठ पुरस्कार" व २०१२-२०१३ चा "सहकार भूषण" पुरस्कार प्राप्त; २० वर्षे चिटणीस, २००८ पासून सरचिटणीस रायगड जिल्हा शेतकरी कामगार पक्ष; शेतकरी कामगार पक्षाच्या राज्य चिटणीस मंडळाच्या बोर्डाचे सदस्य; युवक मेळाव्यांचे आयोजन; १९७४-७८ सदस्य, ग्रामपंचायत, पोयनाड; १९७९-९० सदस्य, पंचायत समिती; १९९७-२००० सदस्य, जिल्हापरिषद रायगड; २०००-२००६, २००६-२०१२, २०१२-२०१८ सदस्य, महाराष्ट्र विधानपरिषद; सन २००२ मध्ये राष्ट्रकुल संसदीय मंडळ, महाराष्ट्र शाखेतर्फे "उत्कृष्ट संसदपटू" पुरस्कार प्राप्त; सदस्य, लोकलेखा समिती, नियम समिती, सदस्य अनुपस्थिती समिती; जुलै २०१८ मध्ये महाराष्ट्र विधानपरिषदेवर फेरनिवड.

**परदेश प्रवास** : स्वित्झरलँड, इंग्लंड, इटली, इस्त्राईल, अमेरिका, ऑस्ट्रेलिया, सिंगापूर, दुबई व मलेशिया, चीन, न्युझीलंड, फान्स, जर्मनी, ग्रिस, स्पेन, पोर्तुगाल, थायलंड, पोलंड व रशिया इत्यादी देशांचा अभ्यास दौरा.

**छंद** : वाचन व प्रवास.

**पत्ता** : (१) सुशिला सदन, मु. पेझारी-आंबेपूर, पो. पोयनाड, ता. अलिबाग, जिल्हा रायगड.

**दूरध्वनी** : (०२१४१) २२२२९०, २२४५५६.
(०२२) २२८८०६८७.

**भ्रमणध्वनी** : ९८५०६६६४४४.

**ई-मेल** : jayantpwp@gmail.com.

❑❑❑



## पाटील, श्री. बाळाराम दत्तात्रय

**जन्म** : २९ डिसेंबर, १९६३.

**जन्म ठिकाण** : नावडे, ता. पनवेल, जि. रायगड.

**शिक्षण** : बी.ए.

**ज्ञात भाषा** : मराठी, हिंदी व इंग्रजी.

**वैवाहिक माहिती** : विवाहित, पत्नी श्रीमती राजेश्री.

**अपत्ये** : एकूण-२ (एक मुलगा व एक मुलगी).

**व्यवसाय** : बांधकाम व्यवसाय.

**पक्ष** : अपक्ष.

**मतदारसंघ** : कोकण विभाग शिक्षक.

**इतर माहिती** : १९९९ पासून संस्थापक-अध्यक्ष, नावडे-तळोजे शिक्षण प्रसारक मंडळ; २०१५ पासून चेअरमन, रयत शिक्षण संस्था, रायगड विभाग; अध्यक्ष, रायगड जिल्हा कुस्तीगीर संघटना; चेअरमन, कोकण एज्युकेशन संस्था, पनवेल विभाग; २००८ पासून अध्यक्ष, व्हि.के. हायस्कुल, पनवेल; १९९६-२००२, संचालक, कर्नाळा बँक; संचालक, पनवेल कृषी उत्पन्न बाजार समिती; संचालक, रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक; १९९७-१९९८ सभापती, पंचायत समिती पनवेल; २००२-२०१५ सदस्य, सन २०००-२००५ अध्यक्ष, जिल्हापरिषद, रायगड,

२००९-२०१२ सभापती, शिक्षण व आरोग्य समिती, जिल्हापरिषद, रायगड; डिसेंबर, २०१९ सेवाग्राम वर्धा ते नागपूर पायी दिंडी; अध्यक्ष, रायगड जिल्हा ॲथेलेटिक्स; उपाध्यक्ष, महाराष्ट्र राज्य ॲथलॅटीक्स असोसिअेशन; जिल्हा परिषदेच्या उत्कृष्ट कार्याबद्दल शासनाचा 'ग्रामस्वच्छता पुरस्कार' प्राप्त; १९९९ पासून जिल्हा चिटणीस, शेतकरी कामगार पक्ष; पनवेल तालुक्यात आरोग्य तपासणी शिबीरांचे आयोजन; रायगड जिल्ह्यात खेळाडूंसाठी निवासी प्रबोधिनी सुरू केली; बाळाराम पाटील वेल्फेअर असोसिएशन व कर्नाळा चॅरिटेबल ट्रस्टच्यावतीने रोजगार मेळाव्याचे आयोजन; आदिवासी बांधवांच्या ९९१ सामुहिक विवाहांचे आयोजन; संस्थापक-विश्वस्त, जनार्दन भगत शिक्षण प्रसारक मंडळ, नवीन पनवेल; फेब्रुवारी २०१७ मध्ये महाराष्ट्र विधानपरिषदेवर निवड.

**परदेश प्रवास** : रशिया, चीन, दुबई, दक्षिण आफ्रिका, श्रीलंका इत्यादी देशांचा दौरा.

**छंद** : वाचन, क्रिकेट, वक्तृत्व, प्रशिक्षण वर्गात उपस्थित राहणे, अभ्यासदौरा करणे.

**पत्ता** : (१) मु. पो. नावडे, दत्तप्रभा निवास, ता. पनवेल, जि.रायगड.

**दूरध्वनी** (कार्यालय) : ०२२-२७४५३७०१.

**भ्रमणध्वनी** : ९९२०५९६७६७.

**ई-मे**ल : balaramdpatil@gmail.com.

❑❑❑



## पाटील, डॉ. रणजित विठ्ठलराव

**जन्म** : २० जानेवारी, १९६४.

**जन्म ठिकाण** : अकोला.

**शिक्षण** : एम.बी.बी.एस., एम.एस. (आर्थो).

**ज्ञात भाषा** : मराठी, हिंदी व इंग्रजी.

**वैवाहिक माहिती** : विवाहित, पत्नी श्रीमती अर्पणा.

**अपत्ये** : एकूण-२ (एक मुलगा व एक मुलगी).

**व्यवसाय** : वैद्यकीय.

**पक्ष** : भारतीय जनता पक्ष.

**मतदारसंघ** : अमरावती विभाग पदवीधर.

**इतर माहिती** : २००५ ते २०१० अध्यक्ष, अकोला वैद्यकीय आघाडी भा.ज.प.; २००५ ते २०१० उपाध्यक्ष, महानगर जिल्हा अकोला भा.ज.प.; महाराष्ट्र प्रदेश वैद्यकीय आघाडी भा.ज.प.; २००८ पश्चिम विदर्भ वैद्यकीय सेवा आघाडी; अध्यक्ष, देवकाबाई ट्रस्ट रूग्णालय; संचालक, ॲडव्हान्स एम.आर.आय; संचालक, आय.सी.ओ.एन व पयोष्णी शिक्षण संस्था, मुर्तिजापूर; श्री.संत गजानन महाराज संस्थान शेगाव येथे १९ वर्षापासून विनामूल्य वैद्यकिय सेवा; अपंगांसाठी रोगनिदान व शस्त्रक्रिया शिबिरांचे आयोजन; २०१०-२०१६ सदस्य, महाराष्ट्र विधानपरिषद, फेब्रुवारी

२०१७ मध्ये महाराष्ट्र विधानपरिषदेवर फेरनिवड; डिसेंबर २०१४ ते १६ जून, २०१९ गृह (शहरे), नगरविकास, कौशल्य विकास आणि उद्योजकता, माजी सैनिकांचे कल्याण, विधी व न्याय, संसदीय कार्य खात्याचे राज्यमंत्री. १६ जून, २०१९ ते नोव्हेंबर, २०१९ गृह (शहरे) कौशल्य विकास आणि उद्योजकता, माजी सैनिकांचे कल्याण, विधी व न्याय, संसदीय कार्य खात्याचे राज्य मंत्री.

**परदेश प्रवास** : ऑस्ट्रिया, फ्रान्स, इंग्लंड, टर्की, इजिप्त, साऊथ आफ्रिका, मॉरिशस, चीन, रशिया, मलेशिया, सिंगापूर, श्रीलंका, केनिया, इटली व थायलँड इत्यादी देशांचा अभ्यास दौरा.

**छंद** : वाचन, प्रवास, शेती, संगीत ऐकणे व क्रिकेट.

**पत्ता** : (१) उत्सव मंगल कार्यालया जवळ, आठले मार्ग, जठार पेठ, अकोला-४४४ ००५.

(२) हॉलीक्रॉस कॉन्हेंट समोर, जठार पेठ, अकोला, ता. जिल्हा-अकोला.

**दुरध्वनी** : (०७२४) २४२२२५२, २४२०१००.

**भ्रमणध्वनी** : ९८२२५७१७७७, ९४२२१६०४६१.

**ई-मेल** : ranjitpatilmla@gmail.com.

❑❑❑



## पाटील, श्री. रमेशदादा नारायण

**जन्म** : १५ सप्टेंबर, १९५३

**जन्म ठिकाण** : तळवली, जिल्हा ठाणे.

**शिक्षण** : बी.ए.

**ज्ञात भाषा** : मराठी, हिंदी व इंग्रजी.

**वैवाहिक माहिती** : विवाहित, पत्नी श्रीमती बबिता.

**अपत्ये** : एकूण-३ (दोन मुलगे व एक मुलगी).

**व्यवसाय** : उद्योग.

**पक्ष** : भारतीय जनता पक्ष.

**मतदारसंघ** : महाराष्ट्र विधानसभा सदस्यांद्वारा निर्वाचित.

**इतर माहिती** : २०१० पासून खजिनदार, शेतकरी शिक्षण संस्था, घणसोली; २०१२ पासून अध्यक्ष, आर.एन.पी.अँग्रो. एज्युकेशन ट्रस्ट; २०१२ पासून अध्यक्ष, कोळी महासंघ; २००५ पासून अध्यक्ष, नवी मुंबई कोळी समाज ट्रस्ट; २००४ पासून अध्यक्ष, आर.एन.पी. मेडिकल फाऊंडेशन ट्रस्ट; २०११ पासून अध्यक्ष, जय हनुमान चॅरिटेबल ट्रस्ट; उपाध्यक्ष, वैभव को.ऑप. क्रेडिट सोसायटी, घणसोली; सदस्य, छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय स्मारक समिती, मुंबई; २०१४ पासून सदस्य, भारतीय जनता पक्ष; उल्लेखनीय सामाजिक कार्याबद्दल मुंबईचा “उद्योगश्री

गौरव पुरस्कार २०१४ शहिद भगतसिंग-राजगुरू-सुखदेव मंच, पुणे यांचा "शहिद भगतसिंग-राजगुरू-सुखदेव स्मृती पुरस्कार, २०१४"; जाणीव सांस्कृतिक अभियान, नाशिक या संस्थेचा "राज्यस्तरीय जाणीव पुरस्कार २०१४"; आदिवासी कोळी समाजसेवा संघ, पुणे या संस्थेचा "महाराष्ट्र कोळीभूषण पुरस्कार २०१५"; कोळी-आगरी प्रतिष्ठान, नवी मुंबई या संस्थेचा "कोळी-आगरी प्रतिष्ठान सन्मान पुरस्कार २०१५", पोलिस आयुक्तालय, नवी मुंबई चा "नागरी सुरक्षादल पोलिस मित्र प्रबोधन पुरस्कार २०१५"; 'मी नवी मुंबईकर', नवी मुंबई या संस्थेचा "कोळी-आगरी समाज भूषण पुरस्कार २०१६"; अखिल आगरी-कोळी समाज प्रबोधन ट्रस्ट, नेरूळ, नवी मुंबई या संस्थेचा "कोळी समाजभूषण पुरस्कार २०१७" तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाजरत्न पुरस्कार २०१६ ने सन्मानित; जुलै २०१८ मध्ये महाराष्ट्र विधानपरिषदेवर निवड.

**परदेश प्रवास** : युरोप, सिंगापूर, मलेशिया, बँकॉक व थायलँड इत्यादी देशांचा अभ्यास दौरा.

**छंद** : वाचन.

**पत्ता** : पाटील हाऊस, तळवली नाका, ठाणे-बेलापूर रोड, नवी मुंबई-४००७०१.

**दूरध्वनी** : (निवास) (०२२) २७६९२५७६.
(कार्यालय) (०२२) ३७६९६९६९.

**भ्रमणध्वनी** : ७०४५४५१२३४, ९३२४५६७३९८.

**ई-मेल** : aamdarrameshdadapatil@gmail.com.

❑❑❑



## पाटील, श्री. रामराव बालाजीराव

**जन्म** : १ जानेवारी, १९५७.

**जन्म ठिकाण** : रातोळी, ता. नायगाव (खै) जि. नांदेड.

**शिक्षण** : बी.एस्सी. (द्वितीय वर्ष).

**ज्ञात भाषा** : मराठी, हिंदी व इंग्रजी.

**वैवाहिक माहिती** : विवाहित, पत्नी श्रीमती मंगलाबाई.

**अपत्ये** : एकूण-३ (दोन मुलगे, एक मुलगी).

**व्यवसाय** : शेती.

**पक्ष** : भारतीय जनता पक्ष.

**मतदारसंघ** : महाराष्ट्र विधानसभा सदस्यांद्वारा निर्वाचित.

**इतर माहिती** : सचिव, बालाजी शिक्षण प्रसारक मंडळ, रातोळी, ता. नायगाव, जि. नांदेड; अध्यक्ष, व्यंकटेश शिक्षण प्रसारक मंडळ, वापेगाव, ता. देगलूर, जि.नांदेड; १९८६ -२००१ संचालक, सेवा सहकारी सोसायटी, रातोळी; १९९८-२००३ संचालक, कृषी उत्पन्न बाजार समिती, नायगाव; १९९७-२००२ संचालक, गोदावरी मनार सहकारी साखर कारखाना लि. शंकरनगर; २००३-२००६ जिल्हा उपाध्यक्ष, २००६-२००९ जिल्हा सरचिटणीस, २००९-२०१२ जिल्हा अध्यक्ष, २०१२-२०१३ नांदेड शहर कार्याध्यक्ष, २०१३ पासून नांदेड जिल्हाध्यक्ष, भारतीय जनता पक्ष;

१९८९-२००१ सरपंच, ग्रामपंचायत रातोळी; १९९२-१९९७ सदस्य, पंचायत समिती, नायगाव; सामाजिक कार्याबद्दल शेतीनिष्ठ ‘शेतकरी पुरस्कार’, ‘दलित मित्र पुरस्कार’ व ‘पोलीस मित्र’ पुरस्काराने सन्मानित; जुलै २०१८ मध्ये महाराष्ट्र विधानपरिषदेवर निवड.

**छंद** : समाजसेवा व शेती करणे.

**पत्ता** : (१) मु. पो. रातोळी, ता. नायगांव (खै), जि. नांदेड-४३१ ७२२.

(२) मु.पो. आनंदनगर नांदेड, “बालाजी कृपा निवास”, मलेरिया ऑफिस जवळ, आनंदनगर.

(३) रूम नं.५, पहिला मजला, बिल्डींग नं. ६/११२, म्युनीसिपल टेनामेंट जे.बी. टेमकर मार्ग, बी.एम.सी.कॉलनी, ससमेरा कॉलेज जवळ, वरळी, मुंबई-३०.

**भ्रमणध्वनी** : ९९२१९०२५७१.

**ई-मेल** : rampatil8899@gmail.com.

❑❑❑



## पाटील, श्री. सतेज उर्फ बंटी डी.

**जन्म** : १२ एप्रिल, १९७२.

**जन्म ठिकाण** : कसबा बावडा, तालुका करवीर, जिल्हा कोल्हापूर.

**शिक्षण** : डीबीए.

**ज्ञात भाषा** : मराठी, हिंदी व इंग्रजी.

**वैवाहिक माहिती** : विवाहित, पत्नी श्रीमती प्रतिमा.

**अपत्ये** : एकूण-२ (एक मुलगा व एक मुलगी).

**व्यवसाय** : शेती.

**पक्ष** : भारतीय राष्ट्रीय काँग्रेस.

**मतदारसंघ** : कोल्हापूर स्थानिक प्राधिकारी संस्था.

**इतर माहिती** : १९९२-९३ अध्यक्ष, शिवाजी विद्यापीठ स्टुडंटस् कौन्सिल, २००४-२०१० सिनेट सदस्य, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर; चेअरमन, पद्मश्री डॉ. डी.वाय पाटील सहकारी साखर कारखाना लि. गगनबावडा; अध्यक्ष, श्री मौनी विद्यापीठ, गारगोटी व हनुमान भक्त मंडळ, कसबा बावडा; उपाध्यक्ष, डॉ.डी.वाय. पाटील एज्युकेशन सोसायटी, पुणे व कोल्हापूर; उपाध्यक्ष, कोल्हापूर डिस्ट्रिक्ट ॲम्युच्यअर बॉक्सिंग असोसिएशन, कोल्हापूर; भारतीय राष्ट्रीय काँग्रेस (आय) पक्षाचे कार्य; जांबुसर जिल्हा भरोच, गुजरात येथे पक्ष निरिक्षक; संचालक, कोल्हापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक; सल्लागार, टेलीफोन ॲडव्हाईझर कमिटी; सदस्य,

वसंतदादा शुगर इन्स्टीट्युट, पुणे; श्रीराम सेवा सोसायटीचे कार्य; डी.वाय. पाटील हॉस्पिटलच्या माध्यमातून गरीब रुग्णांना मदतः आरोग्य शिबीरांचे आयोजन; करवीर तालुक्यात एकाच दिवशी १० हजार वृक्षांची लागवड केली. कोल्हापूर जिल्ह्यातील पूरग्रस्तांना मदत कार्य; डी.वाय. पाटील शैक्षणिक संकुलाच्या माध्यमातून रक्तदान शिबीरांचे आयोजन; महिला प्रशिक्षण शिबिरांचे, एड्स जनजागरण कार्यक्रमांचे आयोजन; गरीब, गरजू विद्यार्थी दत्तक योजना, व्यक्तीमत्व विकास शिबीर, गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार, व्यक्तीमत्व विकासासाठी विद्यार्थ्यांकरिता विविध उपक्रमांचे आयोजन; आंतरराष्ट्रीय स्तरावरील खेळाडूंना मदत; जिल्हापरिषद व महानगरपालिकेतील विद्यार्थ्यांना शालोपयोगी वस्तूंचे वाटप; भारतीय संस्कृतीमधील एकत्र कुटुंब पद्धती रहावी यासाठी ट्रस्ट व फायटर्स स्पोटर्स क्लब यांच्या मार्फत प्रा. संजय देसाई यांच्या स्मरणार्थ “आदर्श एकत्र कुटुंब” पुरस्कार २००२ पासून सुरू केला; महिला बचत गटांना प्रोत्साहन व मार्गदर्शन करण्यासाठी महिला महोत्सवाचे आयोजन; विवाहपूर्व एड्स चाचणी शासनाकडून सक्तीची करावी यासाठी प्रयत्न; वाढदिवसानिमित्त प्रोत्साहन म्हणून शालेय विद्यार्थ्यांना वह्या वाटपाची २०१४ मध्ये लिम्का बुक ऑफ रेकॉर्ड व २०१६ मध्ये वल्ड रेकॉर्डस् ऑफ इंडिया मध्ये नोंद; २००४-२००९, २००९-२०१४ सदस्य, महाराष्ट्र विधानसभा, नोव्हेंबर, २०१० ते २०१४ गृह, ग्रामविकास, अन्न व औषध प्रशासन, फलोत्पादन खात्याचे राज्यमंत्री व लातूर जिल्हाचे पालकमंत्री; जानेवारी २०१६ ते जानेवारी २०२२ सदस्य, महाराष्ट्र विधानपरिषद, जानेवारी २०२२ मध्ये महाराष्ट्र विधानपरिषदेवर फेरनिवड. तसेच ३० डिसेंबर, २०१९ पासून गृह (शहरे), गृहनिर्माण, परिवहन, माहिती तंत्रज्ञान, संसदीय कार्य व माजी सैनिकांचे कल्याण खात्यांचे राज्यमंत्री.

**परदेश प्रवास** : ऑस्ट्रेलिया, न्युझीलंड, युरोप व सिंगापूर इत्यादी देशांचा अभ्यास दौरा, सप्टेंबर २०११ मध्ये ब्रिटन मधील सुरक्षा व्यवस्था पाहणीकरीता तत्कालिन गृहमंत्री श्री.आर.आर.पाटील व शिष्टमंडळासोबत लंडन येथे शासकीय अभ्यास दौरा.

**छंद** : वाचन, संगीत, क्रिकेट, हॉकी व फुटबॉल.

**पत्ता** : (१) २१२६, ई वॉर्ड, अजिंक्यतारा, ताराबाई पार्क, कोल्हापूर.

(२) ५४७, इ, यशवंत निवास, श्रीराम सोसायटी जवळ, कसबा बावडा, कोल्हापूर- ४१६००६.

(३) गृह (शहरे), गृहनिर्माण, परिवहन, माहिती तंत्रज्ञान, संसदीय कार्य, माजी सैनिक कल्याण राज्यमंत्री, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई-४०००३२.

**दूरध्वनी** : (निवास) ०२३१-२६५३२९०.

(कार्यालय) ०२३१-२६५३२८९.

**भ्रमणध्वनी** : ९८२३०१२९०५, ९८२१९९९९८८.

**ई-मेल** : satejdpatil@gmail.com.

❑❑❑



## पोटे-पाटील, श्री. प्रविण रामचंद्र

**जन्म** : ६ नोव्हेंबर, १९६८.

**जन्म ठिकाण** : अमरावती.

**शिक्षण** : बी.कॉम.

**ज्ञात भाषा** : मराठी व हिंदी.

**वैवाहिक माहिती** : विवाहित, पत्नी श्रीमती अनुराधा.

**अपत्ये** : एकूण-२ (एक मुलगा व एक मुलगी).

**व्यवसाय** : बांधकाम व्यावसायिक.

**पक्ष** : भारतीय जनता पक्ष.

**मतदारसंघ** : अमरावती स्थानिक प्राधिकारी संस्था.

**इतर माहिती** : अध्यक्ष, पी.आर. पोटे एज्यूकेशन ॲन्ड वेलफेअर ट्रस्ट, अमरावती; अध्यक्ष, एस.पी.चॅरिटेबल ट्रस्ट अमरावती; अध्यक्ष, मराठा शिक्षण संस्था, अमरावती; सदस्य अच्युत महाराज हार्ट हॉस्पिटल अमरावती; संचालक, यवतमाळ अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक; मध्यमवर्गीय लोकांचे घराचे स्वप्न पूर्ण होण्यासाठी अमरावती येथे टाऊनशिप उभारून एक हजार घरे कमी किंमतीत उपलब्ध करून दिलीत. २००४-२००५ मध्ये ५०० जोडप्यांचा, २००५-२००६ मध्ये १५०० व २००६-२००७ मध्ये २०२७ जोडप्यांचा सामूहिक विवाह सोहळा आयोजित केला; किल्लारी

भूकंप, बिहार मधील पुर आपत्तीमधील लोकांना सर्वोतोपरी मदत; अभियांत्रिकी, व्यवस्थापन व तांत्रिकी पदवीधारकांना रोजगाराची संधी उपलब्ध होण्यासाठी विदर्भ स्तरावर देशातील १०० कंपन्यांना बोलावून सतत आठ वर्षे रोजगार मेळाव्याचे आयोजन; विकसित राष्ट्रांमधील अभियांत्रिकी व इतर क्षेत्रांमध्ये झालेली क्रांती आपल्या महाविद्यालयातील मुलांना अभ्यासण्याच्या दृष्टीने १५० गुणवत्ताप्राप्त विद्यार्थी व विद्यार्थीनीना दरवर्षी स्वखर्चाने विदेशात पाठविण्याचा उपक्रम हाती घेतला; मंदिरे, समाजमंदिरे तसेच मस्जिद बांधकामांसाठी अर्थसहाय्य; रक्तदान शिबीरे, आरोग्य शिबीरांचे आयोजन; गरिब व गरजू विद्यार्थ्यांना दत्तक घेऊन मोफत शिक्षण, आतापर्यंत २५० विद्यार्थ्यांना मोफत शिक्षण दिले आहे. अमरावती येथील कॅन्सर हॉस्पिटलच्या स्थापनेत योगदान; अध्यक्ष, पी.आर.पाटील पोटे ग्रुप ऑफ एज्युकेशन संस्था; या संस्थेमार्फत पी.आर. पाटील अभियांत्रिकी व तांत्रिकी महाविद्यालय, अमरावती; पी.आर.पोटे-पाटील एज्युकेशन अँड वेल्फेअर ट्रस्ट, अभियांत्रिकी व व्यवस्थापन महाविद्यालय, अमरावती; पी.आर.पोटे-पाटील इंजिनिअरिंग अँड रिसर्च कॉलेज, अमरावती, पी.आर.पाटील कॉलेज ऑफ आर्किटेक्चर, एस.पी. महाविद्यालय, एस.पी. बी.एड, महाविद्यालय, एस.पी. पब्लिक स्कुल, अमरावती; पी.आर.पाटील तंत्रनिकेतन, तळेगाव, ता.आर्वी, जि.वर्धा; पी.आर. पाटील कॉलेज ऑफ फार्मसी, तळेगाव, कॉलेज ऑफ फार्मसी, अमरावती, पी.आर.पोटे-पाटील ॲग्रीकल्चर कॉलेज तसेच पी.आर. पाटील व्यवस्थापन महाविद्यालय सुरू केले; अमरावती येथे टेक्सटाईल्स पार्क उभारण्यात पुढाकार; स्वर्गीय सुर्यकांतादेवी पोटे ट्रस्टच्या माध्यमातून शेतकऱ्यांना गीर जातीच्या गाईंचे वाटप; अमरावती जिल्ह्यात रेशिम उद्योगाला चालना देण्यासाठी प्रयत्नरत; २०१२-२०१८ सदस्य, महाराष्ट्र विधानपरिषद, जून २०१८ मध्ये महाराष्ट्र विधानपरिषदेवर फेरनिवड; डिसेंबर २०१४ ते जून, २०१९ उद्योग आणि खनिकर्म, पर्यावरण, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) खात्याचे राज्यमंत्री. अमरावती जिल्ह्याचे पालकमंत्री.

**परदेश प्रवास** : दुबई, सिंगापूर व मलेशिया इत्यादी देशांचा दौरा.

**छंद** : वाचन व बागकाम.

**पत्ता** : (१) १०१, "श्री.प्रसाद" राठी नगर, व्ही.एम.व्ही. रोड, अमरावती.

**दूरध्वनी** : (निवास) (०७२१) २५५२३८७.

(कार्यालय) (०७२१) २६६४९७३.

(२) राठीनगर, तहसील अमरावती, ता.जिल्हा-अमरावती.

पिन कोड-४४४६०३.

(३) जनसंपर्क कार्यालय, इर्विन चौक, कॅम्प रोड, अमरावती.

**भ्रमणध्वनी** : ९३७०१५२२०८, ९५५२५१२५००.

**फॅक्स** : (०७२१) २५३०३४१..

**ई-मेल** : potepravin@rediffmail.com.

ppotepatil301@gmail.com

❑❑❑



## पोतनीस, श्री. विलास विनायक

**जन्म** : ११ सप्टेंबर, १९४९.

**जन्म ठिकाण** : कोल्हापूर.

**शिक्षण** : एम.ए.

**ज्ञात भाषा** : मराठी, हिंदी व इंग्रजी.

**वैवाहिक माहिती** : विवाहित, पत्नी श्रीमती जयश्री.

**अपत्ये** : एकूण-२ (एक मुलगा व एक मुलगी).

**व्यवसाय** : नोकरी. (सेवानिवृत्त)

**पक्ष** : शिवसेना.

**मतदारसंघ** : मुंबई विभाग पदवीधर.

**इतर माहिती** : रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया मध्ये नोकरी; सन २००८-२०१८ अध्यक्ष, विद्या विकास सभा हायस्कुल, बोरीवली, मुंबई; २००१ पासून विश्वस्त, प्रबोधन कला मंच (सांस्कृतिक संस्था) मुंबई; सन १९९७-२००२ संचालक, भवानी को.ऑप.बँक, मुंबई; १९९८ पासून अध्यक्ष, रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया एम्प्लॉईज असोसिएशन, मुंबई; १९९६-२००५ संस्थापक-अध्यक्ष, मंडपेश्वर को.ऑप.क्रेडिट सोसायटी, मुंबई; २००६ पासून विश्वस्त, गर्जतो मराठी; १९८३-१९९७ शाखाप्रमुख, १९९७-२०१७ उप विभागप्रमुख, २०१७-२०१८ प्रभारी विभाग प्रमुख, २०१८

पासून विभागप्रमुख, शिवसेना; १९८३-२००४ चिटणीस, २००४ पासून उपाध्यक्ष, स्थानिय लोकाधिकार समिती महासंघ, मुंबई; जुलै २०१८ मध्ये महाराष्ट्र विधानपरिषदेवर निर्वाचित.

**परदेश प्रवास** : जपान व अमेरिका देशांचा दौरा.

**छंद** : वाचन व पर्यटन.

**पत्ता** : (१) १००२, आर.बी.आय. सहयोग को-ऑप. हौ.सोसायटी, एक्सर रोड, बोरिवली (पश्चिम), मुंबई-४०००९१.

**दूरध्वनी** : (निवास) (०२२) २८९५२८९९.
(कार्यालय) (०२२) २८९२६३९६.

**भ्रमणध्वनी** : ९८६९०२१८२०.

**ई-मेल** : vilaspotnis99@gmail.com

❑❑❑



## फाटक, श्री. रविंद्र सदानंद

**जन्म** : १५ ऑगस्ट, १९६६.

**जन्म ठिकाण** : मु.पो. मिठबाव, ता. देवगड, जि. सिंधुदूर्ग.

**शिक्षण** : एस.वाय.बी.ए.

**ज्ञात भाषा** : मराठी, हिंदी व इंग्रजी.

**वैवाहिक माहिती** : विवाहित, पत्नी श्रीमती जयश्री.

**अपत्ये** : एकूण-२ (दोन मुलगे).

**व्यवसाय** : उद्योग.

**पक्ष** : शिवसेना.

**मतदारसंघ** : ठाणे तथा पालघर स्थानिक प्राधिकारी संस्था.

**इतर माहिती** : गेल्या २५ वर्षापासून ठाणे शहरासह ठाणे जिल्ह्यातील विविध विकासकामात व उपक्रमांत सक्रिय सहभाग; ठाणे व पालघर जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासाकरीता सतत प्रयत्नरत; सन १९९७ पासून पाच वेळा नगरसेवक, तीन वेळा स्थायी समितीचे सभापती, ठाणे महानगरपालिका; ठाणे जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासासाठी प्रयत्नरत; ठाणे शहरातील महत्वाचे स्कायवॉक होण्यासाठी विशेष प्रयत्न; आर्थिक दुर्बल घटकातील व्यक्तींना मदत; गरीब, गरजू रूग्णांना मदत; विद्यार्थ्यांना शालोपयोगी वस्तूंचे वाटप; ठाणे जिल्ह्यात क्रिडा, सांस्कृतिक व धार्मिक उत्सवांचे

आयोजन; संकल्प प्रतिष्ठानच्या माध्यमातून ठाणे शहरात दहीहंडी, गणेशोत्सव, नवरात्रोत्सवाचे आयोजन; सामाजिक कार्य व विकासात्मक कार्यात दिलेल्या योगदानाबद्दल "उत्कृष्ट नगरसेवक" पुरस्काराने सन्मानित; जून २०१६ मध्ये महाराष्ट्र विधानपरिषदेवर निर्वाचित.

**परदेश प्रवास** : इंग्लंड, युरोप, कॅनडा, जपान, सिंगापूर, अमेरिका व आखाती देश इत्यादी देशांचा दौरा.

**छंद** : वाचन, धार्मिक उत्सवात व सामाजिक उपक्रमात सहभाग, प्रवास करणे.

**पत्ता** : (१) 'माया व्हीला' बंगला, मोहन खोपेकर रोड, रहेजा गार्डन, ठाणे (प.) ४०० ६०४.

(२) साई चेंबर्स, मित्तल पार्क, रघुनाथ नगर, वागळे इस्टेट, ठाणे (प.)-४०० ६०४.

**दूरध्वनी** : (०२२) २५८०२२०८, २५८०२२०९.

**भ्रमणध्वनी** : ९८६७००६८०३; ९९३००९९९९, ९८१९०८९९९९.

**ई-मेल** : info@ravindraphatak.com.

**संकेतस्थळ** : www.ravindraphatak.com.

❑❑❑



## फुके, डॉ. परिणय रमेश

**जन्म** : ५ जानेवारी, १९८१.

**जन्म ठिकाण** : नागपूर.

**शिक्षण** : एम.बी.ए., पीएच.डी.

**ज्ञात भाषा** : मराठी, हिंदी व इंग्रजी.

**वैवाहिक माहिती** : विवाहित, पत्नी डॉ. परिणीता.

**अपत्ये** : एकूण-२ (एक मुलगा व एक मुलगी).

**व्यवसाय** : शेती.

**पक्ष** : भारतीय जनता पक्ष.

**मतदारसंघ** : भंडारा-गोंदिया स्थानिक प्राधिकारी संस्था.

**इतर माहिती** : २००७-२०१७ नगरसेवक, नागपूर महानगरपालिका; २०१६ पासून नागपूर शहर भारतीय जनता पक्षाचे उपाध्यक्ष; डिसेंबर २०१६ मध्ये महाराष्ट्र विधानपरिषदेवर निर्वाचित. १६ जून, २०१९ ते ९ नोव्हेबर, २०१९ सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) वने, आदिवासी विकास खात्यांचे राज्यमंत्री.

**परदेश प्रवास** : मॉरिशस, जर्मनी व युरोप.

**छंद** : वाचन, क्रिडा व सामाजिक कार्य.

**पत्ता** : १३, "समीर", फुके पाटील मार्ग, अंबाझरी हिलटॉप, राम नगर, नागपूर.

**दूरध्वनी** : (कार्यालय) (०७१२) ६५५५०३९.

**भ्रमणध्वनी** : ९९२३७९८२१०.

**ई-मेल** : parinayfuke@gmail.com.

❑❑❑



## बाजोरिया, श्री. विप्लव गोपिकिशन

**जन्म** : १५ मार्च, १९८६

**जन्म ठिकाण** : अकोला.

**शिक्षण** : बी.कॉम., एलएल.बी.

**ज्ञात भाषा** : मराठी, हिंदी व इंग्रजी.

**वैवाहिक माहिती** : विवाहित, पत्नी श्रीमती राशी.

**अपत्ये** : एकूण-१ (एक मुलगी).

**व्यवसाय** : व्यापार.

**पक्ष** : शिवसेना.

**मतदारसंघ** : परभणी-हिंगोली स्थानिक प्राधिकारी संस्था.

**इतर माहिती** : संचालक, दि अकोला जनता कमर्शियल को.ऑप.बँक.लि; जून २०१८ मध्ये महाराष्ट्र विधानपरिषदेवर निर्वाचित.

**परदेश प्रवास** : युरोप, मॉरिशस व सिंगापूर इत्यादी देशांचा दौरा.

**छंद** : बॅडमिंटन व ड्रायव्हिंग.

**पत्ता** : (१) बाजोरिया हाऊस, मुर्तीजापूर रोड, जुन्या आर.टी.ओ. कार्यालयाजवळ, अकोला-४४४००१

(२) बाजोरिया चेंबर, पहिला मजला, गांधी रोड, अकोला-४४४ ००१

**दुरध्वनी** : (निवास) (०७२४) २४३०७५७.

**भ्रमणध्वनी** : ९९२३३६०५५५.

**ई-मेल** : viploveb@gmail.com.

❑❑❑



## बावनकुळे, श्री. चंद्रशेखर कृष्णराव

**जन्म** : १३ जानेवारी, १९६९.

**जन्म ठिकाण** : खसाळा, तालुका कामठी, जिल्हा नागपूर.

**शिक्षण** : बी.एस्सी.

**ज्ञात भाषा** : मराठी, हिंदी व इंग्रजी.

**वैवाहिक माहिती** : विवाहित, पत्नी श्रीमती ज्योती.

**अपत्ये** : एकूण २ (एक मुलगा व एक मुलगी).

**व्यवसाय** : शेती.

**पक्ष** : भारतीय जनता पक्ष.

**मतदारसंघ** : नागपूर स्थानिक प्राधिकारी संस्था.

**इतर माहिती** : अध्यक्ष, श्रीक्षेत्र महालक्ष्मी जगदंबा संस्थान, कोराडी; शैक्षणिक संस्थाना मदत; कोराडी पर्यटनक्षेत्र म्हणून विकसित करण्यासाठी विशेष प्रयत्न; अनेक सामाजिक मेळाव्यात सहभाग; अध्यक्ष, जगदंबा लोकसेवा प्रतिष्ठान कोराडी; अध्यक्ष, महालक्ष्मी जगदंबा बिगर शेती सहकारी संस्था नांदाकोराडी; १९८८-९५ छत्रपती सेना व विद्यार्थी संघटनेत कार्य; १९९०-९५ अखिल महाराष्ट्र प्रकल्पग्रस्त बेरोजगार समितीचे कार्य; प्रकल्पग्रस्तांना न्याय मिळवून देण्याकरीता आंदोलनात सहभाग व अटक; कोराडी वीज प्रकल्पग्रस्तांच्या प्रश्नांसाठी लढा; १९९५-९९

जिल्हा उपाध्यक्ष, नागपूर जिल्हा युवा भारतीय जनता पक्ष; १९९९-२००१ जिल्हा सचिव, भारतीय जनता पक्ष, नागपूर; २००२-२००४ संघटन प्रमुख, कामठी भारतीय जनता पक्ष ; २०१० -२०११ नागपूर जिल्हा अध्यक्ष, भाजप; २०१४ महाराष्ट्र प्रदेश सचिव, भारतीय जनता पक्ष; १९९७-२००२ व २००२-२००४ सदस्य, जिल्हा परिषद, १९९७-२००२ सदस्य, आरोग्य व बांधकाम समिती; २००२-२००४ गटनेता भाजप व सेना, जिल्हा परिषद, नागपूर; २००४-२००९, २००९-२०१४ व २०१४-२०१९ सदस्य, महाराष्ट्र विधानसभा, विधिमंडळाच्या पंचायत राज, सार्वजनिक उपक्रम व ग्रंथालय समितीचे सदस्य; डिसेंबर, २०१४ ते २०१९ पर्यंत ऊर्जा, नवीन व नवीकरण ऊर्जा खात्याचे मंत्री व नागपूर जिल्ह्याचे पालक मंत्री. जानेवारी २०२२ मध्ये महाराष्ट्र विधानपरिषदेवर निवड.

**परदेश प्रवास** : युके व दुबई इत्यादी देशांचा दौरा.

**छंद** : वाचन व सामाजिक कार्य.

**पत्ता** : प्लॉट नं. २८-अ, श्रीजगदंबा, नवीन कोराडी, पोस्ट-न्यू कोराडी, तालुका कामठी, जिल्हा नागपूर- ४४ ११११.

**भ्रमणध्वनी** : ९०४९४०४०४०/९०४९४४४४४.

**ई-मेल** : chandrashekharbawankule@gmail.com

❑❑❑



## भोसले, श्री. अनिल शिवाजीराव

**जन्म** : ११ नोव्हेंबर, १९६४.

**जन्म ठिकाण** : पुणे.

**शिक्षण** : एस.वाय.बी.कॉम.

**ज्ञात भाषा** : मराठी, हिंदी व इंग्रजी.

**वैवाहिक माहिती** : विवाहित, पत्नी श्रीमती रेश्मा.

**अपत्ये** : एकूण-३ (एक मुलगा व दोन मुली).

**व्यवसाय** : शेती व सामाजिक कार्य.

**पक्ष** : राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष.

**मतदारसंघ** : पुणे स्थानिक प्राधिकारी संस्था.

**इतर माहिती** : १९९२-२०१० सदस्य, २००७-२०१० सभागृह नेता, २००६ स्थायी समिती सदस्य, पुणे महानगरपालिका; पुणे शहराच्या पाणी प्रश्नासाठी सदस्य पदाचा राजीनामा, पोट निवडणूकीमध्ये फेरनिवड; १९९४-२००५ व २०१० पासून अध्यक्ष; २००५-२०१० संचालक, शिवाजीराव भोसले सहकारी बँक लि. पुणे; २००० पासून अध्यक्ष, पुणे जिल्हा नागरी सहकारी पतसंस्था फेडरेशन; २००२ पासून संचालक व २००६-२००७ अध्यक्ष, पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक; १९९८ पासून संचालक व २००४-२००९ अध्यक्ष, पुणे जिल्हा नागरी सहकारी बँक्स असोसिएशन; २००४-२००५ व २००८ पासून संचालक, दि महाराष्ट्र

स्टेट को. ऑप. बँक्स असोसिएशन, मुंबई; २००६-२०१० कार्याध्यक्ष, पुणे शहर राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष; गरजू व हुशार विद्यार्थ्यांना शैक्षणिक मदत; पुणे महानगरपालिकेतील उत्कृष्ट कामाबद्दल राजीव गांधी पुरस्काराने सन्मानित; २०१०-२०१६ सदस्य, महाराष्ट्र विधानपरिषद, डिसेंबर २०१६ मध्ये महाराष्ट्र विधानपरिषदेवर फेरनिवड.

**छंद** : वाचन व सामाजिक कार्य.

**पत्ता** : (१) २, 'शिवाई', भोसले नगर, गणेश खिंड रोड, पुणे-४११ ००७.
(२) संगीता स्मृती, ९४, नरवीर तानाजी वाडी, शिवाजीनगर, पुणे-४११ ००५.

**दूरध्वनी** : (कार्यालय) (०२०)-२५५३०५०१, २५५३०५०२.

**भ्रमणध्वनी** : ९८२२०४३२३२, ९६८९९३१०२१.

**ई-मेल** : info@anilbhosale.com

❑❑❑



## मिटकरी, श्री. अमोल रामकृष्ण

**जन्म** : २५ जून, १९८२.

**जन्म ठिकाण** : कुटासा, तालुका-अकोट, जिल्हा-अकोला.

**शिक्षण** : बी. ए.

**ज्ञात भाषा** : मराठी, हिंदी, इंग्रजी व उर्दू.

**वैवाहिक माहिती** : विवाहित, पत्नी श्रीमती कविता.

**अपत्ये** : एकूण-२, (एक मुलगा व एक मुलगी).

**व्यवसाय** : शेती.

**पक्ष** : राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष.

**मतदारसंघ** : महाराष्ट्र विधानसभा सदस्यांद्वारा निर्वाचित.

**इतर माहिती** : सरचिटणीस, महाराष्ट्र प्रदेश राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष, समन्वयक, राष्ट्रवादी युवक काँग्रेस; कार्यकारी सदस्य, डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला; मागील पंधरा वर्षापासून संपूर्ण महाराष्ट्र व राज्याबाहेर विविध विषयांवर प्रबोधनपर व्याख्याने, शिव-शाहू-फुले-डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा प्रचार व प्रसार कार्य; 'सावित्रीबाई फुले कार्यगौरव' व 'भिमरत्न' पुरस्काराने सन्मानित, 'मित्ररत्न राज्य पुरस्कार' तसेच राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने 'अजित पर्व' पुरस्काराने सन्मानीत; विधानमंडळाच्या अनेक समित्यांवर सदस्य म्हणून कार्यरत; मे २०२० मध्ये महाराष्ट्र विधानपरिषदेवर निर्वाचित.

**छंद** : प्रवास, संगीत, गायन, संत साहित्याचे वाचन व समाजसेवा.

**पत्ता** : (१) निवास : बाबा निवास, महसुल कॉलनी, खडकी, अकोला-४४४००४.

(२) कार्यालय : श्रीरामद्वार, सांगलीवाला शोरूमच्या बाजुने, खुले नाट्यगृह, अकोला.

**भ्रमणध्वनी** : ९८८१८२८३८६.

(निवास) ०७२४-२४२२२६६.

**ई-मेल** : amolmitkari50@gmail.com

❑❑❑



## मिर्झा, डॉ. वजाहत मिर्झा अथर

**जन्म** : २१ सप्टेंबर, १९७५.

**जन्म ठिकाण** : पुसद, जिल्हा यवतमाळ.

**शिक्षण** : एम.बी.बी.एस.

**ज्ञात भाषा** : मराठी, हिंदी, इंग्रजी व ऊर्दू.

**वैवाहिक माहिती** : विवाहित, पत्नी श्रीमती मोहम्मदी बेगम.

**अपत्ये** : एकूण-२ (दोन मुली).

**व्यवसाय** : शेती व उद्योग.

**पक्ष** : भारतीय राष्ट्रीय काँग्रेस.

**मतदारसंघ** : महाराष्ट्र विधानसभा सदस्यांद्वारा निर्वाचित.

**इतर माहिती** : २००० पासून अध्यक्ष, मागासवर्गीय एज्युकेशन सोसायटी, पुसद या संस्थेद्वारे यवतमाळ जिल्ह्यातील ग्रामीण आदिवासी भागातील विद्यार्थ्यांसाठी २८ ठिकाणी शाळा, महाविद्यालये सुरू केली; २००९ पासून अध्यक्ष, अलहाज अतहर मिर्झा मेमोरियल ट्रस्ट, पुसद; सदस्य, अखिल भारतीय हस्तकला बोर्ड, नवी दिल्ली; ४ वर्षे जनरल सेक्रेटरी व ५ वर्षे कोषाध्यक्ष, महाराष्ट्र प्रदेश युथ काँग्रेस कमिटी; ८ वर्षे सचिव, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटी; अध्यक्ष, यवतमाळ जिल्हा काँग्रेस कमिटी; सदस्य, अखिल भारतीय काँग्रेस कमिटी; शैक्षणिक आणि सामाजिक

क्षेत्रातील कार्याबद्दल सन २०११ मध्ये नवी दिल्ली येथील ह्युमन वेलफेअर फाऊंडेशन या संस्थेचा मौलाना आझाद लाईफ टाईम ॲवॉर्ड; जुलै २०१८ मध्ये महाराष्ट्र विधानपरिषदेवर निर्वाचित.

**परदेश प्रवास** : संयुक्त अरब अमिराती, सौदी अरेबिया, हाँगकाँग, थायलंड, कझाकीस्तान, मकाऊ व श्रीलंका इत्यादी देशांचा अभ्यास दौरा.

**छंद** : वाचन व विविध क्रिडा स्पर्धा पाहणे.

**पत्ता** : ५, माणिक टॉकिज परिसर, माळीपुरा परिसर, मु. पो. ता. पुसद, जिल्हा यवतमाळ- ४४५२०४.

**दूरध्वनी** : (निवास) (०७२३३) २४६१४५.

**भ्रमणध्वनी** : ९८२२२२३७९६, ९७६५०३७७८६.

**ई-मेल** : dr.wajahatmirza@rediffmail.com.
dr.wajahatmirza30@gmail.com.

❑❑❑



## मेटे, श्री. विनायक तुकाराम

**जन्म** : २५ ऑगस्ट, १९६३

**जन्म ठिकाण** : राजेगाव, ता.केज, जि.बीड.

**शिक्षण** : बी.ए.

**ज्ञात भाषा** : मराठी, हिंदी व इंग्रजी.

**वैवाहिक माहिती** : विवाहित, पत्नी श्रीमती डॉ. ज्योती.

**अपत्ये** : एकूण-२ (एक मुलगा व एक मुलगी).

**व्यवसाय** : शेती.

**पक्ष** : भारतीय जनता पक्ष.

**मतदारसंघ** : महाराष्ट्र विधानसभा सदस्यांद्वारा निर्वाचित.

**इतर माहिती** : अध्यक्ष, उत्रेश्वर शिक्षण प्रसारक संस्था, तुकाराम रूरल अँड ह्युमन डेव्हलपमेंट चॅरिटेबल ट्रस्ट व मराठवाडा लोकविकास मंच; संस्थापक, भारतीय लोकविकास संस्था, लोकविकास सहकारी बँक, उत्रेश्वर नागरी सहकारी पतसंस्था, मजूर संस्था, सेवा सहकारी सोसायटी व दूध संस्था; १९८० पासून अखिल भारतीय मराठा महासंघाच्या कार्यास सुरूवात; १९९८ संस्थापक-अध्यक्ष, नव महाराष्ट्र विकास पार्टी; २००० शिवसंग्राम संघटना स्थापन केली; १९९९ प्रदेश उपाध्यक्ष, राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष; २०१४ पासून भारतीय जनता पक्षाचे कार्यः शेतकरी,

शेतमजुरांचे प्रश्न, शेतकऱ्यांची कर्जमुक्ती, शेतकऱ्यांना कमी व्याज दरात कर्ज, मराठी भाषा, छत्रपती शिवाजी महाराजांचे अरबी समुद्रात स्मारक व्हावे यासाठी विशेष प्रयत्न; अध्यक्ष, छत्रपती शिवाजी महाराज स्मारक समिती; मराठा समाजाच्या आरक्षणाबाबतच्या लढ्याचे नेतृत्व; स्त्रीभ्रुण हत्येसंदर्भात बीड जिल्ह्यातील संपूर्ण शिरूर तालुका दत्तक घेऊन त्या ठिकाणी अजित बालिका सुरक्षा योजना सुरू करून देशाला पहिला पायलट प्रोजेक्ट स्वखर्चाने करून दिला; १९९६-२०००, २०००-२००६, २०१०-२०१४ व २०१५-१६ सदस्य, महाराष्ट्र विधानपरिषद; जुलै २०१६ मध्ये महाराष्ट्र विधानपरिषदेवर फेरनिवड.

**परदेश प्रवास** : अमेरिका, चीन, युरोप, व्हिएतनाम, इंडोनेशिया, टांझानिया, नेपाळ, आखाती देश, श्रीलंका इत्यादी देशांचा दौरा.

**छंद** : वाचन, प्रवास, सामाजिक कार्य व शेती.

**पत्ता** : (१) मु. राजेगाव, पो.नाव्होली, ता. केज, जि.बीड.

(२) तुकाई निवास, तिरूपती नगर, बार्शी रोड, बीड.

(३) सी/७०३, व्हिनस बिल्डिंग, भक्ती पार्क, वडाळा (पूर्व), मुंबई-४०० ०३७.

भ्रमणध्वनी : ९८२०२१६४६४.

**ई-मेल** : metevinayak@gmail.com.

❑❑❑



## मोहिते-पाटील, श्री. रणजितसिंह विजयसिंह

| | |
|---|---|
| **जन्म** | : ५ मे, १९७२. |
| **जन्म ठिकाण** | : कोल्हापूर, जिल्हा-कोल्हापूर. |
| **शिक्षण** | : बी.ए. (इंग्रजी). |
| **ज्ञात भाषा** | : मराठी, हिंदी व इंग्रजी. |
| **वैवाहिक माहिती** | : विवाहित, पत्नी श्रीमती सत्यप्रभादेवी. |
| **अपत्ये** | : एकूण १ (एक मुलगा). |
| **व्यवसाय** | : शेती. |
| **पक्ष** | : भारतीय जनता पक्ष. |
| **मतदारसंघ** | : महाराष्ट्र विधानसभा सदस्यांद्वारा निर्वाचित. |
| **इतर माहिती** | : आजोबा सहकार महर्षी कै. शंकरराव नारायणराव मोहिते-पाटील तसेच वडिल श्री. विजयसिंह शंकरराव मोहिते –पाटील यांचेकडून राजकीय वारसा फेब्रुवारी २००२ पासून संचालक व २००५ पासून चेअरमन, सोलापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक; या काळात ८९३३ विविध कार्यकारी सोसायटयांना बँकेकडून आर्थिक मदत, दुध संस्था, कुक्कटपालन, फलोत्पादन, रेशिम उद्योग यांसाठी अल्प व्याज दराने पतपुरवठा, नागरिकांना गृह कर्ज योजनेचा लाभ, शेतकऱ्यांना टँकर घेण्यासाठी सुलभ हफ्याने कर्ज योजना, शेतकऱ्यांसाठी आरोग्य विमा |

योजना, बँकेमार्फत ‘केशरमाती’ हे राष्ट्रीय पातळीवरील कृषी विषयक प्रदर्शन पंढरपूर येथे यशस्वीरित्या आयोजित करण्यात पुढाकार; २००५-२०१८ चेअरमन व संचालक, शिवामृत दुध उत्पादक सहकारी संघ लि., विजयनगर अकलूज; चेअरमन, दि ग्रीन फिंगर्स स्कूल, अकलूज, ग्रामीण भागातील शेतकऱ्यांच्या मुलांना दर्जेदार व स्पर्धात्मकदृष्ट्या उपयुक्त शिक्षण मिळावे याकरीता १९७५ साली या संस्थेची स्थापना सहकारमहर्षी कै. शंकरराव मोहिते-पाटील यांनी केली. सोलापूर जिल्हयातील मुलांसाठी व मुलींसाठी ही पहिलीच निवासी शाळा आहे; सन २०१८ पासून चेअरमन, श्री. शंकर सहकारी साखर कारखाना लि., सदाशिव नगर; २००८ पासून अध्यक्ष, ऑल इंडिया बॉडी बिल्डिंग अँन्ड फिटनेस फेडरेशन, या फेडरेशनमार्फत मुंबई येथे जागतिक स्तरावरील मिस्टर युनिवर्स व मिस्टर वर्ल्ड  या बॉडी बिल्डिंग स्पर्धाचे आयोजन तसेच अकलूज येथे राज्यस्तरीय बॉडी बिल्डिंगचे आयोजन;  कार्यकारी अध्यक्ष, द इथेनॉल मॅन्यूफॅक्चर असोसिएशन ऑफ इंडिया हि संस्था देशातील इथेनॉल उत्पादकांच्या समस्या सोडविण्यासाठी प्रयत्नशील; चेअरमन, सोलापूर जिल्हा क्रिकेट असोसिएशन या संस्थाच्या माध्यमातून ग्रामीण भागातील उत्कृष्ट खेळांडूचा शोध घेऊन त्यांना प्रशिक्षण व राज्य पातळीवर खेळण्यासाठी सर्वोतोपरी मदत; विश्वस्त, शिवरत्न शिक्षणसंस्था व श्री. शिवपार्वती सार्वजनिक विकास ट्रस्ट, अकलूज; संस्थापक, महर्षि जिमखाना व स्पोटर्स असोसिएशन या संस्थेमार्फत ग्रामीण भागातील युवकांना कला व क्रिडा विकासासाठी उपयुक्त साहित्य उपलब्ध करून दिले जाते. या संस्थेमार्फत ग्रामीण भागात विविध प्रकारच्या क्रिडास्पर्धांचे आयोजन; संचालक, शिव शंकर केंद्रीय ग्राहक सहकारी संस्था;  सन २०१६ पासून संचालक, सहकार महर्षी शंकरराव मोहिते-पाटील सहकारी साखर कारखाना लि. शंकर नगर; सदस्य, प्रताप क्रिडा मंडळ या मंडळामार्फत खो-खो, कबड्डी, आट्यापाट्या या खेळांना प्रोत्साहन, महिला व विद्यार्थी यांचेसाठी गायन, वादन, लोककला, नाटक इ. स्पर्धाचे आयोजन. अध्यक्ष, विजय प्रताप युवामंच, सोलापूर या मंचामार्फत महात्मा गांधी, पंडित नेहरू, इंदिरा गांधी, राजीव गांधी व सहकारमहर्षी यांच्या विचारांचा प्रचार व प्रसार करून देण्याचे कार्य केले.;  संस्थापक अध्यक्ष, विजय फाऊंडेशन,

पुणे या फाऊंडेशनमार्फत आंतर महाविद्यालयीन 'युथ इन सिंग' या स्पर्धेचे आयोजन; सदस्य, ग्रामपंचायत अकलूज; माजी अध्यक्ष, सोलापूर जिल्हा युवक काँग्रेस (आय); १९९९ साली महाराष्ट्र प्रदेश राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे पहिले अध्यक्ष; २००३-२००४ मध्ये लोकसभा निवडणूकीसाठी राष्ट्रवादीकाँग्रेस पक्षाला यश मिळवून देण्यासाठी राज्यभर झंझावती प्रचाराद्वारे सुमारे ८५४६ कि.मी. पेक्षा जास्त प्रवास व ११० प्रचार सभांचे आयोजन. मार्च २०१९ पासून भारतीय जनता पक्षाचे कार्य; २००४-२००९ सदस्य, महाराष्ट्र विधानपरिषद; २००९-२०१२ सदस्य, राज्यसभा, मे, २०२० मध्ये महाराष्ट्र विधानपरिषदेवर फेरनिवड.

**परदेश प्रवास** : सन २००४ मध्ये अमेरिकेच्या स्वातंत्र्यदिनी सोहळ्याच्या निमित्ताने अमेरिका, भारत व पाकिस्तान देशातील युवक राज्यकर्ते यांच्या मेळाव्यात सहभागी होवून राजकारण, निवडणूक कार्यक्रम व लोकशाही इ. विषयांवर विचार विनियम, सन २००५ मध्ये ब्राझील येथे झालेल्या जागतिक साखर व इथेनॉल परिषदेत सहभाग.

**छंद** : फोटोग्राफी व पर्यटन.

**पत्ता** : शिवरत्न बंगला, मु.पो.- शंकरनगर, तालुका माळशिरस, जिल्हा सोलापूर ४१३ ११८.

**भ्रमणध्वनी** : ९८२१०५६७७७

**ई-मेल** : ranjitsinh05@gmail.com.

❑❑❑



## राजूरकर, श्री. अमरनाथ अनंतराव

| | |
|---|---|
| **जन्म** | : २४ डिसेंबर, १९६६. |
| **जन्म ठिकाण** | : तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद. |
| **शिक्षण** | : बी. कॉम. |
| **ज्ञात भाषा** | : मराठी, हिंदी व इंग्रजी. |
| **वैवाहिक माहिती** | : विवाहित, पत्नी श्रीमती मृणाल. |
| **अपत्ये** | : एकूण-२ (एक मुलगा व एक मुलगी). |
| **व्यवसाय** | : समाजसेवा. |
| **पक्ष** | : भारतीय राष्ट्रीय काँग्रेस. |
| **मतदारसंघ** | : नांदेड स्थानिक प्राधिकारी संस्था. |
| **इतर माहिती** | : जिल्हाध्यक्ष, एन.एस.यू.आय.; सरचिटणीस, प्रदेश युवक काँग्रेस; अध्यक्ष, नांदेड शहर युवक काँग्रेस; सचिव तसेच उपाध्यक्ष महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटी; २०१०-१६ सदस्य, महाराष्ट्र विधानपरिषद; डिसेंबर २०१६ मध्ये महाराष्ट्र विधानपरिषदेवर फेरनिवड, प्रतोद, विधीमंडळ काँग्रेस पक्ष; विधानमंडळाच्या अंदाज समिती, पंचायत राज समिती तसेच अनुसूचित जाती कल्याण समितीचे सदस्य म्हणून कार्य. |
| **परदेश प्रवास** | : मलेशिया, सिंगापूर, हाँगकाँग, दुबई, इटली, लंडन व ग्रीक या देशांचा अभ्यास दौरा. |

**छंद** : प्रवास करणे.

**पत्ता** : देवाशिष बंगला, घर नं. १.२.१८० शिवाजीनगर, नांदेड-४३१ ६०२.
**दूरध्वनी** : (निवास) ०२४६२-२३५७७४.
**भ्रमणध्वनी** : ९७६९४४१३२४, ९८८११५४०६९, ९३२४०१००६६.

❑❑❑



## राठोड, श्री. राजेश धोंडीरामजी

**जन्म** : २७ मे, १९७७.

**जन्म ठिकाण** : उमरखेडा, तालुका-मंठा, जिल्हा-जालना.

**शिक्षण** : एम.ए., एम.एड.

**ज्ञात भाषा** : मराठी, हिंदी व इंग्रजी.

**वैवाहिक माहिती** : विवाहित, पत्नी-श्रीमती सिंधू.

**अपत्ये** : एकूण-२ (दोन मुली)

**व्यवसाय** : शेती.

**पक्ष** : भारतीय राष्ट्रीय काँग्रेस.

**मतदारसंघ** : महाराष्ट्र विधानसभा सदस्यांद्वारा निर्वाचित.

**इतर माहिती** : २००२ ते २००७ प्राचार्य, हरीनाईक अध्यापक विद्यालय, मंठा; सहसचिव, जगदंबा शिक्षण प्रसारक मंडळ, मंठा; अध्यक्ष, बंजारा क्रीडा व शिक्षण मंडळ, औरंगाबाद; सचिव, सुधाकरराव नाईक शिक्षण प्रसारक मंडळ, उमरखेडा; राष्ट्रीय उपाध्यक्ष, ऑल इंडिया बंजारा सेवा संघ; राष्ट्रीय कार्यकारी अध्यक्ष, विमुक्त घुमंतु अर्ध्द धुमंतु महासभा ऑफ इंडिया; सचिव, रेणुका मागासवर्गीय दुध उत्पादक संस्था, उमरखेडा; अध्यक्ष, मंठा फार्मर प्रोड्युसर कंपनी प्रा. लिमिटेड; सन २०२१ पासून सिनेट सदस्य, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ; सन

२०२१ पासून सदस्य, महाराष्ट्र राज्य उच्च शिक्षण विकास आयोग; सन २०१७ पासून सचिव, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटी; २००७-२०१० सरचिटणीस, महाराष्ट्र प्रदेश युवक काँग्रेस कमिटी; १९९९-२००२ सरचिटणीस, महाराष्ट्र प्रदेश एन.एस.यु.आय., मुंबई; २००२ ते २००७ जिल्हाध्यक्ष, जालना जिल्हा एन.एस.यु.आय.; २००७-२०१७ सदस्य, २००९ ते २०१२ सभापती, जिल्हा परिषद, जालना. विधानमंडळाच्या अनेक समित्यांवर सदस्य म्हणून कार्य; मराठवाडा सेवा प्रतिष्ठान तर्फे 'मराठवाडा भूषण'पुरस्काराने सन्मानित; मे, २०२० मध्ये महाराष्ट्र विधानपरिषदेवर निर्वाचित.

**परदेश प्रवास** : संयुक्त अरब अमिराती, दुबई, थायलंड, हाँगकाँग, चीन व मकाओ.

**छंद** : प्रवास करणे, वाचन, संगीत व चित्रपट.

**पत्ता** : (१) नाईक नगर, उमरखेडा ता. मंठा जि. जालना. ४३१५०४.
(२) 'हरिकृपा', नाईक नगर, शिवाजी चौक, मंठा, ता. मंठा. जि. जालना. ४३१५०४.

**भ्रमणध्वनी** : ९४२२२१७०११, ९७६५५७७५५५.

**ई-मेल** : rajeshrathodnayak@yahoo.com.

❑❑❑



## रावते, श्री. दिवाकर नारायणराव

**जन्म** : २३ ऑक्टोबर, १९४४.

**जन्म ठिकाण** : मुंबई.

**शिक्षण** : एल.एस.जी.डी.

**ज्ञात भाषा** : मराठी, हिंदी व इंग्रजी.

**वैवाहिक माहिती** : विवाहित, पत्नी श्रीमती मनिषा.

**अपत्ये** : एकूण-२ (दोन मुलगे).

**व्यवसाय** : पूर्ण वेळ पक्षकार्य

**पक्ष** : शिवसेना.

**मतदारसंघ** : महाराष्ट्र विधानसभा सदस्यांद्वारा निर्वाचित.

**इतर माहिती** : १९८५-९२ सदस्य, मुंबई महानगरपालिका; तीन वर्षे उपाध्यक्ष, शहर स्थापत्य समिती, अध्यक्ष, स्थायी समिती, सभागृह नेता व एक वर्ष महापौर, महानगरपालिका, मुंबई; १९६६ पासून शिवसेनेचे कार्य, पक्षसंघटनेत मराठवाडा, पश्चिम विदर्भ व पश्चिम महाराष्ट्राचे शिवसेनेचे संपर्क नेते; शिवसेना पक्ष वाढीसाठी भरीव कार्य; आत्महत्याग्रस्त कापूस उत्पादक शेतकऱ्यांच्या प्रश्नांसाठी ५५६ कि.मी. सेवाग्राम ते शेगाव कापूस दिंडी व १२०० कि.मी. अनवाणी शेगाव ते परभणी (मराठवाडा) सांत्वन दिंडी तसेच तिवसा तुकडोजी महाराज मंदिर ते नागपूर पर्यंत 'देता

का जाता' कर्जमुक्ती दिंडी काढली; तसेच नापास विद्यार्थ्यांचे मनोबल उंचावण्यासाठी विविध उपक्रमांचे आयोजन; जनसामान्यांचे प्रश्न सोडविण्यासाठी सतत प्रयत्नशील; १९९८-२००४, २००४-२०१०, २०१०-२०१६ सदस्य, महाराष्ट्र विधानपरिषद; मे १९९८ ते फेब्रुवारी १९९९ परिवहन, रोजगार आणि स्वयंरोजगार व फेब्रुवारी १९९९ ते मे १९९९ सहकार, व्यापार आणि वाणिज्य खात्यांचे मंत्री; मे १९९९ ते ऑक्टोबर, १९९९ सहकार, व्यापार व वाणिज्य, पणन व वस्त्रोद्योग खात्याचे मंत्री; डिसेंबर २०१४ ते नोव्हेंबर, २०१९ परिवहन खात्याचे मंत्री; परभणी, नांदेड व उस्मानाबाद जिल्ह्याचे पालकमंत्री; जुलै २०१६ मध्ये महाराष्ट्र विधानपरिषदेवर फेरनिवड.

**परदेश प्रवास** : युरोप, इंग्लंड, अमेरिका, मलेशिया, सिंगापूर व नेपाळ इत्यादी देशांचा अभ्यास दौरा.

**छंद** : वाचन.

**पत्ता** : (१) १११/२७४ ब, "ज्ञानसागर", सि.के.बोले मार्ग, पोर्तुगीज-चर्चजवळ, दादर (पश्चिम), मुंबई-४०० ०२८.

**दूरध्वनी** : (कार्यालय) : २४३३३७६०

**भ्रमणध्वनी** : ९८२११४३५७६, ९४२१४५७४५७.

**ई-मेल** : diwakarnraote@gmail.com

❑❑❑



## लाड, श्री. अरूण गणपती

**जन्म** : २९ ऑक्टोबर, १९४७

**जन्म ठिकाण** : येलुर, तालुका-वाळवा, जिल्हा-सांगली.

**शिक्षण** : बी.एस्सी (कृषी).

**ज्ञात भाषा** : मराठी, हिंदी व इंग्रजी.

**वैवाहिक माहिती** : विवाहित, पत्नी श्रीमती प्रेमिला.

**अपत्ये** : एकूण-२ (एक मुलगा व एक मुलगी).

**व्यवसाय** : शेती व समाजकार्य.

**पक्ष** : राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष.

**मतदारसंघ** : पुणे विभाग पदवीधर.

**इतर माहिती** : सन २०११ पासून अध्यक्ष, गांधी एज्युकेशन सोसायटी, कुंडल; अध्यक्ष, क्रांती इंटरनॅशनल पब्लिक स्कुल तसेच क्रांतिसिंह नाना पाटील विद्यार्थी वसतिगृह; संस्थापक, क्रांतीअग्रणी जी.डी.बापू लाड मोफत स्पर्धा परिक्षा मार्गदर्शन केंद्र तसेच महिला तांत्रिक औद्योगिक संस्था; सन २०११ पासून चेअरमन, क्रांतीअग्रणी जी.डी.बापू लाड सहकारी साखर कारखाना; सत्येश्वर पाणी पुरवठा सहकारी संस्था, बसवेश्वर पाणी पुरवठा सहकारी संस्था; गणेशवाडी पाणी पुरवठा सहकारी संस्था; संस्थापक, क्रांती सहकारी दूध संघ. १९८१ पर्यंत शेतकरी कामगार पक्षाचे कार्य; सन

२००५ पर्यंत भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे कार्य; सन २००५ पासून सदस्य व सन २०२० पासून उपाध्यक्ष, महाराष्ट्र प्रदेश राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष. जागतिक तापमान वाढीची समस्या दूर करण्यासाठी वृक्षरोपण, संवर्धन व संरक्षण याबद्दल जनमानसात जागृती निर्माण केली. आजपर्यंत सत्तर हजार पेक्षा जास्त वृक्षांची लागवड व संवर्धन केले आहे. स्त्रीभृण हत्या विरोधी जनजागृती, वाचन संस्कृतीची जोपासना, मतदान हक्क जागृती, प्रबोधनपर व्याख्याने, व्यसनमुक्ती, अंधश्रद्धा निर्मूलन, हागणदारीमुक्त गाव, निर्मलग्राम, तंटामुक्त गाव यासाठी सतत प्रयत्नशील. पूरग्रस्त व दुष्काळग्रस्तांना मदत, आरोग्य शिबीरे व रक्तदान शिबीरांचे आयोजन. आर्थिक दुर्बल व परितक्त्या महिलांना मानाने जगता यावे यासाठी क्रांती गारमेंटची स्थापना व महिला कौशल्य विकास केंद्राची उभारणी. डिसेंबर, २०२० मध्ये महाराष्ट्र विधानपरिषदेवर निर्वाचित.

**परदेश प्रवास** : ब्राझील.

**छंद** : समाजकार्य, प्रबोधन, वाचन, शेती व खेळ.

**पत्ता** : (१) क्रांतिअग्रणी डॉ. जी.डी. बापू लाड सहकारी साखर कारखाना मर्या. कुंडल, ता. पलूस, जि. सांगली ४१६ ३०९.

(२) मु.पो. क्रांतीनगर, कुंडल, ता. पलूस, जि. सांगली-४१६३०९.

**भ्रमणध्वनी** : ९९६०८७११११.

**ई-मेल** : arunlad1947@gmail.com

❑❑❑



## लाड, श्री. प्रसाद मिनेश

**जन्म** : २८ एप्रिल, १९७१.

**जन्म ठिकाण** : मुंबई.

**शिक्षण** : एम.बी.ए.

**ज्ञात भाषा** : मराठी, हिंदी व इंग्रजी.

**वैवाहिक माहिती** : विवाहित, पत्नी श्रीमती नीता.

**अपत्ये** : एकूण-२ (एक मुलगा व एक मुलगी).

**व्यवसाय** : उद्योजक.

**पक्ष** : भारतीय जनता पक्ष.

**मतदारसंघ** : महाराष्ट्र विधानसभा सदस्यांद्वारा निर्वाचित.

**इतर माहिती** : चेअरमन, महालक्ष्मी-तिरूपती एज्युकेशन सोसायटी, पुणे; चेअरमन, हुतात्मा बाबु गेणु एज्युकेशन ट्रस्ट, अहमदनगर; चेअरमन, क्रिस्टल एम्प्लॉईज क्रेडिट सोसायटी; चेअरमन, 'मी मुंबई अभियान' संस्था; चेअरमन, क्रिस्टल को. ऑप. क्रेडिट सोसायटी; १९९९-२००७ सरचिटणीस, महाराष्ट्र प्रदेश युवक राष्ट्रवादी काँग्रेस; २००७-२००९ सरचिटणीस, महाराष्ट्र प्रदेश राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष; २००९-२०१२ अध्यक्ष, महिला विद्यार्थी व युवक सेल, राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष; २०१५ पासून संचालक, मुंबई जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक; सदस्य, मुंबई क्रिकेट असोसिएशन (मार्केटिंग कमिटी); अध्यक्ष, कोकण-मुंबई

एम्प्लॉईज क्रेडिट सोसायटी फेडरेशन; जून २०१२ ते डिसेंबर २०१४ चेअरमन, महाराष्ट्र गृहनिर्माण दुरूस्ती व पुनर्रचना मंडळ (राज्यमंत्री दर्जा); २००४-२००७ विश्वस्त, सिद्धिविनायक मंदिर ट्रस्ट, प्रभादेवी, मुंबई; एप्रिल २०१६ पासून भारतीय जनता पक्षाचे कार्य; डिसेंबर, २०१७ मध्ये महाराष्ट्र विधानपरिषदेवर निवड.

**छंद** : वाचन व सामाजिक कार्य.

**पत्ता** : (१) अथर्व, प्लॅट नं. ६१, भाऊ दाजी रोड, माटूंगा (पूर्व), मुंबई-४०० ०१९.

(२) १६, सी-४०४, कल्पक इस्टेट, एस.एम.रोड., ॲन्टॉप हिल, मुंबई-४०००३७.

**दूरध्वनी** : (निवास) (०२२) २४०१६६८८.

**भ्रमणध्वनी** : ९८२१३८८८८८.

**ई-मेल** : prasad_lad@outlook.com.

❑❑❑



## वंजारी, श्री. अभिजीत गोविंदराव

**जन्म** : १० मे, १९७३

**जन्म ठिकाण** : नागपूर.

**शिक्षण** : बी.ए., एलएल.बी.

**ज्ञात भाषा** : मराठी, हिंदी व इंग्रजी.

**वैवाहिक माहिती** : विवाहित, पत्नी श्रीमती स्मिता.

**अपत्ये** : एकूण-२ (एक मुलगा व एक मुलगी).

**व्यवसाय** : उद्योग.

**पक्ष** : भारतीय राष्ट्रीय काँग्रेस.

**मतदारसंघ** : नागपूर विभाग पदवीधर.

**इतर माहिती** : २००० ते २०१५ सिनेट सदस्य, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ; सचिव, अमर सेवा मंडळ शिक्षण संस्था; सचिव, गोविंदराव वंजारी फाऊंडेशन; २००४ पासून अध्यक्ष, गोविंद अर्बन क्रेडिट को-ऑप. सोसायटी, नागपूर; १९९९ ते २००३ महासचिव, एन.एस. यू.आय; २००३-२००५ सचिव, महाराष्ट्र प्रदेश युवक काँग्रेस; २००८ ते २०१४ महासचिव, नागपूर शहर काँग्रेस कमिटी; महासचिव, महाराष्ट्र प्रदेश कॉंग्रेस कमिटी; २०२० मध्ये महाराष्ट्र विधानपरिषदेवर निर्वाचित.

**परदेश प्रवास** : अमेरिका, युरोप, यु.ए.ई., सिंगापूर, मलेशिया, थायलंड, साऊथ आफ्रिका व चीन इत्यादी देशांचा दौरा.

**छंद** : वाचन व प्रवास.

**पत्ता** : (१) प्लॉट क्रमांक १३८, "परिश्रम", दत्तात्रय नगर, नागपूर-४४००२४.

**दूरध्वनी** : (निवास) (०७१२) २७४६६५१.
(कार्यालय) (०७१२) २७४७८५३.

(२) १४०१, ऑर्चिड टॉवर, कॅम्पा कोला प्रीमायसेस, १८, बी.जी. खेर रोड, वरळी, मुंबई.

**भ्रमणध्वनी** : ९८२३५५११६६, ८०१०८७७३२५.

**ई-मेल** : abhijitwanjarri@gmail.com

❑❑❑



## शिंदे, श्री. शशिकांत जयवंतराव

**जन्म** : १९ ऑक्टोबर १९६३

**जन्म ठिकाण** : ताडवाडी, तालुका-माझगाव, जिल्हा-मुंबई.

**शिक्षण** : बी.कॉम.

**ज्ञात भाषा** : मराठी, हिंदी व इंग्रजी.

**वैवाहिक माहिती** : विवाहित, पत्नी श्रीमती वैशाली.

**अपत्ये** : एकूण २ (दोन मुलगे).

**व्यवसाय** : शेती.

**पक्ष** : राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष.

**मतदारसंघ** : महाराष्ट्र विधानसभा सदस्यांद्वारा निर्वाचित.

**इतर माहिती** : १९९० पासून सामाजिक, शैक्षणिक व सांस्कृतिक कार्यात सक्रीय सहभाग, १९८५ पासून अनेक सहकारी संस्थांमध्ये सक्रीय सहभाग; कामगारांच्या हितासाठी सतत कार्यरत; अध्यक्ष, सातारा जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष; सदस्य, महाराष्ट्र राज्य ग्रंथालय परिषद; जावळी तालुका स्वच्छता अभियान राष्ट्रपती पुरस्कार प्राप्त; कार्याध्यक्ष, महाराष्ट्र राज्य माथाडी, ट्रान्सपोर्ट अँड जनरल कामगार युनियन (रजि.); सदस्य, महाराष्ट्र राज्य माथाडी, हमाल व इतर श्रमजिवी कामगार सल्लागार समिती; अध्यक्ष, राष्ट्रवादी महाराष्ट्र जनरल कामगार युनियन; अध्यक्ष,

महाराष्ट्र राज्य सार्वजनिक बांधकाम पाटबंधारे कामगार संघ; मुख्य प्रतोद, महाराष्ट्र विधीमंडळ राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष; मानद सचिव, बृहन्मुंबई माथाडी कामगार सहकारी पतसंस्था मर्या; संचालक, मुंबई कृषी उत्पन्न बाजार समिती (बिनविरोध निवड); सचिव, बृहन्मुंबई माथाडी ग्राहक सहकारी संस्था; संस्थापक, धनवर्षा सहकारी पतसंस्था मर्या.; विश्वस्त, माथाडी हॉस्पिटल ट्रस्ट, अध्यक्ष, जयवंत प्रतिष्ठान, हुमगाव; संस्थापक, प्रतापगड शेतकरी सहकारी फळे-फुले व भाजीपाला खरेदी विक्री संस्था मर्या.; अध्यक्ष, कला व वाणिज्य महाविद्यालय, मेढा; १९९९-२००४, २००४-२००९, २००९-२०१४, २०१४-२०१९ सदस्य, महाराष्ट्र विधानसभा; विधानमंडळाच्या आहार व्यवस्था समितीचे सदस्य, उपविधान समितीचे, समिती प्रमुख; राष्ट्रकुल संसदीय मंडळाच्या महाराष्ट्र शाखेतर्फे सन २००४-२००५ चा "उत्कृष्ट भाषण" पुरस्कार प्राप्त; जून २०१३ ते सप्टेंबर २०१४ जलसंपदा (कृष्णा खोरे) खात्याचे मंत्री; मे २०२० मध्ये महाराष्ट्र विधानपरिषदेवर निवड.

**परदेश प्रवास** : इंग्लंड, स्वित्झरलँड, फ्रान्स, दुबई व सिंगापुर इत्यादी देशांचा दौरा.

**छंद** : सामाजिक, सांस्कृतिक व क्रीडा यामध्ये कार्य.

**पत्ता** : मु. पो. ल्हासुर्णे, तालुका-कोरेगांव, जिल्हा-सातारा.
**भ्रमणध्वनी** – ९८२०४२२३२२.
**ई-मेल** – shashikantshinde1@gmail.com.

❑❑❑



## शिंदे, श्री. सुनिल गोविंद

**जन्म** : २२ फेब्रुवारी १९६३.

